
# माणूस

शनिवार । ७ एप्रिल १९७९ । ७५ पैसे




## हा संप कशासाठी ?



## साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे-अंक पंचेचाळीसावा**

**७ एप्रिल १९७९**

**मूल्य ७५ पैसे**

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

¤


# मुक्काम संगमनेर । दंगल टळू शकली असती !

रंगपंचमीचा दिवस.

उत्साही वातावरणातली दिवसभरातली रंगाची मुक्त उधळण — उत्साही आणि या 'रंगीत' दिवसाची सांगता करण्याची खास 'संगमनेरी' पद्धत. ढोल झांजांच्या घोषात रंगात रंगलेल्या, मस्तीत नाचणाऱ्या तरुणांची जंगी मिरवणूक.

आणि त्यासाठी निघालेला रुंद्याबंद गिरगुणे — पाच फुटी, काळ्या रंगाचा, हसऱ्या चेहऱ्याचा तगडा तरुण.

आणि याच बेसावध क्षणाची सावधपणे वाट बघणारे मारेकरी.

क्षण बरोबर पकडला — दावा साधला.

लाल रक्तानं रंगपंचमीची सांगता झाली.

आणि या वार्तेनं बेहोष झालेला जवान पोलिसस्टेशनच्या रोखानं सरकला. आरोपी निसटून जाऊ नयेत, पोलिसांनी तात्काळ अॅक्शन घ्यावी या सदिच्छेनं जमावानं पोलिसस्टेशन जवळ केलं; पण पोलिसांचा प्रतिसाद शून्य !

एव्हाना संशयित आरोपींची नावं जमावाला समजली. संशयित आरोपी मुसलमान समाजाचा, खून झालेला तरुण हिंदू

पेटलेला जमाव गर्जत सरकला. एस. टी. स्टँडच्या रोखानं निघाला. रस्त्यात भेटलेल्या मुसलमानाच्या ट्रकवर दगडफेक झाली. 'पान स्टॉल'च्या टपऱ्या रस्त्यावर आल्या. जमावातील एका 'बिनचेहऱ्याच्या' माणसाने शब्द तलवारले–'अरे बघता काय, लावा काडी !'

तलवारलेल्या शब्दानं ठिणगी पडली आणि आग भडकली ! 'अपने आदमी की टपरी जलायी' असं समजल्यावर, मुस्लिम मोहल्ल्याजवळच्या पेट्रोल पंपाच्या काचा फुटल्या. तिथेही एका संतप्त माथेफीरूने काडी टाकली आणि भडकलेल्या आगीने एक ट्रान्सपोर्ट कंपनीचं ऑफिस, अॅटोमोबाइल्स, एक हॉटेल भस्मसात केलं आणि मग 'मुसलमानानं हिंदूचं म्हणून, हिंदूनं मुसलमानाचं' या न्यायानं छोट्या टपऱ्या, दुकाने, ट्रक्स, सायकल्स, कार्स यांच्याही समिधा स्वाहा करण्यात आल्या !

आणि रंगपंचमीला अक्षरशः होळी झाली!

संगमनेर काही जातीय दंगलीसाठी प्रसिद्ध नाही. वर्षाकाठी एखादा मारामारीचा किरकोळ प्रकार घडतो कारण वैयक्तिक असतं; पण गावातील वातावरण एकदम बदलून जातं. टेन्शन वाढतं आणि 'जातीय तणावा'च्या कारणासाठी गावाला 'पोलिसी छावणी'चं रूप येतं.

हाही तसाच आपसातील वैमनस्यातून घडलेला प्रकार; पण भडकलेल्या जमावाचा राग रुंदावला. दगडफेकीनं रागाला तोंड फुटलं — बाटल्यांच्या काचाचा खच पडला आणि 'लाठ्या-काठ्यांनी' शस्त्रसज्ज झालेला दोन्ही बाजूंचा जमाव आपापल्या मोहल्ल्यात स्वसंरक्षणासाठी पोलिसांनी गाव ताब्यात घेईपर्यंत बसून होता. संचारबंदी लागू करण्यात आली !

¤

संगमनेरात प्रथमच 'पोलिसराज्य' अवतरलं.

या सगळ्यात बळी जातो निरपराधी !

राजू दायमा नावाचा एक तरुण —

'आपण बरं, आपलं काम बरं' या वृत्तीचा !

कोणाच्या अध्यात ना मध्यात !

किराणाचा किरकोळ व्यापार. कशी तरी हाता-तोंडाशी गाठ !

त्यानं नुकतीच एक टपरी बनवून घेतली.

एके ठिकाणी दुकान सुरू करून स्थिर होण्याचा त्याचा विचार.

पण नियतीलाच मंजूर नसावं.

त्याच्या टपरीवर पेटता पलिता पडला. !

पै–पैसा जमा करून उभी केलेली 'दौलत' समोर जळती बघितल्यावर तो धावला.

आणि त्यालाही कळलं नाही, आपला कोथळा कधी बाहेर आला !

संगमनेरात फिरायला जायचा एकच रस्ता.

त्या रस्त्यावर महिन्यापूर्वी खासदार विखे यांच्या हस्ते उद्घाटन झालेलं एक

मलपृष्ठ १ वर

मुंबई वार्ता । अविनाश सहस्रबुद्धे

# गिरणीकामगारांचा बेमुदत संप

२९ मार्चला ठरलेला मुंबईतील गिरणीकामगारांचा संप नेत्यांनी आवाहन केल्यामुळे १५ दिवस पुढे ढकलला गेला आहे. हा संप कशासाठी ? कामगारांच्या नेमक्या मागण्या तरी कोणत्या ?

आज भारतात कापड-उद्योगधंदा हा एका दिवसात लाखो रुपयांची उलाढाल करणारा अतिशय तेजीतला उद्योगधंदा झाला आहे. १९७७ वर्षीचे गिरण्यांमधून निघालेल्या कापडाचे एकूण उत्पादन ३,२२३ दशलक्ष मीटर्स इतके होते. गेल्या वर्षीच्या सात ऑगस्टला उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी नवी 'टेक्स्टाईल पॉलिसी' जाहीर केली आणि या सर्वांत जुन्या व मोठ्या उद्योगधंद्यांचे भवितव्यच पार बदलून गेले. सरकारचे हे नवे धोरण म्हणजे गिरणीमालकांना सरकारकडून मिळालेली देणगी होती. या नव्या धोरणामुळे अगदी कमी उत्पन्न असलेल्या गिरण्याही भरपूर नफा मिळवू लागतील अशी अपेक्षा त्या वेळी व्यक्त केली गेली होती. असे असले तरी भारतातील कापडाच्या किंमती जपान, हाँगकाँग व पाकिस्तानमधल्या किंमतींपेक्षा पंधरा टक्के जास्तच आहेत, याचे प्रमुख कारण गिरण्यांमधली जुनाट व्यवस्था हेच आहे. गिरण्यांमधील यंत्रांचे आधुनिकीकरण आपल्याकडे अजूनही पुरेसे झालेले नाही. जुन्या यंत्रांमुळे उत्पादनाचे प्रमाणही कमी होते व मग किंमती वाढतात. जागतिक बँकेनेही वेळोवेळी, भारतातील गिरण्यांमधल्या व्यवस्थेबद्दल असमाधानच व्यक्त केले आहे व्यवस्थापनावर खर्चही भरपूर दाखवला जातो. गिरण्यांचे ठोक विक्रेते हे बहुतेक मालकांशी संबंधित, नातेवाइकांपैकी असेच असतात व त्यांना भरपूर कमिशन दिले जाते, जे अप्रत्यक्षपणे मालकांच्याच खिशात जाते. कंपनीशी संबंधित नसलेला बराचसा इतर खर्चही कंपनीच्याच हिशोबात दाखवला जातो. राजस्थानमधल्या एका गिरणीमालकाने आपल्या मुलीच्या लग्नाचा अवाढव्य खर्च कंपनीच्या खर्चातच दाखविला होता. मुंबईतल्याही अनेक गिरणीमालकांच्या बायकांचे खाजगी टेलिफोन्स, मोटारी वगैरेंवरचा खर्च कंपनीच्या खर्चातूनच केला जातो. कांती देसाईने जनता पक्षासाठी गोळा केलेल्या नव्वद लाख रुपयांतील वीस-तीस लाख रुपये तर गिरणीमालकांकडूनच मिळालेले होते. या सगळ्यांचा परिणाम किंमती वाढण्यावर होतोच. तेव्हा जनता सरकारच्या नव्या धोरणामुळे गिरण्यांच्या उत्पन्नात वाढ होणार असली तरी सर्वसामान्य माणसाची स्वस्त कापडाची गरज पुरवली जाणार आहे की नाही याची शंकाच आहे.

सरकारी कारखान्यांचा जमाना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच सुरू झाला; पण आजारी आणि डबघाईला आलेल्या गिरण्या ताब्यात घेण्याचा जमाना अलीकडेच सुरू झाला. कापडगिरण्या हा आपल्या देशातला सर्वांत जुना उद्योगधंदा. नंतर मग वेगवेगळे उद्योगधंदे निघाले. केमिकल्स, इंजिनिअरिंग, औषध-कंपन्या, खतकारखाने इत्यादी. भांडवलदारांना फायदा दिसेल तिथे ते भांडवल गुंतवणार. त्यात भारतीय भांडवलदारांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे अंगण खेळायला मिळालेले या सर्वांच्या परिणामी गिरण्या आजारी पडू लागल्या. या आजारीपणाला औषध द्यायला कामगारांनी सरकारला भाग पाडले. गेल्या दहा-पंधरा वर्षांत मुंबई, अहमदाबाद, मद्रास, कोईमतूर, कानपूर, सोलापूर, नागपूर, कलकत्ता अशा कापडधंद्याच्या प्रमुख शहरांतील कामगारांनी या प्रश्नावर जे लढे केले त्याच्या परिणामी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारला, बंद पडलेल्या अथवा 'आजारी' या सदरात येणाऱ्या एकशेआठ गिरण्या प्रथम औद्योगिक विकास व नियमन कायद्याखाली व नंतर आजारी गिरण्यांच्या राष्ट्रीयीकरणाची तरतूद असणारा खास कायदा करून, ताब्यात घेण्याचे व जवळजवळ विनामोबदला राष्ट्रीयीकरण करण्याचे पाऊल टाकावे लागले.

आज जनतेच्या नावाने राज्यावर आलेले जनता पक्ष सरकार आणि कामगार चळवळीतून पुढे आलेले आजचे उद्योगमंत्री मात्र हे धोरण अंमलात आणू देण्यास तयार नाहीत. यापुढे बंद गिरण्या ताब्यात न घेण्याचे सरकारने ठरविले आहे व त्यातून बेकार झालेल्या कामगारांचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यातच मुंबई शहरातील कापडउद्योगात तथाकथित आजारी गिरण्यांच्या प्रश्नाने अव्वल राजकीय प्रश्नाचे स्वरूप धारण केले आहे. गिरणीमालकांनी 'आजारी' गिरण्यांचा प्रश्न उपस्थित करून कामगारांनी वर्षानुवर्षांच्या लढ्यातून मिळविलेल्या किमान बोनस, नुकसानभरपाई, ग्रॅच्युईटी, भरपगारी रजा इत्यादी हक्कांवर अतिक्रमण सुरू केले आहे. एवढेच नव्हे तर पगारवाढ, वार्षिक पगारवाढीवर आधारलेली वेतनश्रेणी, हक्काच्या रजेत वाढ, बदली कामगारांना जातूचा अधिकार, स्त्री-कामगारांना काम, अशा १९७४च्या ४२ दिवसांच्या संप-लढ्यातील मागण्यांसाठी कामगारांनी पुन्हा लढा चालू करू नये, असा प्रयत्न मालकांनी चालविला आहे. या संपाच्या वेळी बदली व स्त्री कामगारांच्या हक्कासाठी व इतर सवलतींच्या विचारासाठी नेमलेल्या अभ्यंकर समितीचा अहवालही गेली चार वर्षं तसाच लोंबकळत ठेवला आहे.

४२ दिवसांच्या संप-लढ्याची पहिली कमाई म्हणजे संप होऊ नये म्हणून संपाच्या आधी चारच दिवस राष्ट्रीय मिल मजदूर संघ व मालक यांच्यात झालेला पहिला करार. या कराराने कापड-कामगारांच्या

पृष्ठ २० वर

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# न ऐकलेली सभा

ती सभा मी ऐकावयास हवी होती; पण ऐकली नाही. चुकलेच. आता पुन्हा ती कधी तशी ऐकावयास मिळणार नाही. त्या सभेचा विषय होता 'सुशिक्षितांची बेकारी'. तुमच्या घरात कुणी शिकलेला मुलगा बसून असला तर हा विषय तुम्हाला फार जिव्हाळ्याचा वाटेल आणि मी त्या सभेला जाऊ नये याचा राग येईल. त्यासाठी मी एवढेच सांगतो की, मी त्या सभेला गेलो. बेकारी हा माझ्याही जिव्हाळ्याचा विषय आहे. जाऊन सभा न ऐकता आलो एवढेच !

बेकारीवर मी खूप विचार केलाय. बेकारीचा इतिहासही लिहिण्याचा मी एकदा प्रयत्न केला होता; पण मला नोकरी लागली आणि ते काम तसेच राहिले. काही कामे अशी असतात की, ती वेळेच्या आत करावी लागतात. नाही तर युवक संघटना उभारता उभारता युवक प्रौढ होतात व त्यांचे पुढारी वृद्ध होतात. तरी सर्वजण 'युवक' नाव लावीत राहतात आणि ते बरे दिसत नाही. नोकरी लागल्यावरही मला बेकारीचा इतिहास लिहिता आला असता; पण ते बरोबर दिसले नसते. त्यात जीव राहिला नसता. बेकारीचा अभ्यास करीत होतो तेव्हा इतिहासात प्रथम बेकारीचा उल्लेख कुठे आढळतो हे पहाता पहाता शिवाजीमहाराजांच्या काळी मला प्रथम तो उल्लेख आढळला. महाराजांनी मोगलांचा एक किल्ला जिंकून तेथील गडकऱ्याला हाकलून दिले. तेव्हा गडकरी बेकार होऊन आपल्या गावी जाऊन राहिला, असा हा उल्लेख आहे. तेव्हा शिवाजीमहाराजांच्या काळी बेकारी होती यात मला तरी संशय नाही. या उल्लेखानंतर बेकारीचा उल्लेख पुढे एकदम इंग्रजी अमदानीत येतो. पूर्वी बेकार या शब्दाला वाईट अर्थ होता. इंग्रजांच्या काळात त्या शब्दाचा वापर वाढून त्याला मान येऊ लागला. पुढे रशियात क्रांति झाल्यावर या शब्दाला चांगलीच प्रतिष्ठा आली.

मागच्या काळाबद्दल आपल्या फार गैरसमजुती असतात. पूर्वी फार स्वस्ताई होती, प्रत्येकाला काम होतं अशी समजूत करून दिली जाते; पण वेदकाळी पुढे जमिनीची लागवड वाढल्यावर गुरांची खिल्लारे कमी होऊन गुराखी बेकार झाले. यज्ञसंस्था बंद पडू लागल्यावर ऋत्विज बेकार पडले. प्रख्यात वेदकालीन वीर सुहास मेल्यावर युद्धे थांबल्याने कित्येक क्षत्रियांना बेकारी आली. बेकारीच्या दृष्टिकोनातून प्राचीन काळाचा अभ्यास व्हायला अजून पुष्कळ वाव आहे. प्राग--इतिहास--काळातील बेकारीबद्दल जरी सांगता आले नाही तरी इसवी सन १८९० सालच्या आसपास बेकारी होती हे मी नक्की सांगतो. तेव्हा माझे वडील मॅट्रिक झाले. त्या काळचा मॅट्रिक हा आजच्या बी. ए. च्या तोडीचा असूनही त्यांना नोकरी मिळेना. नोकऱ्याच नव्हत्या. शेवटी सोलापूर जिल्ह्यात दुष्काळी कामावरची नोकरी त्यांना नोकरी पत्करावी लागली. बेकार तरुणांची सोय व्हावी म्हणून सोलापूर जिल्हा पूर्वापार दुष्काळी ठेवला आहे का याचा खोल अभ्यास व्हायला हवा.

माझ्या वडिलांना नंतर जी नोकरी मिळाली तेव्हा जात आड आली. एका गावच्या म्युनिसिपालिटीतील कारकुनाच्या जागेसाठी त्यांनी अर्ज केला होता. त्या म्युनिसीप लिटीच्या अध्यक्षांचे त्यांना खाजगी पत्र आले की आपल्या जातीतील लोकांनाच शक्यतो नोकरी देण्याचे माझे धोरण आहे. तेव्हा तुमची निवड करण्यात आली आहे. तुम्ही कामावर रुजू व्हावे.

अध्यक्षमहाराज आपल्याला त्यांच्या जातीचे समजतात, ही चूक वडिलांच्या ध्यानी आली. ते पत्र घेऊन ते नोकरीच्या गावी जाऊन त्यांनी अध्यक्षांची घरी भेट घेतली. त्यांचे पत्र त्यांना परत दिले आणि आपण वेगळ्या जातीचे आहोत, हे सरळ सांगून आता वाटल्यास नोकरी द्या, असे म्हटले. तेव्हा वडिलांनी पत्र परत आणून दिले व खरी जात सांगितली म्हणून काही महिने त्यांना नोकरीवर ठेवून घेण्यात आले. नंतर पुन्हा ते बेकार झाले !

बेकारीचे दुखणे असे वडिलार्जित असल्यामुळे मी ती सभा टाळणे शक्यच नव्हते सभेच्या वेळेआधी दहा मिनिटे तेथे गेलो आणि परत आलो. तेथे फक्त दोन तरुण होते. कोणत्याही सभेला, सिनेमाला, नाटकाला दोन माणसे पाहिली की मला तेथे उभे राहवत नाही. माझी छाती धडधडू लागते. कदाचित या सभेला उरलेल्या दहा मिनिटांत माणसे जमली असतील; पण तेवढा धीर मला धरवला नाही. एकदा एका प्रसिद्ध कंपनीने लावलेल्या जुन्या प्रसिद्ध नाटकाला आम्ही आमच्या घरचे सहा, इतर पंधरा असे वीस प्रेक्षक होतो. बाकीचे नाटकगृह मोकळे होते. न राहवून आत जाऊन नाटक होणार का विचारले, एक प्रेक्षक असला तरी नाटक होईल, असं उत्तर आले. त्यांनी नाटक केलं व आम्ही शेवटपर्यंत बसलो. ही दोन्ही धैर्ये मी अलौकिक मानतो. पण तेव्हा मी तरुण होतो !

या सभेच्या बाबतीत मला आणखी एक शंका आली. अडीच वर्षांपूर्वी अशी एक सभा दुसरीकडे झाली होती. त्याला फक्त दोन बेकार आले होते. ती गोष्ट आठवून माझे मन सभेला थांबावे किंवा नाही याबाबत द्विधा झाले. ज्या अर्थी दोनच बेकार सभेला आले त्या अर्थी अडीच वर्षांपूर्वी सुशिक्षितात बेकारी नव्हती हे उघड होते. आता अडीच वर्षांनी परिस्थिती पालटली आहे काय ? सभाचालकास सुशिक्षितात बेकारी वाढल्याची खात्री असावी. दहा मिनिटांत पहाता पहाता हॉल बेकारांनी भरून जाईल.

द्विधा मन:स्थितीत जिना उतरून मी रस्त्यावर येऊन उभा राहिलो. अर्थशास्त्र जाणणारा एखादा मित्र दिसतोय का पाहू लागलो देशातील सद्य:स्थिती तो सांगेल. वाट पहात मी सभेची वेळ होऊन गेली तरी उभा राहिलो.

सभा काकाकुवा मॅन्शनमध्ये होती. लक्ष्मीरोडवरे हा एक खरोखरीच मॅन्शन आहे. बोळात त्याचे प्रवेशद्वार आहे. आत शिरताच

मोठा चौक आहे. या मॅन्शनमध्ये महाराष्ट्र बँक तिच्या आरंभीच्या काळात होती. याच मॅन्शनमध्ये समाजवादी पक्षाची कचेरी होती व आहे. आता जनता पक्षाचे ऑफिसही तिथेच आहे. बँक म्हणजे भांडवलशाही ही सर्वसाधारण समजूत असल्याने एकाच इमारतीत बँक व समाजवद्यांची कचेरी हे विचित्र वाटेल. पण आपल्याला कोणता इझम हवाय याचा निर्णय अजून लोक घेत नसल्याने ही परिस्थिती तशीच राहणार किंवा आपल्या देशात जसे धर्म एकमेकाशेजारी राहिले तसे सर्व इझम एकमेकांशेजारी रहायला काय हरकत आहे ?

शहरात रोजच्या वाटेवरची अशी ठिकाणे असतात की जिथे आपण काही वर्षांत जात नाही. मीही अनेक वर्षांनी तिथे शिरलो होतो. तेथे 'मुंबई' झाली होती. आतल्या चौकांतही दुकाने दिसली. मी जिन्याने वर गेलो. पूर्वी बँक होती तिथे आता लहान लहान कंपन्या होत्या. कुणाला तरी विचारले सभा वर आहे का ? एकदा बँक असलेल्या त्या जागेकडे पहाताना पैशामुळे झालेली आयुष्यातली सर्व सुख-दुःखे आठवली. सभा कुठे आहे, विचारले त्याचं उत्तर आलं, 'वरच्या मजल्यावर. पण खालीच तुम्हाला कळलं असतं. खालीच 'पुढारी' उभे आहेत!' पुढारी हा शब्द त्याने असा उच्चारला की दोघांची चांगली घसट असावी. मी जिन्याने वर गेलो. उजव्या हाताच्या हॉलबाहेर जनता पक्षाची पाटी होती. मी हॉलमध्ये शिरलो. जरा विचकतच भोवती पाहिले. हॉलच्या भिंतीवरील घड्याळात सातला पंधरा मिनिटे कमी होती. सभा सातला सुरू होती. खाली एका मोठ्या टेबलामागे एक चुणचुणीत तरुण बसला होता. टेबलाच्या या बाजूला एक लांब बाक होते. डाव्या हातास आणखी एक तसेच टेबल व बाक होते आणि समोरच्या भिंतीखालीही टेबल व बाक होते. मधली जागा मोकळी होती. बाक-टेबलाचा सर्व बेत मामलेदार कचेरीसारखा होता. हल्ली संस्थांच्या, संघटनांच्या व सोसायट्यांच्या कचेऱ्यांतून डामडौल वाढला आहे. तो डामडौल लोकांच्या पैशातून असतो. त्यामुळे इथला साधेपणा पाहून बरे वाटले. हे भक्कम बाक व भक्कम टेबल ! भारतात कामगार-क्रांती होईपर्यंत ती नक्की टिकतील. याच वेळी शेजारी पूर्वी असलेल्या बँकेची आठवण येऊन मला खेडेगावात शेजारी शेजारी असलेल्या दोन शेतकऱ्यांची गोष्ट आठवली. त्यापैकी एकाच्या शेतात पाणी लागून त्याच्या शेताचा ऊसमळा झाला. त्याने फटफटी घेतली, नवे घर बांधले, मुलीचे लग्न थाटाने लावून दिले. त्याच्या शेजाऱ्याच्या शेतात पाणी लागले नाही. त्याची जमीन कोरडवाहू राहिली. त्यात ज्वारी, गहू, साळी काही तरी लावून वरुणराजाची कृपा केव्हा होते याची वाट तो पहात राहतो. एखाद्या वर्षी पाऊस पडतो, एखाद्या वर्षी पडत नाही, कधी पीक येते, कधी येत नाही, आलेच तर त्याला भाव मिळत नाही. कर्जाचा बोजा कधी उतरत नाही. फटफटी घेणे सोडा, सायकलचे पंक्चर काढण्याचीही त्याला ऐपत नसते. अशा स्थितीत दुसरा शेतकरी राहतो.

या दोन शेजाऱ्यांसारखे येथे बँकेची कचेरी व समाजवादी पक्षाची कचेरी यांचे झाल्यासारखे वाटले. बँक भव्य नवी इमारत बांधून त्यात गेली; पण समाजवादी पक्षाच्या कचेरीचा थाट तोच पहिला साधा राहिला.

सभेची वेळ होण्यास आता सात मिनिटे राहिली होती. सभेला माणसे दिसत नाहीत? मी अस्वस्थ झालो. तसाच मागे फिरून मी जिन्यातून खाली उतरलो. एक जिना खाली उतरून आलो नि थांबलो. वाटले, एकदा वर जाऊन सोक्षमोक्ष करून घ्यावा. मी जिना चढून वर आलो. हॉलमध्ये शिरून टेबलामागच्या तरुणाला विचारले, 'सभा इथेच आहे का?' तो समोरच्या दोन तरुणांना काही तरी संघटना बांधण्याबद्दल सांगत होता. 'इथेच सभा आहे!' तो म्हणाला. 'आत्ता सुरू होईल!' मी म्हटले, 'कोण बोलणाराय?' तो म्हणाला, 'मी!' मी विचारले, 'आणखी कोण बोलणाराय?' त्याने आणखी दोघांची नावे घेतली. ती मला अनोळखी होती; पण ती नावे ओळखीची असती तरी उपयोग नव्हता. माझे सगळे लक्ष सभेला वेळ किती आहे व किती लोक आले आहेत याकडे होते. अजून आणखी कुणी आले नव्हते. माझी छाती कुणी येणार नाही या भीतीने धडधडत होतीच. मी कसेबसे म्हटले, 'जाऊन येतो!' नि वळून खाली उतरलो.

खरे सांगायचे म्हणजे मी तेवढ्याच एका भीतीने खाली उतरलो नाही. दुसरी एक भीती मनात शिरली होती. तिथे आता सुशिक्षित बेकार येतील. एकेकजण आपली कहाणी सांगू लागेल. त्या मला ऐकायला नको होत्या. एकदा मी त्या ऐकल्या होत्या. एकोणिसशेतीस सालच्या मंदीत गावोगावी, घरोघरी सुशिक्षित तरुण पडून होते.आमच्या गावात आम्ही पडून होतो. कुणी मॅट्रिक होऊन, कुणी बी. ए. होऊन. कुणाला वर्ष झाले होते, कुणाला दोन वर्षे झाली होती. एक-एक तास कसा घालवावयाचा कळत नव्हते. शिक्षकाची, कारकुनाची, शिपायाची कामं, अगदी हमालीसुद्धा करायला आम्ही तयार होतो. महिन्यास पाच रुपये मिळाले असते तरी पुरे होते. आम्ही सकाळी उशिरात उशिरा उठत होतो, तेवढाच वेळ गेला. मग चहा पिऊन पेठेत चक्कर मारून येत होतो. मग घरी येऊन जेवून पोस्टात जाऊन बसत होतो टपालाची वेळ ही नशिबाची मुख्य वेळ होती. प्रत्येकजण अर्ज करीत होता व उत्तराची वाट पहात होता. बसलेल्या तरण्याताठ्या मुलांना बघून मोठी माणसे हळहळत होती, चिडतही होती. मुलांना नोकऱ्या नसल्याने तरुण मुली खितपत पडल्या होत्या. वेळ घालवायला त्यांना निदान घरातली कामे तरी होती. आम्हाला तीही नव्हती. आम्ही धड शेतकरी नव्हतो, धड सावकार नव्हतो, कामगार तर नव्हतोच नव्हतो. कित्येक वेळा टपाल पाहून आम्ही जेवत असू. जेवण झाल्यावर गावाबाहेरील देवळात किंवा गर्द आंब्याखाली, जांभळीखाली आम्ही झोपत असू. आमचा परिसर सुंदर होता; पण मने उद्विग्न होती. काही वर्षांपूर्वी ज्या रानात आम्ही क्रीडा केली ते रान या बेकारीने आम्हाला रक्षावत केले. रात्री जेवणे झाल्यावर ठरलेल्या घरी आम्ही पत्ते खेळायला जमत असू. रात्री दोन वाजेपर्यंत 'विजिक' डाव चाले. त्या वेळी कुणी क्रांतीत सामील व्हा म्हटले असते तरी ते आम्ही केले असते. बेकार तरुणांना चेतवणे फारच सोपे. त्या काळातील लाचारी, नैराश्य, पराभव, अगतिकता यांचा ठसा अजूनही आमच्या पिढीवर दिसतो. तो चेहरा मी लगेच ओळखतो.

मला ती अगतिकता पुन्हा पहावयास नको होती, बेकारीतल्या गोष्टी पुन्हा ऐकायला नको होत्या, ते पराभूत तारुण्य पुन्हा डोळ्यांसमोर नको होते. मला ते पहावले नसते, ऐकवले नसते. म्हणून काकाकुवा मॅन्शनच्या त्या हॉलच्या द्वारातून मी पळून आलो.

तरीही हिंमत करून मी सभा ऐकायला हवी होती. चुकलेच ! ☐

# मुक्ताफळे

ग्यानबा

## □ तरी विचारात माती

परवा केवढा बरे घोटाळा झाला! 'लोकनायक निधन पावले!' असे दुष्ट वृत्त मोरारजीभाईंनी लोकसभेला सांगितले. पुरती चौकशी न करता हाती आलेल्या बातमीबाबत लोकसभेला विश्वासात घेतले. यशवंतरावांनी श्रद्धांजलीदेखील वाहिली आणि हा विश्वासघात ठरला. लोकनायकांनी इहलोकीची यात्रा मुळी संपवलेलीच नव्हती. पुन्हा संसद भरली तो पंतप्रधान सांगत होते–

'मी सभागृहाची आणि देशाची क्षमा मागतो. माझ्याकडून जी अक्षम्य चूक झाली त्याचे मला दुःख होते. या चुकीच्या वृत्तामुळे लोकनायकांचे आयुष्य आणखी किमान दहा वर्षांनी वाढावे अशीच माझी इच्छा आहे!'

हे वृत्त ऐकताच सभागृहात आनंदाची लाट पसरायला हवी की नको? पण तिथे संतापाची लाट पसरली! म्हणजे असे सर्व वृत्तपत्रांनी छापले. आता समजा, आपल्याला एखाद्या माणसाचा चुकून पाय लागला आणि तो पायाचा मालक सौजन्यशील असला तर तो चटकन म्हणतो– 'सॉरी हं!' एखादा वाकून नमस्कारदेखील करायला लागतो. ज्याच्या त्याच्या संस्कृतीप्रमाणे हे घडते. अशा वेळी आपण काय म्हणतो? 'असू दे', 'असू दे!' याचे कारण पुष्कळ वेळा लोकांनी आपल्याला लाथा घालाव्या असे आपण वागलेलो असूनही, लोकांच्या अज्ञानाने म्हणा वा भीतीमुळे म्हणा, लोकांनी आपल्याला लाथा घातलेल्या नसतात, याची बोच असते. शिवाय दुसरा आपल्यापुढे वाकला यामुळे आपल्यातला अहंभाव शांत झालेला असतो.

परंतु सध्या लोकसभेत आणि एकूण संसदेत जो विरोधी पक्ष आहे तो असा साधासुधा नाही. फार थोर थोर माणसे विरोधी पक्षात आहेत त्यांच्या संस्कृतीविषयी अजून फारशी माहिती प्रकाशात आलेली नाही. कमलापती त्रिपाठी! नाव ऐकलय की नाही? इंदिरा काँग्रेसचे उजवे हात! कपाळावर नेहमी कुंकवासारखे गंध. यामुळे डोक्यावरचा पदर ढळलेला वृद्ध स्त्रीसारखा कोवळा चेहरा. सदा हसतमुख आणीबाणीतदेखील हसतमुख होते; परंतु मोरारजीभाईंचा दुष्टपणा पाहून खवळलेच! म्हणाले–

'या चुकीबद्दल मोरारजी सरकारने राजीनामा द्यायला हवा! हे सरकार नालायक आहे!'

सी. एम. स्टीफन म्हणाले– 'पंतप्रधान मूर्ख आहेत!'

संतापाची लाट अशी भयानक होती. वृत्तपत्रे भयानक वृत्त तर किती तरी भयानक करतात! तेव्हा ते खरे असावे. एखादा आपला मित्र मृत्यू पावल्याचे प्रथम कळले आणि नंतर हे वृत्त बरोबर नसल्याचे पत्र आले, की आपल्या घरात संतापाची लाट पसरते की दुःखाची? साधीसुधी माणस असतात अशा गृहात आनंदाची लाट पसरते. लाट म्हणजे वृत्तपत्रीय अतिशयोक्ती झाली; पण आनंदाच्या लहरी निर्माण होतात.

यामुळे लोकसभागृहात 'लोकनायक निधन पावलेले नाहीत' हे ऐकून संतापाची लाट पसरल्याचे वाचून आमच्यासह जग स्तिमित झाले. काही परदेशी पत्रकार संसदेत होते. ते बुचकळ्यात पडले. ते विचारीत होते–

'जयप्रकाश हे जनता पक्षाचे नेते आहेत असे आम्ही समजत होतो; पण ते कमलापती त्रिपाठी, स्टीफन यांचे पुढारी होते हे आम्हाला माहीत नव्हते. Why are they so angry? Are they not happy that Jayaprakash continues to live?'

तात्पर्य सामान्य घरे आणि लोकसभागृह यात काही तरी मूलभूत फरक असावा.

नाही तर असे पहा, २६ जून १९७५ ला पहाटेस इंदिराजींनी जयप्रकाशांना तुरुंगात टाकले. अटक झाल्यानंतर त्यांना कोठे ठेवले हे संसदेला माहीत नव्हते. त्यांच्या प्रकृतीसंबंधाने पत्रक काढावे अशी विनंती आचार्य कृपलानी, मिनू मसानी यांनी केली. त्यांच्या प्रकृतीकडे कोण लक्ष देत आहे? त्यांच्यावर काय औषधयोजना होते आहे? ती करणारे डॉक्टर कोण? याची उत्तरे अज्ञात होती. कमलापती त्रिपाठी, यशवंतराव चव्हाण, आज जसलोकमध्ये सतत बसलेले शरदराव पवार हे सर्व तेव्हा हिंदुस्थानातच होते. त्यांना देखील माहीत नव्हते. देशात कुणालाच माहीत नव्हते. बॅ. तारकुंडे यांनी सुप्रीम कोर्टात अर्ज केला आणि सुप्रीम कोर्टाने हुकूम दिला की, जयप्रकाश कोठे आहेत? जिवंत असले तर प्रकृती कशी आहे? हे सर्व कोर्टापुढे सरकारने सांगावे. तेव्हा इंदिरासरकारला कंठ फुटला. इंदिराजींनी तोंड उघडले– पण ते खोटे सांगण्यासाठी. सरकारने सांगितले– 'जयप्रकाशांची प्रकृती उत्तम आहे!'

वस्तुतः त्या वेळी ते विकलांग होते. पायांवर सूज होता. चेहऱ्यावर सूज होती. खाल्लेले पचत नव्हते. ते पायांवर उभे राहू शकत नव्हते!

तीन वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. त्या वेळी कमलापती-स्टीफन-यशवंतराव-शरदराव काही बोलले का? परवा इंदिराजी जसलोकमध्ये जाऊन जयप्रकाशांना काचेतून पाहून आल्या. अब्रू ही काचेसारखी असते असे का म्हणतात हे त्या दिवशी आपल्याला कळले. इंदिराजी दयाळू आहेत. त्यांनी मुद्दामच काचेतून पाहिले. लोकनायक त्यांना दिसले; पण लोकनायकांना काही त्या दिसल्या नाहीत! समजा, इंदिराजी कॉटजवळ आल्या आणि जयप्रकाशांना त्याच वेळी शुद्ध येऊन त्यांनी डोळे उघडले! म्हणून त्यांनी काचेतून पाहिले. असे सर्व असूनही कमलापती व स्टीफन यांचा थयथयाट वृत्तपत्रांना भले मोठे मथळे देऊन छापावासा वाटतो. यातच या सर्व पुढाऱ्यांचे थोरपण सामावलेले आहे.

यशवंतरावही जसलोकमध्ये जाऊन आले. जयप्रकाशांची मुक्तता झाल्यावर त्यांना ज्या विमानाने मुंबईला आणले, त्याच विमानात तीन वर्षांपूर्वी परराष्ट्रमंत्री यशवंतराव होते; पण उपचार म्हणून त्यांनी जयप्रकाशांची चौकशीदेखील केली नाही असे त्या वेळी सर्वत्र छापून आले. बोलणाऱ्याचे काय जाते? ही माणसे त्या वेळी माणसासारखी वागली असती तर दिल्लीतला 'रिंगमास्टर' त्या वेळी किती बरे रागावला असता? या सर्व थोर नेत्यांबाबत आपण हा विचार नेहमी

केला पाहिजे की त्यांना तारतम्य असते !

जयप्रकाशांची ही हालत तर त्या वेळी सामान्यांचे काय ? रा. स्व. संघाचे चार संघचालक तुरुंगातच उपचाराविना मेले ! याची माहिती संसदेला इंदिराजींनी दिली का ? स्नेहलता रेड्डी कशी मेली हे देखील नंतर कळले. याबद्दल कमलापती, स्टीफन, यशवंतराव त्या वेळी कधी रागावले का ? म्हणाले का यापैकी कोणी – 'अंधेरेमे एक प्रकाश – जयप्रकाश ! जयप्रकाश ! ! ' उलट म्हणायचे – 'अंधार मुळी नाहीच आहे ! '

थोर माणसाचे असेच असते. ते सोईसोईने बोलतात. बोलत नाहीतच. गरजतात! संतापाची लाट आल्यावर ते तरी बिचारे काय करणार ? या वेळी या लाटेचा फारसा परिणाम यशवंतरावांवर झाला नाही सध्या महाराष्ट्रात जे 'शरदाचे चांदणे' पसरले आहे त्याचा हा परिणाम असावा. चांदण्यात वस्तूचे आकार बदलतात. माणसांचेदेखील बदलतात. साक्षात चंद्रशेखराच्या कृपेने हे चांदणे दिल्लीतही पसरेल अशी आता सर्वांना आशा वाटत आहे म्हणून कदाचित असेल; पण या वेळी यशवंतराव या संतापाच्या लाटेत सापडले नाहीत हे खरे.

ते जाऊ द्या. समजा कमलापती आणि स्टीफन या थोर माणसांच्या मागणीनुसार मोरारजींचे नालायक सरकार गेले. इंदिराजी पुन: पंतप्रधान झाल्या. त्यांनी आजतागायत आणीबाणीचे समर्थन चालवले आहे तेव्हा सत्तेवर आल्यावर त्यांनी थोडी सैलसर आणीबाणी आणली. गाड्या वेळेवर धावू लागल्या, संप बंद झाले, देवरस तुरुंगात गेले, खोमेनी भारतात भेट द्यायला आला, पोरे कमी होऊ लागली आणि बरे झालेले जयप्रकाश पुन: 'जसलोक' यात्रेला आले ! हे सगळे समजायचे आहे. तर जसलोकमध्ये त्यांचे काय झाले हे संसदेत स्टीफन आणि कमलापतींना कळेल का ? जे कळेल ते खरे असेल का ? त्यापेक्षा सहसा खोटे न बोलणारा आणि इतरांच्या चुकीने चुकीचे वृत्त दिले गेल्यावर सॉरी म्हणून पाया पडणारा पंतप्रधान जरा बरा नाही का ?

जयप्रकाशांवर कमलापती व स्टीफन यांचे जे अलोट प्रेम आहे त्या दृष्टीने त्यांनी हा विचार करावा. इंदिराजींनी विरोधी पक्षीयांना कारावासात डांबून काहींच्या किडनी निकामी केल्या आणि ज्या स्वपक्षीयांना मोकळे ठेवून त्यांची डोकी निकामी केली त्यात कमलापती-स्टीफन असल्यामुळे त्यांना विचार करा असे सांगायला आम्हाला धीर होत नव्हता; पण सांगितले झाले. कारण आम्हाला ते ठाऊक आहे –

देशामध्ये पक्ष किती !
तरी विचारात माती !

□

# पंतप्रधान की पंतोजी ?

वा. दा. रानडे

पंतप्रधान मोरारजीभाई देसाईंनी पुण्यास गेल्या शनिवारी व रविवारी भेट दिली. या भेटीचा विचार करताना मला प्रथम आठवण झाली ती त्यांच्या गेल्या भेटीची. त्या वेळी विचारवंतांचे एक शिष्टमंडळ त्यांना भेटले होते आणि आपल्या प्रश्नांना पंतप्रधानांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत, अशी तक्रार शिष्टमंडळाचे एक सभासद प्रा. ग. प्र. प्रधान यांनी नंतर एका निवेदनात केली होती. त्या वेळी 'माणूस' मध्ये लिहिलेल्या लेखनात मी म्हटले होते, पंतप्रधानांची मते, कार्यपद्धती, चर्चेला, प्रश्नांना उत्तरे देण्याची त्यांची पद्धती यांची ज्यांना कल्पना आहे त्यांना त्यात अनपेक्षित काही नव्हते. त्यावेळी आलेल्या निराशाजनक अनुभवामुळे या वेळी काही ते विचारवंतांचे शिष्टमंडळ पंतप्रधानांना पुन्हा भेटले नाही असे दिसते. पुणे व उरळीकांचन–भेटीत पंतप्रधानांनी केलेली भाषणे वृत्तपत्रात सविस्तर येऊन गेलीच आहेत, त्याची पुनरुक्ति न करता मोरारजीभाईंच्या नेतृत्वासंबंधात काही विचार मांडीत आहे.

नेहरू, शास्त्री, इंदिरा गांधी आणि मोरारजी देसाई–स्वातंत्र्यानंतर देशाला लाभलेले हे चार पंतप्रधान, प्रत्येकाचे व्यक्तिमत्व निराळे; काम करण्याची, निर्णय घेण्याची, सहकाऱ्यांशी वागण्याची पद्धती निराळी. आपल्यात एकाधिकारशाहीच्या प्रवृत्ती आहेत याची नेहरूंना जाणीव होती व टोपण नावाने लिहिलेल्या एका लेखात त्याची कबुलीही त्यांनी दिली होती. नेहरूंना आपली मते सहकाऱ्यांवर सक्तीने लादावी लागली नाहीत.त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच एवढा होता की त्यांची मते, निर्णय पटले नाहीत तरी त्यांना ठामपणे विरोध करण्याचे धैर्य सहकाऱ्यांना होत नसे. याला अपवाद फक्त दोनच. एक सरदार पटेल आणि दुसरे चिंतामणराव देशमुख. तिबेट व चीनसंबंधीच्या धोरणाबाबत सरदार पटेलांनी नेहरूंना इशारा दिला होता. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्वांच्या विचारविनिमयाने निर्णय घेण्याची पद्धती नेहरूंच्या काळातही खऱ्या अर्थाने अस्तित्वात नव्हती. नेहरू मांडतील तीच भूमिका सर्वसाधारणपणे मान्य होई. महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत तीन–चार मंत्र्यांचा गटच निर्णय घेई. बाकी मंत्र्यांना विचारले जात नसे. संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीत अशा पद्धतीनेच निर्णय घेतला गेला,

याचा अनुभव आल्यावर श्री. चिंतामणराव देशमुखांनी बाणेदारपणाने राजीनामा दिला. असे असले तरी लोकशाही संकेत नेहरू सर्वसाधारणपणे पाळीत. नेत्याची खरी कसोटी लागते ती तत्त्वे आणि अधिकारपद यात संघर्ष येतो तेव्हा. कृष्णमेनन यांची नेहरू नेहमी बाजू घेत आणि माझीच भूमिका ते मांडीत आहेत असे सांगत. चिनी आक्रमणाला वास्तविक नेहरूंची चुकीची धोरणे जबाबदार; पण त्याचे खापर कृष्णमेनन यांच्यावर फोडण्यात येऊन त्यांचा राजिनामा घेण्यात आला. त्या वेळी मात्र नेहरूंनी मेनन यांची बाजू घेतली नाही. त्या वेळी खरोखर नेहरूंनीच राजिनामा द्यावयास हवा होता; पण त्यांनी आपल्या तत्त्वापासून माघार घेतली, अधिकारपद सोडले नाही !

लालबहादुर शास्त्रींना पंतप्रधानपद फारच अल्प काळ लाभले. दुसऱ्यावर प्रभाव पाडणारे व्यक्तिमत्त्व त्यांच्यापाशी नव्हते; पण पाकिस्तान–युद्धाच्या प्रसंगी त्यांनी आपल्या खंबीर नेतृत्वाची चुणूक दाखविली. अंतर्गत प्रश्नांच्या बाबतीत मात्र तो खंबीरपणा त्यांनी दाखविला नाही. अन्नविषयक धोरणाच्या बाबतीत मुख्यमंत्र्यांवर ते प्रभावी नियंत्रण ठेवू शकले नाहीत.

इंदिरा गांधींचा काळ म्हणजे हुकूमशाहीकडील वाटचालीचा कटु अनुभव. 'गुंगी गुडिया' असे त्यांचे सुरुवातीला वर्णन करणारांना त्यांच्यातील सुप्त हुकुमशाही प्रवृत्तींचे आकलनच झाले नाही, असे म्हणायला हवे. सर्व लोकशाही कार्यपद्धती व संकेत गुंडाळून त्यांनी सरकारची व पक्षाची सत्ता आपल्या हाती केंद्रित केली. आपल्या लहरीप्रमाणे केंद्रीय मंत्रिमंडळात बदल केले, राज्यांचे मुख्यमंत्री बदलले, पक्षावर आपले प्रभुत्व रहावे म्हणून दोन वेळा कांग्रेस मोडली. आणीबाणीत त्यांनी आपल्या एकाधिकारशाहीला स्थिर चिरस्थायी करण्यासाठी घटनेत मोठे बदल केले, अलाहाबाद हायकोर्टाने त्यांची निवडणूक रद्द केल्यानंतर सुप्रीम कोर्टात निर्दोषी सुटण्यासाठी निवडणूक कायद्यातच त्यांनी आपल्याला अनुकूल असे बदल करून घेतले व हा कायदा पूर्वीच्या काळापासून लागू केला. सत्ता हातची गेली असली तरी त्यांची वृत्ती व कार्यपद्धती बदललेली नाही.

या तीन नेत्यांच्या पार्श्वभूमीवर मोरारजीभाईंच्या नेतृत्वाचा विचार करायला हवा. ते जनता पक्षाचे पंतप्रधान असले तरी कांग्रेसच्याच परंपरेत वाढलेले आहेत. राष्ट्रीय चळवळीत पडण्यापूर्वी ते कलेक्टर होते. सरकारी अधिकारी कसे वागतात, कशा पद्धतीने कामे करतात याचा त्यांना स्वानुभव आहे राज्यकारभार सुधारणा मंडळाचे अध्यक्ष या नात्याने त्यांचा या प्रश्नाचा चांगला अभ्यास आहे. सरकारी कामे ठरल्या वेळी शिस्तीने पार पडली पाहिजेत, कारभारावरचा खर्च शक्य तितका कमी केला पाहिजे, भ्रष्टाचाराविरुद्ध कडक उपाय हवेत असा त्यांचा आग्रह; पण यापैकी कोणत्या गोष्टी ते गेल्या दोन वर्षांत करू शकले ? नोकरशाही पूर्वीच्याच पद्धतीने कामे करीत आहे. त्यात ते बदल घडवून आणू शकले नाहीत.

मंत्रिमंडळाच्या काम करण्याच्या पद्धतीत तरी त्यांनी काही बदल केला आहे का ? नेहरूंसारखे प्रभावी व्यक्तिमत्त्व किंवा इंदिरा गांधींची हुकुमशाही प्रवृत्ती त्यांच्यात नाही. इतर मंत्र्यांच्या कामात हस्तक्षेप करावयाचा नाही हा संकेत त्यांनी पाळला आहे; पण सर्व मंत्र्यांनी सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व पाळले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. चरणसिंगांनी हे तत्त्व पाळले नाही म्हणून त्यांनी त्यांचा राजिनामा मागितला. हा निर्णय घेताना आपल्या हातून काही चूक होत नाही ना, याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी मंत्र्यांचा सल्ला घेऊन नंतर निर्णय घेतला; पण तत्त्व महत्त्वाचे की पक्षाचे ऐक्य महत्त्वाचे, यातून निवड करण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांनी पक्षाच्या ऐक्यासाठी तत्त्वाचा आग्रह सोडला आणि चरणसिंगांनी कोणत्याही प्रकारे आपली चूक कबूल केली नाही तरीही त्यांना मंत्रिमंडळात प्रवेश दिला. एवढेच नव्हे तर दुसऱ्या क्रमांकाचे स्थान दिले.

मोरारजीभाईंच्या कार्यपद्धतीमुळे त्यांचे काही सहकारी नाराज झाले असल्याचे सांगण्यात येते. एखाद्या मंत्र्याविरुद्ध कोणी आरोप घेऊन आले की ते सरळ त्या मंत्र्यास आपल्या खोलीवर बोलावतात आणि आरोप करणाऱ्या आणि या आरोपांबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे हे त्या व्यक्तीच्या समक्ष मंत्र्याला विचारतात. बिजू पटनाईक आणि जॉर्ज फर्नांडिस यांना असा अनुभव आला असल्याची बातमी आहे. आरोप करणाराचे हेतू काय आहेत हे पंतप्रधानांनी पहावे, त्यासंबंधी माहिती मागवावी, मंत्र्यांकडून उत्तर मागवावे आणि मग त्या व्यक्तीला व मंत्र्याला समोरासमोर बोलवावे असे त्यांचे म्हणणे. उनाड मुलांना शिस्त लावण्यासाठी शाळेचे पंतोजी त्यांच्याशी ज्या पद्धतीने वागतात तसे पंतप्रधानांनी आपल्या सहकाऱ्यांशी वागावे हे त्यांना अयोग्य वाटते.

नेतृत्वाच्या मूल्यमापनाचा हा प्रश्न बराच मोठा आहे. येथे फक्त काही पैलूंकडे मी लक्ष वेधले आहे. मंत्र्यांची तक्रार बरोबर आहे. पंतप्रधानांनी त्यांच्याशी सहकारी या नात्यानेच वागायला हवे. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

# चरणसिंगांचे अंदाजपत्रक । दोन प्रतिक्रिया

## श्रीमंत शेतकऱ्यांना झुकते माफ

प्रा. रा. म. बिवलकर

२८ फेब्रुवारी १९७९ रोजी अर्थमंत्री चरणसिंग यांनी १९७९–८० सालचे अंदाजपत्रक लोकसभेला सादर केले. दिल्लीत प्रचंड शेतकरी मेळावे भरविणाऱ्या किसान नेत्यांकडून अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना झुकते माप दिले जाईल हे अपेक्षितच होते. अर्थसंकल्पाचा एकूण रोख व तोल पाहिला की सर्वसामान्य माणसाला तसे वाटणेही साहजिकच आहे. कारण ग्रामीण अर्थव्यवस्थेला व ग्रामीण समस्यांना वेगळे वळण देण्याचा प्रयत्न हेतुतः करणारे हे पहिलेच अंदाजपत्रक आहे. ६५५ कोटी रुपयांची जादा करआकारणी लादणारे व १३५५ कोटी रुपयांची एकूण तूट भरून काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या कर्जावर म्हणजे मोठ्या प्रमाणावर तुटीच्या अर्थभरण्यावर अवलंबून राहाणारेही हेच अंदाजपत्रक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात एवढ्या मोठ्या प्रमाणावर तुटीच्या अर्थभरण्यावर अवलंबून राहाण्याची ही पहिलीच वेळ म्हणायला हवी.

दारिद्र्य आणि बेरोजगारी या आपल्या दोन महत्त्वाच्या समस्या दारिद्र्य, अर्धबेकारी, बेकारी, असमतोल आहार या समस्या शहरापेक्षा ग्रामीण भागात अधिक भेडसावणाऱ्या. त्यामुळे सरकारी खर्चाच्या रचनेच्या अग्रक्रमात खूपच बदल केल्याशिवाय त्या सोडविणे शक्य नाही, ही भूमिका अर्थसंकल्पाने घेतली आहे. कृषिविकास आणि ग्रामीण विकास यांना अग्रक्रम देऊन त्या क्षेत्रातील विकासदर वेगाने वाढविण्याचा प्रयत्न इथे स्पष्ट दिसतो. ७८-७९ साली वार्षिक योजनेत या क्षेत्रावर १७५४ कोटी रुपयांचा खर्च करण्याचे ठरले होते. यावर्षी ही रक्कम १८११ कोटी रु. एवढी वाढविण्यात आली आहे. छोट्या जलसिंचन योजना आणि इतर भू-विकासी कार्यक्रमांसाठी दीर्घकालीन कर्जपुरवठा करणाऱ्या ॲग्रिकल्चरल रिफिनान्स ॲण्ड् डव्हलपमेंट कार्पोरेशन (ARDC) या संस्थेला तो सहजपणे व सातत्याने करता यावा या दृष्टीने अर्थसंकल्पात आयकर-सूट दिली गेली. शिवाय त्या संस्थेला केंद्र सरकारकडून मिळणारा वित्ताधार १३३ कोटी रुपयांवरून १५९ कोटी रुपयांवर नेण्यात आला आहे. त्यामुळे छोट्या जलसिंचन योजना अगर भू-विकासी कार्यक्रम राबविणाऱ्या मध्यम शेतकऱ्यांना यासाठी दीड टक्का कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध होईल. या क्षेत्रात कर्जपुरवठा करणाऱ्या व्यापारी व प्रादेशिक बँकांनी ए. आर्. डी. सी. देत असलेली ही व्याजदरातील सूट तेवढीच्या तेवढी शेतकऱ्यापर्यंत पोचवावी असे बंधन त्यांच्यावर राहाणार आहे.

ग्रामीण वीजपुरवठा, पाणीपुरवठा आणि गोदामे-बांधणी यासाठी अधिक रक्कम उपलब्ध करण्यात आली आहे. १९७६ सालापासून हरितक्रांतीने पुन्हा मूळ धरले आहे. त्या दृष्टीने हा खर्च आवश्यक ठरला आहे अशी अर्थसंकल्पी भूमिका आहे.

ग्रामीण दारिद्र्य आणि ग्रामीण बेकारी या समस्यांशी मुकाबला करायला तर फक्त शेतीविकासावर भर देऊन भागणार नाही. छुपी बेकारी ही आपल्या शेतीची मोठी समस्या आहे. शेतीविकासात अशी माणसे मुरवणे कठीण ! त्यामुळे ग्रामीण भागात वेगळ्या विकासकेंद्रांची आवश्यकता निर्विवाद आहे. ग्रामीण उद्योगांच्या विकासकार्यक्रमाला त्यामुळे अग्रगण्य स्थान प्राप्त झाले आहे. या देशाचे नवे औद्योगिक धोरण याच गोष्टीवर भर देणारे आहे. अर्थसंकल्पात या क्षेत्रावर १९३ कोटी रुपये खर्च करण्याचा इरादा सरकारने व्यक्त केला आहे. ही रक्कम अर्थात पुरेशी नाही. प्रत्येक राज्याने आपापल्या अर्थसंकल्पात यासाठी अधिक रक्कम मंजूर केली पाहिजे आणि इतर विकाससंस्थांनी त्या कार्यक्रमासाठी चांगला हातभार लावला पाहिजे यात शंका नाही. ग्रामीण उद्योगात महत्त्वाचा उद्योग हातमागाचा. या देशात जवळजवळ ४० लक्ष हातमाग १ कोटी लोकांना रोजगार पुरवतात. त्यामुळे विणकरांच्या सहकारी संस्था स्थापून त्यांना एतद्देशीय व परदेशी बाजार उपलब्ध करून देण्यासाठी २८ कोटी रुपये सरकार खर्चणार आहे.

शेती काय अगर ग्रामीण उद्योग काय, त्यांचा विकास काही सेवा उपलब्ध होण्यावर अवलंबून असतो. वीज, कोळसा, खते, काही रसायने, पेट्रोल, पोलाद, रस्ते, रेल्वे या विविध गोष्टींसाठी गतवर्षी २७३३ कोटी रु. केंद्रीय योजनेने उपलब्ध केले होते. यंदा ही रक्कम ३१२२ कोट रु. एवढी करण्यात आली आहे. वीजउत्पादनाला दिलेले उत्तेजन, खतांबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी चालविलेले जोरदार प्रयत्न हे या दृष्टीने महत्त्वाचे म्हटले पाहिजेत. शिवाय गेल्या काही महिन्यांत औद्योगिक उत्पादनात लक्षणीय वाढ दिसू लागली आहे. पोलाद, कोळसा, पेट्रोल अगर अन्य वस्तू यांची वाढती मागणी भागवायची तर या क्षेत्रांना प्राधान्य देऊन पैसा उपलब्ध केला पाहिजे असे अर्थमंत्र्यांचे म्हणणे आहे.

शेती आणि ग्रामीण क्षेत्रांना अधिक पैसा उपलब्ध करून अर्थमंत्री थांबले नाहीत. या क्षेत्रांसाठी अनेक कर–सुटी त्यांनी जाहीर केल्या आहेत. शेतीमालाच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंवरील कर कमी केल्याने त्या क्षेत्रातील गुंतवणूक वाढेल असा अंदाज आहे. खतांवरील एक्साईज ड्यूटी ५० टक्क्यांनी कमी करण्यात आली. उदा० युरियावरील कर १५ टक्क्यांवरून ७॥ टक्क्यांवर, तर सुपर फॉस्फेटसवरील कर साडसात टक्क्यांवरून पावणेचार टक्क्यांवर आणण्यात आला या खतांच्या आयातीवरील करात तेवढीच सूट दिली

आहे त्यामुळे युरियाची किंमत टनामागे १०० रुपयांनी कमी होईल: सरकारला यामुळे अबकारी करात ७५ कोट रु. व कस्टम्स्मध्ये ३० को. रु. एवढी खोट बसेल. डिझेलवर चालणारे पंप्स जलसिंचनार्थ वापरणाऱ्या शेतकऱ्यांना, लाइट डिझेल तेलावरील अबकारी कर किलो लिटरला १५५ रु. वरून ७५ रु. एवढा कमी केल्याने दिलासा मिळेल. यामुळे १२ कोटी रु. खोट येईल. केंद्र वा राज्यसरकारांनी आयात केलेल्या पॉवर टिलर्सवर कस्टम माफ करण्याचे ठरले आहे. कमी धारणाक्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांना याचा फायदा मिळेल असा सरकारचा दावा आहे. पी. व्ही. सी. पाइप्स निर्माण करण्याकरता आयात होणाऱ्या पी. व्ही सी. रेझिन्सवरही कस्टम-ड्यूटी माफ करण्यात आली आहे. त्यामुळे उपसाजलसिंचनाची कार्यक्षमता वाढेल असे सरकारला वाटते. कच्चा तंबाखूवरील अबकारी कर रद्द केल्याने १० लक्ष तंबाखू उत्पादक—वितरकांना हायसे वाटेल. यात बसणारी १२१ कोटी रुपयांची खोट तंबाखूच्या प्रक्रियाउद्योगांवरील कर वाढवून भरून काढायचा सरकारचा विचार आहे.

## सापेक्षतः श्रीमंतावर कर

खर्च-सुटींचा धावता आढावा घेतल्यावर नव्या करांचा विचार क्रमप्राप्तच नव्हे, तर तो केल्याशिवाय व त्यामुळे किंमतमानावर होणाऱ्या परिणामांचा विचार केल्याशिवाय अंदाजपत्रकाचे मूल्यमापन करणेच शक्य नाही. अर्थमंत्र्यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करदरात बदल सुचविताना या करांचे ओझे सापेक्षतः श्रीमंत नागरिकांवर पडावे ही भूमिका घेतली आहे.

अप्रत्यक्ष करवाढीमध्ये त्यामुळेच समाजातील वरच्या थरातील उपभोक्त्यांच्या उपभोग्य वस्तूंवर व आराम-चैनीच्या टिकाऊ वस्तूंवरील करांचे दर वाढविण्यात आले आहेत. प्रसाधनसाधने व तत्सदृश उत्पादने यावरील अबकारी कर ६३ टक्क्यांवरून १०० टक्क्यांवर नेला आहे. एअर कंडिशनर्सवरील कर १०५ टक्क्यांवरून ११० टक्क्यांवर नेला आहे, तर एअरकंडिशनर्स व फ्रीज यांच्या स्पेअरपार्टस्वरील कर १०५ टक्क्यांवरून १२५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे. स्टीरिओज्, ही-फी-इक्विप्मेंटवरील कर सव्वातीन टक्क्यांनी, भारी टेलिव्हिजन सेटस्वरील कर ९ टक्क्यांनी, भारी रेडिओ व रेडिओग्रॅम्स्वरील कर ३। टक्क्यांनी वाढविला आहे. प्रेशर कुकर्स, पोलादी फर्निचर, विजेरी उपकरणी, तिजोऱ्या यांवरील करही वाढले आहेत. साबण, टूथब्रश, टूथ पेस्टस् डीटर्जंटस्, टिकाऊ अन्नपदार्थ, इन्स्टण्ट कॉफी, बिस्किटे, चीज, कोको-पावडर, चॉकोलेटस्, च्युइंग गम यांवरील करातही लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. यातल्या काही वस्तूंवरील कर छोट्या उद्योगांना उत्तेजन म्हणून कमी करण्याचे जाहीर झाले आहे. खाद्य तेले व वनस्पती यांना स्पेशल अबकारी करातून मुक्त करण्यात आले आहे. फ्लोरेसेंट ट्यूब्ज्वरील कर कमी करण्यात आला आहे. वाहनांपैकी मोपेडस्वरील कर कमी झाला असला तरी स्कूटर्स, मोटारसायकल्स, तीन चाकी वाहने (रिक्षा-टेम्पो वगैरे), मोटारी व व्यापारी वाहने यांवरील करात वाढ करण्यात आली आहे. इनूलॅण्डस् व पाकिटांचे दर पाच पैशांनी वाढले आहेत, तर तारेच्या कमीत कमी दरात २५ पैशांची वाढ झाली आहे.

एकंदरीत अप्रत्यक्ष करातील बदल फक्त उत्पन्न वाढविण्यासाठी नसून चैनीच्या वस्तूंचा उपभोग घटावा व त्यामुळे मोकळी झालेली उत्पादनसाधने आवश्यक उत्पादनांसाठी उपलब्ध व्हावीत असा असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले आहे.

प्रत्यक्ष कर हे सापेक्षतः श्रीमंतांवर पडतात. या देशात त्यांचे प्रमाण कमी असले तरी संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे प्रत्यक्ष करातूनही चांगलीच उत्पन्नवाढ होईल कशी सरकारची अपेक्षा आहे. नॉनकार्पोरेट उत्पन्नांवरील सरचार्ज १५ टक्क्यांवरून २० टक्क्यांवर नेल्याने वैयक्तिक सीमांत आयकर उच्च पातळीच्या उत्पन्नांबाबत ६९ टक्क्यांवरून ७२ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. संपत्तिकरात अर्ध्या टक्क्याची वाढ, कार्पोरेट उत्पन्नावरील सरचार्जमध्ये अडीच टक्क्यांची वाढ, कॅपिटल गेन्स्वरील सूट रद्द करणे या गोष्टी सापेक्षतः श्रीमंतांवरील करांचा बोजा वाढविणाऱ्याच म्हटल्या पाहिजेत. ग्रामीण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यापारी व इतर बँका यांनी कर्ज देण्यास उत्तेजन द्यावे व या व्यवहारातील धोके पत्करण्यास त्यांनी तयार व्हावे म्हणून बँकांच्या नफ्याच्या दीड टक्का एवढी रक्कम बुडित कर्जापोटी कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

अंदाजपत्रकातील हे काही आकडे पहा—

| उत्पन्न-अर्थसंकल्प | | भांडवली-संकल्प |
|---|---|---|
| १. उत्पन्न | १०,७४९ को. रु. | ५,८०२ को. रु. |
| २. खर्च | ११,३९६ को. रु. | ७,१३० को. रु. |
| ३. तूट | ६४७ को. रु. | १,३२८ को. रु. |
| | एकूण तूट— | १९७५ को. रु. |

ही तूट भरून काढण्यासाठी—

जादा करातून उत्पन्न ६६५ को. रु. यातले २०५ को. रु. राज्यांना द्यावे लागतील. केंद्र सरकारला ४६० को. रु. राहतील. यात सक्तीच्या बचतीमधून येणारे १६० को. रु. मिळवले तर एकूण तूट १३५५ को. रु. एवढी राहील. ही तूट रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेऊन भरून काढण्याचा सरकारचा इरादा आहे. गतवर्षी १०७१ को. रुपयांची अंदाजी तूट प्रत्यक्षात १५९० कोटी रुपयांची झाली असे गतवर्षाचे दुरुस्त अंदाजपत्रक सांगते. याचा अर्थ यंदाची अंदाजी तूट १३५५ कोटीवर सीमित होणे कठीण आहे. तुटीचा अर्थभरणा वाढूनही गतसाली किंमतमानपातळी सर्वसाधारणपणे स्थिर राहिली. सरकारी सूत्रांच्या म्हणण्याप्रमाणे यंदाही या तुटीच्या अर्थभरण्याचा परिणाम किंमतमानपातळीवर फारसा होणार नाही. किंमती टक्क्या-दोन टक्क्यांपेक्षा वाढणार नाहीत. कारण देशाजवळ दोन कोटी टनांचा अन्नधान्य साठा व पाच हजार कोटींचे परकीय चलन शिलकी आहे.

## काही शंका

तसे घडो, किंमती न वाढोत, सरकारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर पूर्णपणे वसूल होवोत, रोजगारीचे प्रमाण वाढो, बेकारी कमी होवो, ग्रामीण विकासाला अपेक्षित चालना मिळो—असे सर्वसामान्य

पृष्ठ १७ वर

# गॉर्की कॉलनी

: लेखक :

## ए. एस. मकरेन्को

: अनुवाद :

## मीनाक्षी कोल्हटकर

पूर्वसूत्र : आता कॉलनीमध्ये चोऱ्या-माऱ्या क्वचितच होत; परंतु आसपासच्या गावकऱ्यांच्या घरांवर मात्र मुलांचा अजूनही डोळा होता. उन्हाळयाच्या शेवटी शेवटी मिटयागिन आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या हालचाली अधिकच वाढू लागल्या. कलिंगडाच्या चोऱ्याही मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्या. आणा-भाका घेऊनही कलिंगडांच्या शेतावर धाडी घालण्याचे, तसेच गावकऱ्यांच्या साठवणुकीवर डल्ला मारायचे थांबले नाही. एका रात्री मुलांनी लुका सेमियानोविचच्या बागेत धाड घालून मधाची दोन पोळी मधमाश्यांसकट कॉलनीत आणली.

आन्तोन आत्तापर्यंत चाल-ढकल करत होते; पण आता मिटयागिनला शक्य तितक्या लवकर काढून टाकणे अत्यंत जरुरीचे होते. कारण हे गुन्हे जरी फार मोठे नसले तरी मुलांचं लक्ष अशा गोष्टींवरच जास्त केंद्रित व्हायला लागलं होतं. मिटयागिनबरोबर काराबानोवही निघाला. कॉलनीमध्ये मात्र त्यामुळे एक प्रकारचं औदासीन्य पसरलं.

### प्रकरण तेविसावे

## वेचक बियाणं

हिवाळयाच्या अखेरीस कॉलनीचे एकंदर वातावरण अतिशय उदासीन होते. असे औदासिन्य कॉलनीच्या इतिहासात आम्ही कधीही अनुभवले नव्हते. काराबानोव आणि मिटयागिन यांच्या हकालपट्टीचा हा सारा परिणाम होता. आमच्या कॉलनीतल्या सर्व मुलांत ते दोघे अतिशय हुषार होते आणि त्यांची सर्व मुलांवर मोठीच पकड बसलेली होती. म्हणून त्यांची गैरहजेरी सर्वांना तीव्रतेने भासत होती.

मिटयागिन आणि काराबानोव उत्तम कार्यकर्ते होते. काराबानोव कोणतेही काम अतिशय मन लावून करीत असे. त्याला काम करण्यात खराखुरा आनंद मिळत असे आणि तो इतरांनाही त्याची अनुभूती मिळवून देत असे. त्याच्या नसानसातून उत्साह आणि शक्ती जणू वाहात असे. आळशी लोकांबद्दल तो सहसा कुरकुरत नसे; परंतु अंगचोरपणा करणाऱ्यांवर तो कमालीचा उखडत असे. मिटयागिन हा जणू काराबानोवचे उरलेसुरले गुण भरून काढीत होता. एरवी चोरी करताना जी शिताफी व हुषारी त्यांच्या अंगी दिसे, त्याउलट कामाच्या वेळी मात्र त्याच्या सर्व हालचाली शिस्तबद्ध आणि नीटनेटक्या असत. ते दोघेही कॉलनीच्या दैनंदिन जीवनात उत्साहाने व आनंदाने भाग घेत. त्यामुळे कॉलनीत उत्साह व तरतरीतपणा रहात असे.

त्यांच्या जाण्यामुळे एकाएकी साऱ्या कॉलनीच्या दैनंदिन जीवनावर अवकळा आली. बर्शनेवने स्वतःला आपल्या पुस्तकात उबवून घेतले. बेलुखिनच्या विनोदी स्वभावात एक प्रकारची कटुता निर्माण झाली. बोल्कोव, प्रिखोदको व असादची हे कमालीचे गंभीर आणि शांत झाले. आमची बच्चेमंडळी कंटाळलेली दिसू लागली. सबंध कॉलनीवरच एक प्रकारचे अकाली प्रौढत्व प्राप्त झाल्यासारखे भासत होते. कुठेही हसण्या-खिदळण्याचे वातावरण दिसेना. प्रत्येकजण आपापल्या कामात गढल्यासारखा दिसत होता. आमचा एकटा झादारोव तेवढा आनंदी व उत्साही दिसत होता; परंतु त्याच्या आनंदात वाटेकरी व्हायला कोणीच नव्हते. त्यामुळे त्याच्याही खिलाडू वृत्तीत एक प्रकारचा औपचारिकपणा आला होता. तोसुद्धा आपला जास्तीत जास्त वेळ अभ्यास करण्यातच घालवीत असे किंवा गेल्या वसंत ऋतूत बनवायला घेतलेले वाफेचे इंजिन बनविण्यात घालवीत असे.

यात आणखी भर म्हणजे आमचे शेतीचे प्रयोगही फारसे फलद्रुप झाले नव्हते. त्यामुळे आम्ही आणखी खिन्न झालो होतो. कालिनासाहेबांचे शेतीचे ज्ञान बेताबातचेच होते आणि त्यांनी केलेले प्रयोग बरेचसे फसले होते. त्यातच शेतकऱ्यांकडून आम्ही घेतलेल्या जमिनी पडीक अवस्थेत होत्या. त्यामुळे मुलांनी केलेले आत्यंतिक श्रम वाया गेले होते आणि गव्हाच्या पिकाऐवजी बरेचसे गवतच आमच्या हातात पडले होते. मोसमी पिके काढण्याचा आमचा प्रयत्न सपशेल वाया गेला होता. त्यामुळे बीट व बटाटयांचे पीक आमच्या हाती काही लागलेच नाही.

शिक्षकवर्गावरही निराशेची छाया पसरली होती. कदाचित आम्ही सगळेचजण थकलेले असू. कॉलनी सुरू झाल्यापासून आम्ही कोण ही

एकही दिवसाची सुट्टी घेतली नव्हती; पण त्यावद्दल कोणी तक्रारही कधी केली नव्हती. त्यामुळे या मुलांना सुधारणे अशक्यच आहे, असल्या जुन्या विचारांनी हळूहळू डोके वर काढायला सुरुवात केली होती. शिवाय हे प्रयत्न सोडून द्यावेत असे शिक्षकवर्ग उघड उघड बोलायला लागला होता.

इवानोविचने तर प्रत्यक्ष बोलूनच दाखवले, 'सारं फुकट गेलं. कारावानोवसारखा मुलगा पहा ! आपल्याला त्याचा केवढा अभिमान वाटायचा ! पण त्यालाच आपल्याला या कॉलनीतून हाकलावं लागलं. असादची, बर्शनेव, तारानेटस् किंवा वोल्कोव या कुणाही-बद्दल आशा बाळगण्याचं कारण नाही ते सारे एकाच माळेचे मणी ! त्यात वेलुखिनसारखा एखादाच. म्हणून त्या एकटयासाठीच काय आपण एवढी मोठी कॉलनी चालवायची ?'

एके काळी माझ्या परम स्नेही व माझ्या विचारांच्या पूर्ण भागीदारी असलेल्या एकातेरीनाबाईसुद्धा हळूहळू माघार घेऊ लागल्या होत्या. त्या त्यांचे विचारही अशाच विचित्र तऱ्हेने मांडू लागल्या होत्या.

'खरं सांगू, आपण खरोखरीच फार मोठी चूक करीत आहोत. सामूहिक जीवन आहे अशी कल्पना करून आपण राहिलो; पण हे खरं सामूहिक जीवन नसून सामूहिक जीवनाच्या कल्पनेनं आपण स्वतः भारावून गेलो होतो व दिवास्वप्न बघत होतो !'

त्यावर मी बाईंना म्हटले, 'हे तुमचं विधान चुकीचं आहे. आपलं जीवन सामूहिक आहे. पहा बरं, ही साठ मुलं, त्यांचं दैनंदिन जीवन, ती करीत असलेली कामं, त्यांची आपसातली दोस्ती हे इतकं एकरूप झालेलं आहे की, त्याला सामुदायिक जीवन नाही असं कसं म्हणता येईल ?'

यावर त्या मला म्हणाल्या, 'खरं तर हा नुसता खेळ होता–फार हुषारीनं जमवलेला खेळ म्हणा पाहिजे तर. आपण त्यात रंगून गेलो आणि मुलंही थोडा वेळ आपल्यावरोवर त्यात रंगली; पण ते सारं थोडा काळच टिकलं आणि आता मात्र आपण सारे या खेळात थकलो, कंटाळलो आहोत. कदाचित आपण तो सोडूनही देऊ. शेवटी राहील काय, तर एक उन्मार्गी मुलांची शाळा !'

'अहो, एका खेळाचा कंटाळा आला, तर तो आपण सोडून देऊ. म्हणून दुसरा खेळ खेळून बघू नये असं कोणी सांगितलंय ?' लिडिया एकातेरीनाबाईंना म्हणाली.

आम्ही सारेचजण उदासवाणे हसलो; पण हे सहजासहजी सोडून द्यायला माझी बिलकुल तयारी नव्हती.

'हा सगळा तुमचा मध्यम वर्गीय बुद्धिवादी लोकांचा दृष्टिकोन आहे.' मी म्हणालो, 'तुमच्या लहरीनुसार परिणाम दिसले नाहीत म्हणून उगाचच कुरकुरायचं याला काही अर्थ नाही. मिटचागिन व कारावानोव यांना आपण परत आणावं असं तुम्हाला मनापासून वाटतं. आपल्या इच्छेप्रमाणे कोणतीही गोष्ट पूर्णत्वाला गेली नाही तर मुळूमुळू रडत बसणं किंवा हात-पाय गाळून स्वस्थ बसणं हा शुद्ध वेडेपणा आहे !"

मी हे सारं ब्रह्मज्ञान त्यांना सांगितले खरे; पण मीसुद्धा त्यांच्याच-सारखा एक होतो. मीसुद्धा केव्हा केव्हा सारे काही सोडून देण्याचे विचार डोक्यात घोळवीत असे. इतकेच काय, पण बेलुखिन किंवा झादारोव यांच्याबद्दलसुद्धा मला फारशी आशा वाटत नव्हती. आम्ही खरोखरच फार थकलो होतो आणि म्हणून आमच्या वाटयाला अपयश येत असावे, असे फार तीव्रतेने जाणवू लागले होते.

माझ्या नेहमीच्या सोशिक आणि शांत स्वभावाने मला अजून सोडले नव्हते; म्हणून आमच्या शिक्षकमंडळीत आणि बाकीच्या कार्यकर्त्यांत मी सतत उत्साह आणायचा प्रयत्न सोडला नाही. आपली दुःखे, आपल्याला होणारा त्रास हे काही कायम टिकणारे नाहीत. हळूहळू सगळे काही ठीक होईल, असा मला विश्वास होता व मी आमच्या शिक्षक लोकांना त्यांच्या सोशिकपणाबद्दल शाबासकी देत असे.

आमची शिक्षकमंडळी पूर्वीप्रमाणेच शिस्तबद्ध व कर्तव्यदक्ष होती. ते वेळेवर आपापली कामे करीत. त्यांनी केव्हाही कुरकुर, कुरबूर केली नाही.

एखादे मशीन सतत चालत रहाते त्याप्रमाणे कॉलनीचे जीवन हास्य-विनोदाशिवाय संथपणाने चालले होते. त्याच्यात काहीही अडथळा येत नव्हता. त्या दोन मुलांना कॉलनीतून काढल्यामुळे खरोखरच काही चांगल्या गोष्टी घडून आलेल्या होत्या, हे आमच्या नजरेतून सुटले नाही. गावकऱ्यांच्या घरातल्या चोऱ्या, कलिंगडाच्या शेतावर होणाऱ्या चोऱ्या व आमच्या भंडारातही होणाऱ्या चोऱ्या इतिहासजमा झाल्या होत्या. माझ्या मुलांच्या मनावर आलेल्या औदासिन्याकडे मी जाणूनबुजून डोळेझाक करीत होतो. सर्व काही सुरळीत आणि शिस्तबद्ध चालले आहे याकडेच माझे सारे लक्ष आहे, असे मी भासवीत होतो. अशा प्रकारचे वातावरण हाच जणू कॉलनीच्या जीवनाचा स्थायीभाव आहे, अशी समजूत करून देत होतो.

नवीन नवीन योजना पुढे येत होत्या. आम्ही नव्या कॉलनीत एक कलमे ठेवण्यासाठी उष्माघर बांधायला घेतले. कॉलनीतले रस्ते दुरुस्त करून घ्यायला सुरुवात केली आणि ट्रेपके इमारतीचे कुंपण, कमानी बांधायला सुरुवात केली. एक छोटासा पूल कोलोमाक नदीचे अरुंद पात्र असलेल्या ठिकाणी बांधायला घेतला. त्याच्यासाठी लागणारे साहित्य आमच्या लोहार खात्यातच तयार होत होते. तसेच आजू-बाजूला पडझड झालेली घरे दुरुस्त करायचे काम जोरात सुरू होते. मी जाणूनबुजून काम वाढवीतच होतो. प्रत्येक काम अतिशय काळजीपूर्वक व व्यवस्थित करवून घेण्याची धडपड करीत होतो. यामागे एवढाच हेतू होता की, मुलांचे लक्ष इतर गोष्टींकडे वेधले जाऊ नये व वेळोवेळी आणि व्यवस्थित काम करवून घेण्यावद्दल आमची जी ख्याती होती ती कायम रहावी.

मी लष्करी शिक्षण का घेतले, हे काही मला सांगता येणार नाही. कदाचित माझ्यातल्या सुप्त शिक्षकाला त्याची जरुरी भासली असावी.

मी काही दिवसांपूर्वी कॉलनीत कसरतीचे व कवायतीचे शिक्षण द्यायला सुरुवात केली होती. मी स्वतः काही मोठा पहिलवान नव्हतो आणि कुणी तसा नेमण्याचीही आमची ऐपत नव्हती. मला लढाईला आवश्यक असलेली थोडी-बहुत सैनिकी कसरतीची आणि कवायतीची माहिती होती. कुठल्याही तऱ्हेने फारसा ऊहापोह न करता किंवा प्रचलित शिक्षणतंत्रात ते बसेल की नाही याची शंका मनात न आणता मी मुलांना या गोष्टी उपयुक्ततेच्या दृष्टीने शिकवायला सुरुवात केली.

मुलांनी पण याचे मनापासून स्वागत केले. दिवसभराचे काम झाल्यानंतर सर्व मुले कॉलनीच्या पटांगणात जमत असत आणि आम्ही तास–दीड तास कवायत करत असू. आमच्या अनुभवामधून नवीन नवीन कामे वाढवायला आम्ही सुरुवात केली. आमच्या हालचालींचे क्षेत्र आम्ही हळूहळू वाढवायला सुरुवात केली. आम्ही शिस्तीने आणि धोरण ठेवून हल्ले करायला सुरवात केली. आमचे मुख्य लक्ष्य भंडारे, झोपड्या अशा जागा असत. अशा वेळी भिंतीचा आसरा घेऊन उभे राहिलेले सर्वजण आपल्या झोपड्या व भंडारे बंद करून मोकळ्या मैदानात येत आणि जमिनीवर पालथे पडून पुढच्या धडामोडींची वाट बघत बसत.

या सगळ्याची मुलांना फार मौज वाटत होती. मग मात्र खरोखरीच आम्ही खऱ्याखुऱ्या बंदुका मिळविल्या. सर्वसाधारण लष्करी शिक्षण खात्यात आम्हाला प्रवेशही मिळाला. त्यांनी आमच्या मुलांच्या भूतकाळाबद्दल काहीही चौकशी केली नाही.

ही कवायत घेत असताना मी एखाद्या मोठ्या सेनाधिकाऱ्यासारखा अतिशय काटेकोरपणाने वागत असे आणि मुलांनीही त्याबद्दल कधी कुरकूर केली नाही. अशा तऱ्हेने खरोखरच आम्ही एका नव्या खेळाचा पाया घातला आणि त्या पायावरच पुढचे आमचे सारे आयुष्य व्यवस्थितपणे बांधले गेले.

मुख्य गोष्ट म्हणजे या लष्करी कवायतीमुळे आमच्या मुलांच्यावर चांगला परिणाम झाला. त्यांचे एकंदर बाह्यांगच बदलून गेले. त्यांचा गबाळेपणा जाऊन ती तरतरीत व व्यवस्थित दिसू लागली. साधे उभे रहातानासुद्धा ती मुले भिंतीला किंवा टेबलाला न चिकटता अगदी ताठ आणि व्यवस्थित उभे रहायला शिकली. आता कॉलनीत आलेला कोणताही नवीन मुलगा व आमची जुनी मुले यांच्यातला फरक चटकन ध्यानात येत असे. मुलांचे चालणे शिस्तबद्ध व्हायला लागले. मान ताठ ठेवून चालायची सवय त्यांनी लावून घेतली आणि खिशात हात घालून उभे रहायची सवय साफ सोडून दिली.

या सैनिकी शिस्तीमुळे आपल्या पोरबुद्धीनुसार मुलांनी नाविक व लष्करी शिक्षणाकडे कल दाखवायला सुरुवात केली. याच वेळी कॉलनीमध्ये कुठल्याही हुकुमाला उत्तर देताना किंवा त्याची अंमलबजावणी झालेली सांगताना 'फारच उत्तम' असा शब्दप्रयोग आणायचा नियम काढला. प्रत्येक वेळी उत्तर देताना सलाम ठोकून, उभे राहून, उत्तर द्यायचे असे ठरविण्यात आले. तसेच आम्ही काही ठराविक वेळी बिगुल वाजवायची पद्धतही याच वेळी अंमलात आणली.

आतापर्यंत कोणताही इशारा घंटी वाजवून देण्यात येत असे; परंतु आता मात्र आम्ही दोन बिगुल विकत आणले आणि त्याकरवी इशारे दिले जाऊ लागले. काही मुले दररोज शहरात जाऊन बँडमास्तरांकडून बिगुल वाजविण्याचे धडे घेऊ लागली. तसेच सर्व इशारे व्यवस्थित कागदावर लिहून काढले गेले. प्रत्येक वेळी मुले कसला इशारा द्यावयाचा ते वाचून त्याप्रमाणे बिगुल वाजवू लागले. हिवाळ्याच्या सुरुवातीला आम्ही घंटीला कॉलनीच्या आयुष्यातून अजिबात रजा दिली. बिगुलवाला माझ्या पोर्चमध्ये सकाळी येऊन सुस्वर आवाजात निरनिराळे इशारे देऊ लागला.

संध्याकाळच्या वेळी या इशाऱ्याचे बिगुल कॉलनीत वाजू लागत आणि त्याचे पडसाद बाजूचा तलाव, रस्ते व घरे यात दुमदुमत असत. कोणी कोणी या बिगुलाच्या आवाजाला शीळ घालून साथ देत किंवा दुसरे काहीजण पियानो वाजवून साथ देत असत.

आमच्या सैनिकी शिक्षणाची बातमी पब्लिक एज्युकेशन खात्याला कळल्यावर ते आमच्या कॉलनीला 'बरॅकी' या नावाने हिणवू लागले; परंतु मी काही त्या गोष्टीकडे फारसे लक्ष दिले नाही. दुसरी अनेक कामे माझ्यासमोर पडलेली होती. मला इतकी कामे होती की, या त्यांच्या निरर्थक गोष्टींकडे लक्ष द्यायला मला फुरसतच नव्हती.

ऑगस्ट महिन्यात मी दोन छोटी डुकरे कॉलनीत वाढविण्यासाठी आणली. ती दोन्ही अस्सल इंग्लिश जातीची होती व जणू काही आमच्या जबरदस्तीच्या सामुदायिकात मिसळून जायला त्यांनी नकार दिला. त्यांचा उच्छृंखलपणा एवढा वाढला की, त्यांनी आमच्या ब्राटचिन्कोचा राग ओढवून घेतला.

तो एके दिवशी म्हणाला, 'जणू काही इथं कमीच त्रास होता, म्हणून त्यात भर घालायला ही दोन डुकरं आमच्याकडे आली!'

त्या इंग्लिश मंडळींना आम्ही नव्या कॉलनीत पाठवून दिले. तिथे त्या दोघांचे कॉलनीच्या लोकांनी आनंदाने स्वागत केले. त्या वेळी जवळजवळ वीसएक मुले नव्या कॉलनीत रहात असत. त्या सर्वांच्याबरोबर रोडीम्चीक नावाची एक सामान्य व्यक्ती शिक्षक म्हणून होती. मोठ्या घराचा एक विभाग दुरुस्त करून पूर्ण झाला होता आणि त्याच्यात आम्ही निरनिराळी वर्कशॉप व क्लासरूम्स तयार करण्याचे ठरविले होते; पण सध्या मात्र ही मुले तिथेच रहात. अजूनही काही छोटी छोटी घरे आणि बऱ्याचशा गोष्टी दुरुस्त झाल्या होत्या तरी एक–दोन माळ्यांची, डौलदार घाटाची भव्य इमारत दुरुस्त व्हायची राहिली होती आणि त्याचा उपयोग मुलांच्या रहाण्याच्या खोलीसाठी करायचे ठरवले होते. जिथे जिथे जरुरी होती तिथे तिथे दुरुस्तीचे काम चालू होते.

आमच्या शेतीच्या कामावरही आम्ही आमचे लक्ष केंद्रित करायचे ठरवले होते आणि त्यासाठी लवकरच एक शेतीतज्ज्ञ – एडवर्ड निकोलाएविच शेरे या गृहस्थांची नेमणूक केली होती. आजवर आमच्या मुलांनी कधीही न पाहिलेली अशी ही व्यक्ती आमच्या शेतातून कामे करू लागली.

कालिनासाहेबांसारखे हे गृहस्थ अतिउत्साही किंवा चिडखोर नव्हते. याउलट ते सदैव खिलाडू व हसतमुख वृत्तीचे होते. हे कॉलनीतल्या कुठच्याही व्यक्तीला तुम्ही म्हणून संबोधीत असत. त्यांनी आपला आवाज कधीही चढवला नाही किंवा कोणाशी अकारण दोस्तीही केली नाही. एकदा प्रिखोदकोने उद्धटपणे विशिष्ट शेतामध्ये काम करण्याचे नाकारले. त्या वेळी शेरेसाहेबांनी न चिडता, न रागावता त्याला फार मार्मिक उत्तर दिले,

'ठीक आहे. तुम्ही हे सांगितलंत ते फार बरं केलंत. म्हणजे आता कोणतंही काम तुम्हाला करायला सांगण्याची चूक माझ्या हातून होणार नाही!' या उत्तरामुळे सारी मुले चकितच झाली.

प्रिखोदकोने त्यांना सांगितले की, 'ते विशिष्ट काम सोडून बाकी कुठलंही काम करायची आपली तयारी आहे!'

यावर शेरेसाहेबांनी त्याला परत तसेच एक मजेशीर उत्तर दिले, 'जाऊ द्या हो, तुम्हाला माहीत आहे का, तुमच्यावाचून माझं

काही एक अडणार नाही आणि कृपा करून तुम्ही दुसरं कसलं तरी काम शोधून घ्या !'

'असं का म्हणता ?' प्रिखोदकोने विचारले.

'उगाच चर्चा करण्यात वेळ न घालविता फक्त आपलं नाव कृपा करून मला सांगा !' शेरेसाहेब म्हणाले.

प्रिखोदकोचा हट्ट आपोआपच संपुष्टात आला. त्याने घुश्श्यातच खांदे उडवले आणि त्या झुडुपात काम करायला तो गेला. थोड्या वेळापूर्वी हे काम करण्याचा त्याला कमीपणा वाटत होता, तेच त्याने करायचे कबूल केले.

शेरेसाहेब साधारण मध्यम वयाकडे झुकलेले होते; परंतु त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. त्यांचा काम करण्याचा उरक पाहून आमची मुले अचंबा करीत. ते कधी झोपतच नसावेत असे मुलांना वाटायचे. कॉलनीतली मंडळी नुकतीच झोपेतून उठत असत; पण त्या वेळेस शेरेसाहेब शेतात काम करताना दिसत असत. झोपायला जायचा बिगुल वाजला तरी ते डुकरांच्या खुराड्यासंबंधी सुताराशी बोलताना आढळून येत. दिवसासुद्धा शेरेसाहेब घोड्यांचा तबेला, झाडाच्या कलमांची घरे, शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर किंवा शेतामध्ये खत घालताना एकाच वेळी दिसत असा भास होई. इतक्या वेगाने त्यांची कामे एका पाठोपाठ एक चालत असत.

शेरेसाहेब आल्याच्या दुसऱ्या दिवशी शेरेसाहेबांची व ब्राटचिन्कोची तबेल्यामध्ये काही बाचाबाची झाली. ब्राटचिन्कोला शेरेसाहेबांच्या हिशेबीपणाचा राग आला होता. त्याच्या मते घोड्यासारख्या मुक्या प्राण्याच्या बाबतीत शेरेसाहेबांनी असा हिशेबीपणा दाखवणे बरे नव्हे. त्याला वाटे, हे मोजूनमापून खायला घालणे विचित्रच आहे.

तो म्हणे, 'यापेक्षा जास्त खायला द्यायचं नाही म्हणजे काय ? ते खाणंसुद्धा थोडा पेंढा, थोडा हरभरा असं थोडं थोडं सारं द्यायचं आणि उद्या घोडे मेले तर याला जबाबदार कोण ? मीच ! दुसरं म्हणे आपण तासावर काम करायचं. एक पुस्तक आणि एक वही घेऊन त्याच्यामध्ये तुम्ही किती व कसं काम करता ते लिहा, असं शेरेसाहेब सांगतात !'

ब्राटचिन्कोच्या आरडाओरडाने शेरेसाहेब काही घाबरून जाणारे नव्हते. फाल्कन हा ब्राटचिन्कोच्या मनातून शेरेसाहेबांना कामासाठी द्यावयाचा नव्हता; परंतु शेरेसाहेबांनी ब्राटचिन्कोच्या आरडाओरडाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले. ते स्वतः तबेल्यात गेले आणि फाल्कनला त्यांनी बाहेर आणून सरळ गाडीला जुंपले. यावर ब्राटचिन्को चडफडला आणि त्याने चाबूक कोपऱ्यात फेकून देऊन तो रागारागाने तबेल्याच्या बाहेर निघून गेला. संध्याकाळी त्याने तबेल्यात डोकावून पाहिले असता त्याला ऑलोव्ह आणि बल्लिक तबेल्यात काम करताना दिसले. ब्राटचिन्कोला कमालीचा धक्का बसला. त्याने माझ्या ऑफिसाकडे दाद मागण्यासाठी धाव घेतली; पण वाटेतच शेरेसाहेबांनी त्याला गाठले आणि त्याच्यापुढे कागद धरून जणू काही झालेच नाही अशा थाटात त्याला विचारले,

'आपलं नाव ब्राटचिन्को ना ? हे पहा, या कागदावर तुमच्या आठवड्याच्या कामाचा तपशील दिलेला आहे. प्रत्येक घोड्यानं प्रत्येक दिवशी किती काम करावं, त्याला बाहेर हिंडायला केव्हा न्यावं वगैरे लिहिलं आहे. तसंच कुठल्या घोड्याला गाडीला जुंपावं आणि कुठल्या घोड्याला विश्रांती द्यावी हेही त्यात नमूद केलं आहे. तुम्ही तुमच्या दोस्तांसमवेत हे सारं वाचून पहा आणि त्यात काही सुधारणा हव्या असल्या तर उद्या त्या मला सांगा !'

ब्राटचिन्को स्तिमितच झाला आणि तो कागद घेऊन तबेल्याकडे परत गेला.

गंमत म्हणजे दुसऱ्या दिवशी कुरळ्या केसांचा ब्राटचिन्को आणि टुळटुळीत डोक्याचा शेरेसाहेब, दोघेही शेजारी शेजारी माझ्या टेबलाजवळ बसून गंभीरपणाने काही चर्चा करीत होते. मी पलीकडच्या टेबलावर माझे काम करीत होतो. मधूनमधून मी त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होतो. त्यांची चर्चा जोरजोरात चालू होती.

'रेड आणि बँडिट या दोघांनाही बुधवारी नांगराला जुंपायला हरकत नाही.'

'लॅडी बीट खाऊ शकत नाही. तिचे दात......'

'अंहं ! त्याचं काय मोठंसं ? ती चांगली बारीक चिरून त्यांना द्यावी, पहा करून !'

'समजा, कुणाला मध्येच शहरात कामासाठी जावं लागलं तर ?'

'त्यांनी पाहिजे तर पायी जावं किंवा शेजारच्या गावातनं घोडं भाड्यानं घ्यावं. आपल्याला त्याच्याशी काय करायचंय ?'

'वा, वा ! ही सारी उत्तम व्यवस्था झाली !' ब्राटचिन्को म्हणाला.

एक घोडा प्रत्येक दिवशी वाहतुकीसाठी आम्हाला पुरा पडत नसे ही गोष्ट तर कबूल करायलाच पाहिजे होती. कालिनासाहेब शेरेसाहेबांपुढे पुरे पडत नसत. कारण प्रत्येक वेळी शेरेसाहेबांच्या शांत वक्तव्यापुढे ते काही बोलू शकत नसत.

शेरेसाहेब सांगत, 'तुमच्या वाहतुकीच्या प्रश्नाशी मला काहीही कर्तव्य नाही. तुम्ही आणावयाचा माल कसाही आणा. पाहिजे तर तुम्ही नवा घोडा खरेदी करा; पण मी यातला घोडा देणार नाही ! कारण मला साठ एकर जमिनीत नांगरणी करायची आहे. पुन्हा या घोड्यांच्या प्रश्नावर कधीही माझ्याशी चर्चा करू नका !'

यावर कालिनासाहेब रागाने ओरडून सांगत,

'मला घोडा हवा असला तर मी तो स्वतः जुंपून घेईन, समजलात ?'

यावर शेरेसाहेब काही बोलत नसत. ते हातातल्या वहीत काही तरी लिहीत. एका तासाभराने ऑफिसातून बाहेर पडता पडता त्यांनी मला सांगितले,

'हे पहा, मी ठरवून दिलेल्या घोड्यांच्या कार्यक्रमात मला विचारल्याशिवाय कोणी ढवळाढवळ केली तर मी ताबडतोब कॉलनी सोडून निघून जाईन !'

मी घाईघाईने कालिनासाहेबांना बोलावणे पाठवले आणि त्यांना विनंती केली,

'तुम्ही कृपा करून याच्यामध्ये पडू नका आणि त्याला त्रास देऊ नका !'

यावर कालिनासाहेब म्हणाले, 'अहो, मी एका घोडा घेऊन कसं काम करू ? आपल्याला शहरात जावं लागतं, पाणी आणावं लागतं, आपल्याला जळणाचं लाकूड तसंच सार्‍या वस्तू शहरातून आणाव्या लागतात. कशा आणणार त्या, सांग, पाहू !"

'यावर आपण काही तरी मार्ग काढू !' मी त्यांना अशा रीतीने समजावले.

आम्ही खरोखरच मार्ग शोधून काढला. नवीन नवीन चेहरे, वाढणाऱ्या नव्या नव्या काळज्या व नवीन कॉलनीचे काम, तसेच तिथे पाठविलेले आमचे रोडीम्चीक शिक्षक, आमची दिवसेंदिवस होणारी प्रगती या सर्वांनी मिळून आमचे जुने दारिद्र्य आणि आमच्यावर मध्यंतरी आलेली औदासीन्याची छाया यावर मात केली. १९२२ च्या अखेरीस घडलेल्या भानगडीमुळे आणि घडामोडीमुळे मनातून कितीही आनंद वाटला तरी तो बाहेर न दाखविता मी कमालीच्या साधेपणाचा भाव आणीत असे. जणू काही या मुखवटयाचा मला त्रास होत नसे; पण कॉलनीतल्या बाकीच्यांना ते फार डाचत असे. त्यांना कदाचित याचे खरेखुरे स्वरूप कळले असेल किंवा नाही हे मी सांगू शकत नाही; परंतु त्यांचे एकंदर वर्तन माझ्याशी जरा जास्तच सभ्यपणाचे आणि औपचारिकपणाचे होत असे. याउलट मी जर यांच्यात मिसळलो असतो, त्यांच्याबरोबर खेळात भाग घेतला असता किंवा हातात हात घालून फिरलो असतो, तर त्यांना कमालीचा आनंद झाला असता हे मी पक्के जाणून होतो.

परंतु आम्ही लवकरच हा दिखाऊ साधेपणा आणि सभ्यपणा सोडून दिला. तरीसुद्धा हा बदल आमच्यात कसा व नक्की केव्हा झाला हे आमच्यापैकी कोणीच सांगू शकले नसते. पुन्हा आम्ही सगळेजण मोकळेपणाने हसू-खेळू लागलो, थट्टा-मस्करी करू लागलो व भरपूर कामही करू लागलो. पण यात एकच फरक होता की, पूर्वीसारखी शिस्त आम्ही कधीही मोडली नाही किंवा कोणत्याही प्रकारचा धरसोडपणाही केला नाही.

अखेर कालिनासाहेबांनी त्यांची वाहतुकीची अडचणही सोडविली. गावरुष्का नावाचा एकच बैल आमच्याकडे होता आणि शेरेसाहेबांना त्याची जरुरी नव्हती. त्या एका बैलाची आम्ही गाडी बनविली व त्यातून पाणी आणि जळाऊ लाकडाची ने-आण करायला सुरुवात केली. एप्रिल महिन्याच्या एका दिवशी आम्ही सबंध कॉलनीतले लोक अतिशय आनंदाने खूप खूप हसलो. असा आनंद आणि असे हसू आम्ही कित्येक दिवसांत अनुभवले नव्हते. ब्राटचिन्कोने एक दिवस जवळच्या शहरातून एक छकडा आणला व तो आमचा एकुलता एक बैल त्या छकडयाला जुंपला.

'याबद्दल तुला शिक्षा होईल हां !" मी बजावले.

तो म्हणाला, 'बघू तर खरं. आपण आता सारे सारखेच आहोत आणि हा बैलही घोडयासारखाच आहे. कारण तो एक कसणाराच आहे.'

आमचा बैल आनंदाने ती गाडी त्या दिवशी शहराकडे घेऊन गेला.

□

## प्रकरण चोविसावे

# सेमियानची साहसे

शेरेसाहेब झपाटयाने नवीन नवीन गोष्टी करीत होते. त्यांनी यंदा उन्हाळयात एक नवीन प्रकारची पेरणी-योजना काढली होती. त्यामुळे साऱ्या कॉलनीभर उत्साहाचे वातावरण भरले होते. सारा वेळभर शेरेसाहेब नवीन शेतीयोजनचे विचार करीत असत. ते कुठेही असोत-शेतात, तबेल्यात, डॉरमिटरीत, रस्त्यावर, माझ्या ऑफिसात किंवा जेवणाच्या खोलीत-मुले त्यांचा कुठचाही हुकूम चर्चा केल्याशिवाय अंमलात आणीत नसत. शेरेसाहेब खरोखरीच विधायक सूचना असल्या तर त्या धुडकावून लावीत नसत. याउट कधी कधी त्यांचा जास्त चांगल्या तऱ्हेने ऊहापोह पण करीत असत; पण शेवटी मी म्हणतो तसे कर, असे सांगायलाही विसरत नसत.

सबंध दिवसभर त्यांचे काम सतत चालू असे आणि त्यांच्या बरोबरीने वेग ठेवणे पुष्कळदा जमत नसे; परंतु ते सदैव अतिशय उत्साहाने आणि शांतपणाने इकडून तिकडे धावपळ करीत. दोन ते तीन तास गव्हाणीमध्ये, पाच पाच तास पेरणी-यंत्रामागे आणि प्रत्येक दहा मिनिटांना डुकरांच्या खुराडयात वाकून बघत व डुकरे सांभाळणाऱ्यांना निरनिराळे प्रश्न विचारीत.

'डुकरांना खायला केव्हा दिलंत ? त्याची वेळ लिहिली का ? मी ज्या तऱ्हेनं सांगितलं होतं त्याच तऱ्हेन तुम्ही लिहिलंय ना ? त्यांना धुऊन काढण्याची व्यवस्था केली का ?' वगैरे प्रश्न ते विचारीत.

कॉलनीचे लोक शेरेसाहेबांबद्दल जरा बेताबेतानेच उत्साह दाखवीत. ते त्याला, 'आमचे शेरेसाहेब फारच गंमतीदार आहेत,' असे म्हणत. 'ते आमच्या इथे आहेत म्हणूनच ते खरोखर तसे आहेत. दुसऱ्या एखाद्या ठिकाणा ते इतके चांगले व मजेदार राहिले नसते !' यावरून शेरेसाहेबांबद्दल मुलांना किती आदर होता, हे दिसून येत असे. शेरेच्या अधिकाराला मिळणाऱ्या मूक संमतीवरून, त्यांच्या शब्दाबद्दल आपसात चाललेल्या चर्चेवरून तसेच त्यांच्या ज्ञानाबद्दल व आत्यंतिक कळकळीबद्दल असलेला आदर मुलांच्या उत्साहित वागवणुकीवरून दिसून येई.

मुले, फक्त त्यांच्यावर दया दाखवणारे किंवा त्यांचे कोरडे कौतुक करणारे यांच्यावर प्रेम करीत नाहीत याबद्दल शंकाच नव्हती. या तत्त्वावर मी कधीच विश्वास ठेवला नव्हता. म्हणून शेरेसाहेबांबद्दल मुलांना जो आदर वाटत होता त्यामुळे हा माझा विश्वास दृढ झाला. माझी फार पूर्वीपासून खात्री झाली होती की, तरुण मुलांना खरा आदर व प्रेम-विशेषतः आमच्या कॉलनीच्या मुलांना निराळयाच प्रकारच्या लोकांबद्दल वाटत असे.

खरी पात्रता, सखोल ज्ञान, कामाचा उरक, जाडया जाडया शब्दांचा कमी वापर, शांतपणाने काम करायची पद्धत याच गोष्टी तरुणांना जास्तीत जास्त आकर्षित करीत असतात.

तुम्ही त्यांच्याबरोबर कितीही कडकपणाने वागलात किंवा दुर्लक्ष केलेत, त्यांना टाळायचा प्रयत्न केलात आणि तुम्ही जर तुमच्या कामात वाकबगार असाल, तर तुमचे ज्ञान आणि तुम्हाला येणारे यश याबद्दल तुम्हाला कधीही काळजी करायचे कारण नाही. तुम्ही त्यांना तुमच्या बाजूला वळवून घेऊ शकता आणि ते तुम्हाला कधीही सोडणार नाहीत. तुम्ही कोण आहात आणि कसे आहात—फिटर आहात, लोहार आहात की इंजिनड्रायव्हर आहात—याबद्दल ते फारसा विचार करीत नाहीत.

याउलट तुम्ही किती दयाळू असाल किंवा तुमचे संभाषण कितीही मनोरंजक असेल, तुम्ही कितीही चांगल्या स्वभावाचे असाल किंवा तुमचे व्यक्तिमत्त्व कितीही आकर्षक असेल तरी जर तुमच्या कामात तुम्हाला प्रत्येक वेळी अपयश येत राहिले आणि तुम्हाला कामाची जर बरोबर माहिती नसेल किंवा कोणतेही काम तुमच्या हातून बिघडत असेल तर तुम्हाला योग्य तो मान मिळणार नाही. उलट तुमच्या वाट्याला घृणाच येईल हे नक्कीच !

एकदा असे झाले की, एका भट्टी बनवणाऱ्याला कॉलनीत बोलवण्यात आले. मुलींच्या डॉरमिटरीत भट्टी बनवायची होती. भट्टी बनवणारा सहज आमच्या कॉलनीत आला होता आणि दिवसभर आमच्या कॉलनीत रमला होता. त्याने कुणाच्या तरी घरातली भट्टी दुरुस्त केली होती. तसेच कुणाच्या तरी तबेल्याच्या भिंतीची डागडुजी केली होती. तो माणूस दिसण्यात जरा गुबगुबीत, टकल्या व बोलण्यात अगदी मिठ्ठास होता. त्याच्या बोलण्यावरून त्याच्याइतका हुषार व वाकबगार भट्टी बांधणारा मिळाला नसता.

मुले दिवसभर त्याच्या भोवती भोवती फिरत होती आणि त्याचे बोलणे व त्याच्या लांबलचक गप्पा ऐकून घेत होती.

'मुलांनो, किती तरी लोक भट्टी बांधणारे माझ्यापेक्षा पुष्कळ मोठे होते; पण त्या फलाण्या काउंटला कुणाचंच काम पसंत पडत नसे. ते म्हणायचे, 'आर्टेमिनाच बोलवा. कारण त्यानं बांधलेली भट्टी हीच खरी भट्टी !' आणि मी खरोखरच किती तरी लहान, तसं पाहिलं तर आणि काउंटच्या घरात भट्टी बांधायची म्हणजे काय चेष्टा होती ? म्हणजे माझ्या बोलण्याचा अर्थ समजला ना ?'

काउंट म्हणायचे, 'आर्टेमी, उत्तम काम कर हं !'

त्यावर मुलांनी त्याला विचारलं, 'अरे वा ! तुमचं काम कसं काय झालं ?'

'शंकाच नाही. फारच उत्तम !'

त्याने आपली साखळी काढली व काउंट त्या भट्टीकडे कसा बघत असे ते दाखवले. मुलांना अर्थातच राहवले नाही आणि त्यांनी मोठ्याने हसायला सुरुवात केली. कारण काउंटची नक्कल करताना आर्टेमी फारच विचित्र दिसत होता.

आर्टेमीने मोठाच आव आणून आमची ती भट्टी बांधायला सुरुवात केली. त्याने बनवलेल्या चांगल्यात चांगल्या भट्टचा किंवा दुसऱ्या कोणी बनविलेल्या वाईट भट्टचा यापेक्षाही अगदी वेगळीच भट्टी तो तयार करणार होता. त्याने मूर्खासारख्या त्याच्या तंत्रातल्या खाचाखोचा व त्यातल्या लांड्या-लबाड्या मुलांना अगोदरच सांगून टाकल्या. त्याने पुढे सांगितले, 'त्रिज्या जर बरोबर काढली तर काम सोपं होतं; पण पुष्कळ लोकांना ती त्रिज्याच काढता येत नाही !'

सारी मुले मुलींच्या डॉरमिटरीकडे एकसारखी खेपा घालीत होती आणि आर्टेमीची त्रिज्या कशी निघते आहे याचा शोध घेत होती.

आर्टेमी भट्टी बांधायला सुरुवात करीत असल्यापासून सतत बडबडत होता; परंतु त्याने जेव्हा भट्टी वरती चढवायला सुरुवात केली त्या वेळेस त्याला भट्टी बांधायची माहिती नव्हती, हे स्पष्ट झाले आणि त्याची बडबडही थोडा वेळ थांबली.

आर्टेमीचे काम कसे चालले आहे ते बघण्यासाठी मी तिकडे गेलो होतो. मुले माझ्या तोंडाकडे बारकाईने पहात होती. मी नापसंतीदर्शक मान हालवून आर्टेमीला विचारले,

'अरे, ही एवढी बेढब का दिसते ?'

'बेढब कशी ? अजून ती पुरी व्हावयाची आहे. मग ती चांगली दिसेल !' तो म्हणाला.

झादारोवने डोळे किलकिले करून भट्टीकडे पाहिले व विचारले, 'काय हो, काउंटच्या घरी पण ती अशीच बेढब दिसत होती का ?' पण आर्टेमीला या शब्दातली खोच कळलीच नाही.

'पुरी तयार होईपर्यंत साऱ्याच भट्टचा अशा दिसतात !' त्यानं उत्तर दिलं.

तीन दिवस आर्टेमीने भुणभुण लावली होती. सर्वत्र कॉलनीभर ही बातमी पसरली. आर्टेमी आपण केलेले काम उत्तम आहे असे जोरात सांगत होता. ती भट्टी खोलीच्या मधोमध ठेवली होती. ती एका बाजूला आधीच झुकलेली होती. सर्वांच्या नजरेसमोर ती धाडकन कोसळली व साऱ्या खोलीभर विटा आणि धुरळा पसरला. त्याबरोबर हास्याचा कल्लोळ माजला. आजूबाजूला उभ्या असलेल्या बऱ्याच मुलांना विटांचा मारही लागला; पण त्याकडे कुणाचेच फारसे लक्ष गेले नाही. सारीजणे हसत हसत डॉरमिटरीच्या बाहेर पटांगणात, व्हरांड्यात निघून गेली. काही जणांची पोटे हसून हसून दुखायला लागली. मी त्या माती आणि विटांच्या ढिगाऱ्यातून कसाबसा खोलीच्या बाहेर पडलो. तिथे बुरुन आर्टेमीची गर्दन पकडून त्याला ठोसा देण्याच्या बेतात होता; पण तो थोडक्यात बचावला.

आर्टेमीला कॉलनीतून तावडतोब हाकलून देण्यात आले; परंतु त्याचे नाव मात्र बरेच दिवस आमच्या कॉलनीत रेंगाळत राहिले. कोणी एखादा थापाड्या मनुष्य भेटला की सारेजण 'हा दुसरा आर्टेमीच आहे !' असे म्हणत.

मुलांच्या दृष्टीतून कुचकामी म्हणजे आर्टेमी व कष्टाळू म्हणजे शेरे असे मत पक्क झाले होते. त्यामुळे शेरेसाहेब कॉलनीत एकंदर फारच आवडते होते याचा परिणाम म्हणजे आमचे भूमि-विकासाचे काम अतिशय यशस्वीपणे चालू होते. शेरेसाहेबांचा आणखी एक मोठा गुण होता तो म्हणजे बेवारशी वस्तू शोधून काढायच्या, बिलं हाताळायची, उधार वस्तू आणायच्या वगैरे त्यांना बरोबर जमत असे. त्यामुळेच गवत कापायचे मशीन, बियाणाचे मशीन, फावडी, खोरी इतकेच काय पण गाई, बैल वगैरे गोष्टीही कॉलनीत दिसू लागल्या. तीन गाई आमच्याकडे आल्या आणि लवकरच आम्हाला भरपूर दूध मिळेल असे उगीचच वाटायला लागले.

शेतीच्या कामाची आवड त्यामुळे बऱ्याचशा मुलांत उत्पन्न झाली. निरनिराळ्या वर्कशॉपमधून काम करणारी मुले सोडली तर बाकी

सर्व मुले शेतात काम करायला जाऊ लागली. वर्कशॉपच्या पाठीमागे छोटे-छोटे वाफे त्यांनी बनवून घेतले. त्यासाठी सुताराकडून मोठ-मोठ्या लाकडी चौकटी त्यांनी बनवून घेतल्या. नवीन कॉलनीत तर या चौकटी फार प्रमाणांत तयार झाल्या.

फेब्रुवारीच्या सुरुवातीला एके दिवशी काराबानोव कॉलनीमध्ये परत आला. आम्ही सारे शेतीच्या कामात अगदी गढून गेलो होतो. मुलांनी त्याचे अतिशय आनंदाने स्वागत केले. सान्यांनी त्याला मिठ्या मारून मारून पुरे वाट केली. त्या सर्वांना कसे तरी बाजूला करून तो माझ्या ऑफिसमध्ये आला.

'मी तुम्हा सान्यांना भेटायला आलो आहे!'

सगळ्यांचे चेहरे आनंदित झाले होते. सारी मुले, शिक्षकवर्ग आणि इतर कार्यकर्ते अतिशय उत्साहाने माझ्या ऑफिसमध्ये डोकावत होते.

'हा आपला सेमियान आलेला पाहिलात का?' असे कोणी तरी म्हटले.

काराबानोव संध्याकाळपर्यंत सर्व कॉलनीभर फिरू लागला. त्याने ट्रेपकेवाडीला पण भेट दिली आणि संध्याकाळी तो परत माझ्या ऑफिसमध्ये आला. त्याचा चेहरा खिन्न आणि उतरलेला दिसत होता. मी त्याला विचारलं,

'तुझं कसं काय चाललंय?'

'मी माझ्या वडिलांकडे रहातो.'

'अरे, पण मिटचागिनचं काय झालं?'

'तो गेला खड्ड्यात! मी त्याची संगत केव्हाच सोडली. तो म्हणे मॉस्कोला गेला!'

'तुझ्या वडिलांच्याकडे कसं काय चाललंय?'

'तिथं काय चालायचं? ते आजूबाजूला सारे शेतकरीच आहेत. माझे वडील चांगले तगडे आहेत. मात्र माझा भाऊ मारला गेला!'

'अरेरे! कसा काय मारला गेला?'

'तो गनिमी सैनिक होता. पेटलुराच्या लोकांनी शहरात त्याला भर रस्त्यावर मारलं!'

'तू आता पुढं काय करायचं ठरवलंस? वडिलांजवळच राहणार आहेस ना?'

'नाही. मला तिथं राहावसं वाटत नाही. काय करावं तेही मला समजत नाही!'

तो जागच्या जागी जरा चुळबुळला व खुर्ची माझ्याजवळ ओढून घेऊन मला हळूच म्हणाला,

'समजा आन्तोन, मी इथं राहिलो तर तुमची काही हरकत आहे का? मला खरोखरी मनापासून इथं राहावसं वाटतंय!'

त्याने एकदा माझ्याकडे रोखून पाहिले आणि मान गुडघ्यात घातली.

'बेशक राहा! आम्हा सर्वांना फार आनंद होईल!' असे मी त्याला मनापासून उत्तर दिले.

सेमियानने अक्षरशः एकदम उडी मारली. त्याला अगदी गहिवरून आले होते.

'तुम्ही हे खरं म्हणता? माझ्या कानांवर माझा विश्वासच बसत नाही!' तो पुढे म्हणाला, 'मी आता खरं सांगतो तुम्हाला. खरोखर कॉलनीच्या बाहेर गेल्यावर मला मुळीच चैन पडत नव्हतं खाता-पिताना, काम करीत असताना, स्वस्थ बसलो असताना मला सारखी कॉलनीची आठवण येत असे आणि कधी कधी मोठ्यानं रडावंसं वाटत असे! मला कॉलनीचं कमालीचं वेडच लागलं होतं—आपण कॉलनीशिवाय राहू शकणार नाही. कॉलनीला विसरायचा मी खूप प्रयत्न केला; पण ते मला कधीच शक्य झालं नाही. मी शेवटी मनाशी ठरवलं की, एकदा येऊन तुम्हा सान्यांना भेटायचंच म्हणून मी परत आलो. तुम्हा सान्यांना बघण्यासाठी आणि भेटण्यासाठी परत आलो! खरोखर इथं आल्यावर मला कमालीचा आनंद झाला. हे तुमचे नवे शेरेसाहेब तर छानच आहेत!'

'पण तुला एवढा त्रास करून घ्यायला कोणी सांगितलं होतं? लगेच परत यायचं!'

'ते सारं खरं हो! यावंसं तर वाटतच होतं; पण मधूनच आम्ही तुमच्याशी किती वाईट वागलो होतो त्याची आठवण होई!' असे बोलून तो एकदम थांबला.

'जाऊ दे ते. सगळं काही ठीक होईल!'

सेमियानने मान हळूहळू वर करून माझ्याकडे पाहिले. 'आन्तोन-साहेब, तुम्ही कदाचित म्हणाल, मी काय सुंदर नाटक वठवतोय; पण खरं सांगू, मी कसा काय धडा शिकलो ते माझं मलाच माहीत आहे. तुमचा विश्वास बसतो कसा पण माझ्यावर?'

मी त्याला गंभीरपणाने सांगितले, 'माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे!'

'नाही. तुम्ही खरोखरीच सांगा की, तुमचा माझ्यावर विश्वास आहे?'

'मग जा मला विचारू नको; पण पुन्हा मागची पुनरावृत्ती करायची नाही ना?'

'पहा, तुमचा माझ्यावर खराखुरा विश्वास नाही!'

'वेडा आहेस! काही तरी डोक्यात भरवून घेऊ नकोस. हे बघ सेमियान, माझा सर्वांच्यावर विश्वास आहे. कोणावर कमी, कोणावर जास्त, कोणावर एक इंच, कोणावर दोन इंच, तर कोणावर एक फूट इतकंच!'

'मग माझ्यावर किती विश्वास आहे?'

'तुझ्यावर एक मैल लांबीचा विश्वास आहे!'

'पण माझा मात्र तुमच्यावर विश्वास नाही हं!' सेमियान गमतीने म्हणाला.

'बरं तुझी मर्जी. ते सारं पुरे आता. मी तुला दाखवतो,' असं म्हणून आम्ही डॉरमिटरीकडे गेलो.

पहिल्या दिवसापासूनच काराबानोव शेरेसाहेबांचा उजवा हात झाला. तो जातिवंत शेतकरीच होता. त्यानं शेतीविषयक पुष्कळच माहिती मिळविलेली होती आणि शेतीचे ज्ञान जणू काही त्याच्या नसानसातनं त्याच्या वाडवडिलांपासून वारसाहक्काने मिळालेले होते. त्याचबरोबर शेतकीविषयक नवीन नवीन कल्पनाही तो चटकन् आत्मसात करीत असे. तंत्रशुद्ध शेतीची त्याला आवड होती.

काराबानोव शेरेच्या पावलावर पाऊल टाकून वागत होता. शेरेची प्रत्येक हालचाल तो डोळसपणाने पाहत असे. शेरेची सतत काम करण्याची वृत्ती व आवड त्याने आत्मसात केली होती. फक्त

शेरेसाहेबांचा थंडपणा त्याने घेतला नव्हता. याउलट काराबानोवचा उत्साह आणि धांदल ओसंडून जात असे. कधी कधी त्याच्या वागणुकीत उच्छृंखलपणा येत असे.

दोन आठवड्यांनंतर मी एक दिवस त्याला माझ्या ऑफिसात बोलावला आणि त्याला सांगितले,

'हे बघ, तुझ्याकडे हे आज्ञापत्र घे आणि अर्थखात्याच्या कचेरीत जाऊन ५०० रुबल घेऊन ये!'

हे ऐकून काराबानोवचा चेहरा खर्रकन् उतरला. तो डोळे विस्फारून माझ्याकडे बघतच राहिला. चाचरतच तो मला म्हणाला, '५०० रुबल? त्याचं काय करायचं म्हणता?'

'काही नाही. ते घेऊन माझ्याकडे यायचं!'

'मी घोड्यावरून जाऊ का?'

'अर्थात, आणि हे पिस्तूल जवळ असू दे. तुला जरूर पडली तर याचा वापर कर!'

मिट्यागिनच्या कमरपट्ट्यातून काढलेले तेच पिस्तूल मी काराबानोवच्या हाती दिले. अजूनही त्याच्यात ती तीन काडतुसे तशीच शिल्लक होती. त्याने पिस्तूल झटकन् हातात घेतले आणि आपल्या खिशामध्ये ठेवले. काही न बोलता तो माझ्या खोलीतून बाहेर पडला. दहा मिनिटांनी मी घोड्याच्या टापांचा आवाज माझ्या ऑफिसच्या खिडकीकडून जाताना ऐकला.

संध्याकाळी काराबोनोव माझ्या खोलीत आला. त्याने अंगात ते त्याचे लोहाराचे कातडी जाकीट घातले होते. तो शांत झालेला दिसत होता; परंतु एकंदर घामेजलेल्या चेहऱ्याने त्याने काही एक न बोलता ते नोटांचे बंडल आणि पिस्तूल माझ्या टेबलावर ठेवले.

मी ते नोटांचे बंडल हातात घेतले आणि अगदी तिऱ्हाईतपणे कोणतीही चलबिचल न दाखविता त्याला विचारले, 'नोटा मोजून घेतल्या आहेस ना?'

'होय!' तो म्हणाला.

मी मग, ते नोटांचे बंडल माझ्या ड्रॉवरात टाकले.

'शाबास! जा आणि आता जेवून ये!'

काराबानोवने आपल्या कमरेच्या पट्ट्याशी उगीचच चाळवाचाळव केली. जाकिटाशी पण चाळा केला. खोलीत एक-दोन येरझारा घातल्या आणि 'ठीक आहे!' असे म्हणून तो खोलीच्या बाहेर पडला.

दोन आठवडे असेच निघून गेले. मला जेव्हा जेव्हा तो भेटे त्या त्या वेळी जरा विचित्रपणाने मला अभिवादन करीत असे; परंतु त्याची एकंदर मनःस्थिती ठीक दिसत नव्हती.

मी पुन्हा एकदा त्याला पैसे आणण्यासाठी पाठवायचे ठरवले. या वेळी मी त्याला २००० रुबल आणायला सांगितले.

त्याने माझ्याकडे फारच चमत्कारिकपणे पाहिले. पिस्तूल खिशात ठेवून सावकाशपणे तो मला म्हणाला,

'२००० रुबल? समजा. मी परत नाही आलो तर?'

मी माझ्या खुर्चीवरून उठून त्याच्या अंगावर खेकसलो, 'मला बडबड नकोय! मुकाट्यान सांगितलेलं काम कर! तुझं ते मानसशास्त्र मला नकोय!'

'बरं, ठीक आहे!' तो खांदे उडवीत म्हणाला.

त्याने सांगितल्याप्रमाणे पैसे आणले; पण तो बराच वेळ मला सतावीत राहिला.

'आन्तोन, ते पैसे मोजा पाहू!'

'कशासाठी मोजायचे?'

'पण मी सांगतोय ना!'

'तू मोजले आहेस ना?' मी विचारले. तरीही तो ते मी मोजावे म्हणून आग्रह धरू लागला. तो ऐकेना तेव्हा मी त्याला सांगितले,

'तू नीघ पाहू इथून!'

त्याने आपली मान दोन हातात धरली. जणू काही घशात काही तरी अडकल्यासारखे वाटत असावे. त्याने आपली कॉलर उडविली आणि माझ्यासमोर उभा राहून तो म्हणाला,

'तुम्ही मला बनवायला बघता. तुमचा माझ्यावर खरा विश्वास नाही. तुम्ही खरोखरी जाणूनबुजून स्वतःला धोक्यात घालीत आहात!' एक निःश्वास सोडून, मरगळून तो खुर्चीवर बसला.

'तुझ्या या कर्तबगारीबद्दल मला एकंदर मोठीच किंमत द्यावी लागणार आहे!' मी म्हणालो.

'किंमत कसली द्यावी लागणार?'

'तुझ्या या सगळ्या विचित्रपणाबद्दल!'

त्याने खिडकीचा आधार घेऊन 'आन्तोन सेमियानोविच!' असे म्हटले.

मी त्याला रागातच विचारले, 'काय झालं तुला?' आता मात्र मला त्याची खरोखरीच भीती वाटली.

'तुम्हाला माहीत आहे का, साऱ्या रस्त्यानं घोड्यावरून येताना माझ्या डोक्यात हजारो कल्पना येऊन गेल्या. खरोखरीच देव कुठंही असला तर त्यानं माझ्यावर कुणाला तरी हल्ला करायला सोडावं. कितीही जण असू देत! एक जण असो किंवा दहा जण असोत. मी साऱ्यांचा समाचार घेईन! माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी माघार घेणार नाही! मी अक्षरशः रडलो. माझ्या मनात विचार आला की, 'तुम्ही इथं कल्पना करीत बसला असाल. मी खरोखरीच पैसे आणीन की नाही?' तुम्ही स्वतःला केवढ्या धोक्यात घातलं होतं? मी म्हणतो हे खरं आहे की नाही?'

'तू महाविक्षिप्त मुलगा आहेस! अरे, पैसे आणणं याच्यात नेहमीच धोका असतो. त्यातल्या त्यात या इथं पैसे घेऊन पोहोचणं हे खरोखरीच धाडसाचं काम आहे; पण माझी खात्री होती की, तू तरुण आहेस. चांगल्यापैकी घोडेस्वार आहेस. त्यामुळं तू केव्हाही दरोडेखोरांच्या हातून निसटू शकशील. याउलट मला काही ते सारं जमलं नसतं!'

'आन्तोन, तुम्ही खरोखरीच धूर्त आहात!' माझ्याकडे बघून डोळे मिचकावीत तो म्हणाला.

मी म्हटलं, 'त्यात धूर्तपणा कसला रे? हे पहा, पैसे कसे आणायचे हे तर तू शिकलास की नाही? इथून पुढं तूच पैसे आणायचं काम नेहमी करायचं. तुझ्याबद्दल माझ्या मनात काहीही शंका आली नाही. तू माझ्याइतकाच प्रामाणिक आहेस याबद्दल माझी खात्री होती! आता तरी तुला पटलं ना?'

'होय; पण माझ्या प्रामाणिकपणाबद्दल तुमच्या मनात शंका असेल असं मला वाटलं होतं.' असे म्हणून तो आनंदाने एक युक्रेनियन गाणे गुणगुणत माझ्या ऑफिसातून बाहेर पडला.

[क्रमशः]

माणसांना वाटणारच; पण मनात निर्माण होणाऱ्या शंका व्यक्त केल्याशिवाय हा लेख पूर्ण करता यायचा नाही.

१) ६६५ कोटी रुपयांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर बसवून आणि सक्तीची बचत आणखी दोन वर्षे चालू ठेवण्याचा निर्णय घेऊन १९७९-८० साली त्यातून उपलब्ध होणारे १६० को. रु. जमेस धरूनही अंदाजपत्रकातील एकूण तूट १३५५ को. रु. राहावी, तुटीचा अर्थभरणा कमी राखण्याचे सरकारी धोरण असूनही तो प्रतिवर्षी वाढत जावा, हे धोक्याचे आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांतच एकूण पाच वर्षांच्या काळात अपेक्षिलेल्या तुटीच्या अर्थभरण्यापेक्षा जास्त तुटीचा अर्थभरणा झाला आहे. पाच वर्षांत एकूण २२२६ को. रुपयांऐवजी पहिल्या दोन वर्षांत २४४५ को. रुपयांचा तुटीचा अर्थभरणा झाला आहे. १९७९-८० सालचा १३५५ को. रु. तूट तेवढीच राहाणे शक्य नाही- मग पंचवार्षिक योजना राहिली कुठे ?

२) अप्रत्यक्ष करात केलेली वाढ, सापेक्षतः श्रीमंतांवर पडेल असे सरकारचे म्हणणे आहे. एक तर या देशात 'विक्रेत्यांचा बाजार' निर्माण झालेला आहे. त्यामुळे कर बसविलेल्या वस्तूंच्या किंमती फक्त त्याच प्रमाणात वाढतील असे नाही. करापेक्षा किती तरी अधिक प्रमाणात किंमती वाढतात हा भूतकाळातला अनुभव आपण जमेस धरायचा नाही का ? एक एप्रिलनंतर करआकारणी अमलात यायची आहे; पण त्याआधीच बनारसी तंबाखूच्या पानापासून रॉकेल, साबण, बिस्किटे, चॉकोलेट यांच्या किंमती वाढल्याचे अगर बाजारातील त्यांचे स्टॉक्स् गायब झाल्याचे अनुभव आपण घेत आहोत. शिवाय फक्त करवाढ झालेल्याच वस्तूंच्या किंमती वाढत नाहीत. साऱ्याच वस्तूंच्या किंमती एकमेकांशी चढाओढ करीत वाढत जातात. सरकार किंमतवाढीबाबत जागरूक राहिले नाही तर अर्थव्यवस्थेवर अपेक्षित परिणाम घडवून आणण्यात हे अंदाजपत्रक असमर्थ ठरेल.

३) कॅपिटल गेन्सवरील सूट रद्द झाल्याने करचुकवेगिरी वाढू शकेल. या रकमा ठेवी म्हणून बँकांकडे जमा होणे बंद होईल. काळ्या पैशाची वीण वाढेल. आयुर्विमा, प्रॉव्हिडंट फंड, सी. टी. डी. वगैरे दीर्घमुदतीच्या बचतीत ठेवलेल्या पैशावर आयकरात दिलेल्या सुटीत बदल करून, अधिक उत्पन्न गटातील नागरिकांना त्यापासून वंचित करण्याच्या धोरणामुळे अल्पबचतीवर आणि आयुर्विमा धंद्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

४) नव्या उद्योगांची करमुक्ती गेली. कार्पोरेट उत्पन्नावरील सरचार्ज वाढला तरीही १९७८-७९ साली मिळालेला गुंतवणूकभत्ता चालू राहिल्याने चरणसिंगांच्या शेतकरी-अंदाजपत्रकानेही शेअर-बाजारात कुठल्याही प्रकारची घबराट निर्माण केली नाही. उलट अंदाजपत्रकावरील भांडवली बाजाराची प्रतिक्रिया 'फेव्हरेबल' थाटाचीच होती.

५) अंदाजपत्रकी वर्षात वार्षिक योजनांवरील खर्च १२५११ को. रु. होणार आहे. गतसालापेक्षा ही रक्कम ७·४ टक्क्यांनी अधिक आहे; पण ग्रामीण अर्थव्यवस्थेला विकासगती देऊन रोजगारवाढ, उत्पादनवाढ, दारिद्र्यहटीकरण करण्याचे अंदाजपत्रकातील उद्दिष्ट पाहाता ही रक्कम किती तरी थिटी वाटते ! वार्षिक योजनाखर्चात १९७७-७८ साली २७ टक्के तर १९७८-७९ साली १७ टक्के वाढ करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर या वर्षी विकासदर कायम राहाण्याऐवजी घटण्याची भीती वाटते.

६) शेतकऱ्यांना आवश्यक अशा वस्तूंवरील अबकारी करात खूपच सुटी दिल्या गेल्या खऱ्या; पण खते, वीज, जलसिंचनासाठी पंप, जंतुनाशके व्याजदरातील सुटी या साऱ्या गोष्टी हरितक्रांतीमुळे आपले उखळ पिवळे करू निघालेल्या श्रीमंत शेतकऱ्यांनाच फायदेशीर ठरणार आहेत हे उघड आहे. तळातल्या शेतकऱ्यांचा अगर भूहीन शेतमजुरांचा यांतून कोणता फायदा साधणार ? शेतमालाचे उत्पादन वाढून अगर रिकाम्या वेळी उद्योग मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढल्याने औद्योगिक उत्पादनांच्या मागणीत वाढ होईल व त्या क्षेत्राच्या विकासाला गती मिळेल, असे म्हणावे तर विविध टिकाऊ व आवश्यक गरजांच्या वस्तूवरील अबकारी करात वाढ करून त्या अपेक्षित मागणीलाही खो दिला गेला आहे. वर उल्लेखिल्याप्रमाणे सर्वच किंमतीत वाढ झाली व कृषी व ग्रामीण क्षेत्रातही मूठभर श्रीमंत शेतकऱ्यांचेच उखळ पिवळे झाले तर किसानांच्या नेत्याचे उपपंतप्रधान असलेल्या अर्थमंत्र्यांचे किसानांना झुकते माप देणारे अंदाजपत्रक, श्रीमंत शेतकऱ्यांकडे झुकणारे असेच ठरेल, अशी भीती वाटते. ◘

# 'कुलक बजेट' म्हणून हेटाळणी करणाऱ्यांना ग्रामीण विकासाचे-शेतीचे वास्तव ज्ञान नाही

## शांताराम बोकील

चरणसिंगांनी यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यासाठी काही करमाफीच्या सवलती जाहीर केल्या. खतावरील कर कमी करणे, शेतीच्या डिझेलवरील कर कमी करणे, कच्चा तंबाखू करमुक्त करणे, शेती पुनर्वित पुरवठ्यावरील व्याजाचा दर एक टक्क्याने कमी करणे, आयात पॉवर टीलरवरील कर माफ करणे असे या सवलतीचे स्वरूप आहे. कराच्या रूपाने शेतकऱ्यांचा काही कोटी रुपयांचा फायदा यामुळे होणार आहे.

पण हे करीत असतानाच त्यांनी इतर ६६५ कोटी रु. ची करवाढ केली आहे व १३५५ रु. ची अंदाजपत्रकी तूट तशीच राखली आहे. या करवाढीची झळ सर्वांनाच लागणार असली तरी मुख्यतः साबण, सौंदर्यप्रसाधने, फ्रीज, पेट्रोल व डिझेल, गॅस सिलिंडर, किंमती रेडिओ व स्टिरिओफोनिक सामुग्री, सिगारेटी अशा वस्तूंवरील वाढीव कराने उच्च मध्यमवर्गीय मंडळी चरणसिंगांवर बरीच खवळली

आहेत. आयकरात वाढ झाल्याने त्यांचा राग अधिक तीव्र बनला आहे. त्यामुळेच कदाचित असावे, चरणसिंगांना देऊ केलेल्या करसवलतीविरुद्ध ही मंडळी व त्यांच्या जोडीचे अनेक अर्थतज्ज्ञ, पत्रकार, प्राध्यपक जोरदार काहूर उठवून राहिले आहेत.

वास्तविक तसे पाहिले तर ७५ टक्के लोक शेतीशी संबंधित आहेत. या हिशोबाने चरणसिंगांनी त्यांना दिलेली कराची सवलत दर शेतकरी व्यक्तीमागे सालिना जेमतेम एक रुपयाही होत नाही. शिवाय चरणसिंगांनी जे देऊ केले त्याहून अधिक सवलती शेतीला द्यायला हव्यात इतका शेतकऱ्यांचा शेतीचा खर्च व उत्पन्नाचा ताळेबंद तोटयाचा होऊन बसला आहे. कारण गेल्या दोन वर्षांत शेतीमालाचे भाव इतके घसरले आहेत की, शेतीधंद्याचे व शेतकऱ्याचे दिवाळेच वाजायचे बाकी आहे. करसवलती देऊनही शेतीमालाच्या भावाची हीच स्थिती राहिली तर कोणत्याही शेतकऱ्याला शेतीत अधिक उत्पन्न काढावे अशी इर्षा वाटणार नाही. तेव्हा चरणसिंगांनी शेतकऱ्याला शेतीउत्पादनासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंवरील कर पूर्णपणे उठवले असते तरी काही बिघडण्याचे कारण नव्हते.

चरणसिंगावर होणाऱ्या टीकेत सर्वांत मोठी टीका केली जात आहे की हे 'कुलक बजेट' आहे. कुलक म्हणजे श्रीमंत शेतकरी. चरणसिंगांनी शेतीला दिलेल्या सवलतीचा लाभ फक्त श्रीमंत शेतकऱ्यांना होणार आहे व मध्यम व छोटया शेतकऱ्यांना काहीच लाभ नाही, असा त्यांचा रोख आहे. कारण खते, डिझेल पंप, पॉवर टिलर बडे शेतकरीच वापरतात. कच्च्या तंबाखूवरील कर उठविण्याचा प्रश्न कुणी काढीत नाही. कारण छोटे शेतकरी तंबाखू पिकवितात व त्यांची संख्या काही लाख आहे. त्यामुळे 'कुलक, कुलक' ओरडता येत नाही. अर्थात खरा राग आहे तो शहरी श्रीमंत व पगारदारांना त्यांच्या उच्च राहणीसाठी 'आवश्यक' वस्तूंवरील कर वाढला याचा. तो राग समजू शकतो; पण त्यासाठी वेगळा युक्तिवाद करणे अवघड नाही. उदाहरणार्थ, १३५५ कोटींची तूट खपू शकते तर १९७५ कोटींची तूट अर्थमंत्र्यांनी खपवून घ्यायला हरकत नव्हती किंवा लखपती–करोडपतींच्या खिशातून आणखी रक्कम काढायलाही हरकत नव्हती. चरणसिंगांना हे करता आले असते. ते त्यांनी का केले नाही, त्यांचे त्यांनाच माहीत; पण त्यामुळे विनाकारण शेतकऱ्यावर आगपाखड चालू आहे. विशेष म्हणजे अर्थमंत्री आणि अर्थतज्ज्ञही कबूल करतात की, गेली दोन वर्षे अर्थसंकल्पीय तूट असूनही भाववाढ व चलनवाढ झाली नाही. कारण शेतीचे उत्पादन प्रचंड वाढले. म्हणजेच अर्थशास्त्रीय भाषेत चलनातील वाढलेल्या नोटांच्या किमतीइतक्या किमतीचा माल शेतीने निर्माण केला. अनेक वर्षे जे उद्योगक्षेत्राला करणे शक्य झाले नाही ते शेती व शेतकऱ्यांनी करून दाखविले. यंदाही शेती ते करून दाखवील. पुढील वर्षीही त्यासाठीच चरणसिंगांनी व शंकरराव चव्हाणांनी शेती व शेतकऱ्यांना दिलेल्या सूट–सवलतीचे उलट स्वागत व्हायला हवे.

अर्थमंत्र्यांनी करवाढ करण्याऐवजी किंवा वस्तूंची निवड करताना तारतम्य राखायला हरकत नव्हती; पण त्यांनी ते केले नाही. याचा राग बिचाऱ्या शेतकऱ्यावर कशासाठी ? 'कुलक बजेट' (?) कुठे आहे तो कुलक ? कोण हा कुलक ? तो आहे रशियन शब्द ! स्तालिनने कुलकांचे उच्चाटन केले म्हणून इतरांना माहीत झालेला ! किती होते ते ? एक कोटी शेतकरी कुटुंबे–त्यांना सैबेरियाच्या थंडीत 'जगण्यासाठी' पाठवण्यात आले. त्याचा अपराध–'नेप'च्या काळात (नवे आर्थिक धोरण) शेती उत्पादनात प्रचंड वाढ करून त्यांनी रशियन जनतेला उपासमारीच्या संकटातून बाहेर काढले. स्तालिनने कुलकापाठोपाठ छोटया–मध्यम शेतकऱ्यांच्या जमिनींचेही 'राष्ट्रीयीकरण' केले व त्यांना सरकारी व सामुदायिक शेतीवर 'चाकर' बनवले; पण त्याने शेतीप्रमाणेच उद्योगधंद्यांचेही राष्ट्रीयीकरण केले. थोडक्यात शहरी बडया–छोटया कुलकांचाही मागमूस ठेवला नाही. इथे शहरी 'कुलक' ग्रामीण 'कुलकांवर' तुटून पडू पाहत आहेत.

केंद्र व महाराष्ट्र सरकारने शेती व शेतकऱ्यांना दिलेल्या सवलतींचा लाभ फक्त श्रीमंत शेतकऱ्यांनाच मिळणार आहे हे खरे नाही. या उलट उत्पादन–खर्च कमी झाला तर छोटा–मध्यम शेतकरीच आधुनिक शेतीकडे अधिक मोठया प्रमाणात वळेल. त्यालाच या गोष्टीची अधिक गरज आहे. कारण त्याच्याजवळील दोन–तीन एकराच्या तुकडयात त्यालाच अधिक उत्पादन काढून कुटुंबाला आणखी सुखी करण्याची गरज आहे. त्यासाठी त्याला कर्ज, खत, बी, अवजारं, पाणी, वीज, डिझेल स्वस्त हवे. या गोष्टी तो कमी वापरत असेल तर तेही त्या महाग असल्याने व शेतीमालाला रास्त भाव नसल्याने त्याला त्या वापरणे परवडत नाहीत म्हणूनच !

त्याची ती मागणी काही प्रमाणात पूर्ण झाली आहे; पण फ्रीजवर व टूथपेस्टवर कर बसवा असे काही त्याने अर्थमंत्र्यांना सांगितले नाही, की रेल्वेमंत्र्यांना पासाचे दर वाढवायला सांगितलेले नाहीत. हा मंत्र्यांचा वा त्याला सल्ला देणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांचा दोष आहे. गेल्या तीस वर्षांच्या अर्थसंकल्पांनी व योजनांनी अनेक चांगल्या गोष्टी करूनही शेती धंद्याला व शेतकऱ्याला समजून घेण्याचा कधी प्रयत्नच केलेला नाही. भांडवलदार व व्यापारी यांच्या व दुसरीकडे समाजवाद व सामाजिक न्यायाचा उच्चार करीत 'कुलक, कुलक' म्हणून शेतकऱ्याला ठोकून काढणारांच्या कैचीत तो आहे. त्यांच्या भूमिकांचे मिश्रण म्हणजेच आजचे शेतीविषयक धोरण ! दोघांचे तत्त्व एकच–शेती व शेतकऱ्याला मालाची रास्त किंमत न देणे. का (?) कशासाठी ?

हे समजून घेण्यासाठी औद्योगिक विकासासाठी मागास देशात भांडवल जमा होण्याच्या प्रक्रियेकडे वळावे लागेल. कारण अशा देशात फक्त उपलब्ध शेतीच काही महिन्यांच्या अवधीत नवी संपत्ती म्हणजे नवे भांडवल निर्माण करीत असते. इतर औद्योगिक प्रकल्प उभे व्हायला व त्यातून लाभ व्हायला किमान ५ ते १० वर्षे लागतात. वसाहतीतल्या शेतीत निर्माण होणारी संपत्ती लुटूनच मॅन्चेस्टर उभे राहिले. (इति मार्क्स) भारतीय सरकार व कारखानदार व्यापारी तेच करून राहिले आहेत आणि साम्यवादी देशातील सामुदायिक शेतीपद्धतीही त्याचसाठी आहे. ती म्हणजे शेतीमालाच्या किमती चढू न देणे, स्वस्तात स्वस्त तो माल विकणे शेतकऱ्याला भाग पाडणे. शहरी कामगार, मध्यम वर्गीयांनाही जीवनावश्यक वस्तू स्वस्त हव्या असतात. ती मंडळीही अप्रत्यक्षपणे व नकळत या लूटमारीशी सहभागी होतात. सरकारी व खाजगी सर्व मालकांचाही यात प्रत्यक्ष फायदा असतोच. कारण शहरी राहणीमान निर्देशांक कमी राहिल्याने त्यांना वेतन कमी द्यावे लागते.

म्हणजे भांडवलशाही, समाजवाद, साम्यवाद वा मिश्रवाद कोणत्याही तत्त्वज्ञानात भारतातील शेतकऱ्यांची लुबाडणूक चुकू शकत नाही.

अर्थात शेतीविकासाचे प्रयत्न होत नाहीत असे नाही. कारण वाढीव शेतीउत्पादन सर्वांनाच हवे. त्याशिवाय अर्धी कारखानदारी चालणार नाही, कामगार जगणार नाहीत, मंत्रीही जगणार नाहीत व बुद्धिमंतही आणि शेतकरी व शेत मजूरही. कारण पोट सर्वांनाच आहे. वस्त्र सर्वांनाच हवे. दूध बऱ्याच प्रमाणात हवे...तेव्हा शेती विकासाच्या व उत्पादन वाढीच्या योजना धुमधडाक्याने आखल्या जाणे स्वाभाविकच आहे. शेतकऱ्यांनाही त्या हव्यात. खरा प्रश्न व समस्या आहे, ती उत्पादित शेतीमालाला उत्पादनखर्चाधारित वाजवी किंमत मिळण्याची.

पश्चिम युरोपीय देश, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व जपान वा औद्योगिक प्रगत देशांनी हा प्रश्न सोडविला आहे. युक्त बाजारपेठ असूनही तिथे सरकार, सामाजिक बाजारपेठ शेतीउत्पादनाच्या किंमती शेतकऱ्याला ठरवून देतात. शेतकऱ्याचा उत्पादनखर्च व त्याची वाजवी प्राप्ती यांचा हिशेब करून ! पण ७५ टक्के जनता जिथे शेतीधंद्याशी निगडित आहे त्या भारतात फक्त 'जय किसान' घोषणा होतात. शेती मालाच्या किंमती ठरवण्याचा व त्याचा उत्पादन-खर्च कमी करण्याचा प्रश्न आला की 'कुलक बजेट' म्हणून गोंगाट केला जातो. 'हरितक्रांती'ने शेतकरी गबर झाल्याचा ओरडा सुरू होतो. जिरायत शेतकरी व शेतमजुरांविषयीचा कळवळा व्यक्त करून बागायत शेतकऱ्यांवर अस्त्र उगारले जाते; पण जिरायत शेतकऱ्याच्या प्रगतीची योजना वा त्याच्या धान्याला रास्त भाव याचा विचार करायची तयारी तरी कुठे आहे ?

कारण मूलतः भारतीय शेती व शेतकरी आणि सर्व थरांतील ग्रामीण जनता यांच्या विकासाविषयी सर्वांकडेच 'कल्पनादारिद्र्य' आहे. अर्थशास्त्राच्या उपलब्ध पुस्तकाबाहेर व सिद्धान्ताबाहेर जाण्याची कुणा बुद्धिमंताचीही तयारी नाही. इथल्या भांडवलदार व्यापाऱ्यालाही त्याला 'सोन्याचे अंडे देणारी कोंबडी' जगावी असे वाटत नाही. सरकारमध्ये जमा होणाऱ्या सवरंगी प्रतिनिधींच्या घोळक्यात व उंच हवेल्यात शेतकऱ्याचे प्रतिनिधीही स्वतःला हरवून बसतात. समाजवादाचा घोषा करणारांना समाजाचीच माहिती नाही आणि दुर्बल घटकांचे प्रतिनिधी वा रक्षक म्हणवणाऱ्यांना नेमके काय हवे हेच समजू शकत नाही. ग्रामीण विभागातील भूमिहीन व दलितांचे तीस वर्षे केंद्रात वजनदार मंत्री असलेले नेते म्हणतात, ग्रामीण विकासासाठी जास्त पैसे खर्च केले तर खेड्यांतील विषमता वाढेल, हरितक्रांतीने ती वाढली. जण काही तीस वर्षांत शहरात विषमता वाढलेलीच नाही. औद्योगीकरणाने विषमता वाढली तरी निदान रोजगार उपलब्ध झाले; पण खेड्यात तो वाढताच कामा नये, मग रोजगाराविना गरीब माणसे अर्धपोटी राहिली तरी चालतील.

आता आर्थिक विषमतेबद्दलच बोलायचे तर कम्युनिझमचे तत्त्वज्ञान पटो वा ना पटो, पण कम्युनिस्ट स्वतःच्या तत्त्वाशी तरी इमानदार आहेत असे म्हणता येईल; पण ज्याचा मिश्र अर्थ-व्यवस्थेवर विश्वास आहे, ज्यांना व्यक्तिगत मालकीची शेती असलेला शेतकरीवर्ग हवा आहे, त्यांचे काय ? आणि असे शेतकरी देशात कित्येक कोटींनी आहेत. त्यांच्याकडे सरासरी एक हेक्टरही जमीन नाही. त्यांच्याशिवाय करोडो भूमिहीन आहेत. या भूमी-हीनांना देण्यासाठी फारशी जमीनही उपलब्ध नाही. कुलक व बडे जमीनमालक यांच्याकडील जमिनीचे सर्व क्षेत्र वाटून टाकले तरी सर्व भूमिहीनांना प्रत्येकी एक एकर जमीन वाटणीला येणार नाही. अशा स्थितीत, शेती व शेतकऱ्यांच्या विकासाच्या प्रत्येक उपाय-योजनेची 'कुलक योजना' 'कुलक बजेट' अशी हेटाळणी करणारांना शेतीबाबतची वस्तुस्थितीच माहीत नाही, असे म्हणणे भाग आहे.

शेती हाही एक धंदा आहे. तो करणाराकडे किमान किफायतशीर क्षेत्र असायला हवे. त्याशिवाय आधुनिक पद्धतीची शेती तो करू शकणार नाही. त्याचबरोबर उत्पादनखर्चाचा हिशोब करून त्याच्या मालाची किंमत ठरली पाहिजे—कारखान्याच्या मालाची किंमत ठरते त्याप्रमाणे. शेतीमालाचे भाव सर्वांच्या आटोक्यात राहणे हीही या देशाची गरज आहे. तर मग शेतीचा खर्च किमान पातळीवर आणला पाहिजे. त्यासाठी शेतीउत्पादनासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू करमुक्त केल्या पाहिजेत व सरकारने त्यांच्याही वाजवी किंमती ठरवून दिल्या पाहिजेत. असे केल्यानेच शेती व शेतकरी सध्याच्या संकटातून वाचू शकतील.

चरणसिंगांनी व महाराष्ट्राच्या सरकारने याच दृष्टिकोनातून शेती व शेतकऱ्यांना सूट—सवलती देऊ केल्या आहेत. ही वस्तुस्थिती समजून न घेता, अर्थसंकल्पातील अन्य करवाढीचा शेतकऱ्याशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करणेही दिशाभूल होय. शेवटी पुन्हा जुनाच मुद्दा फक्त शेतकरीच अधिक उत्पादन करून चलनवाढ रोखून धरू शकतो. त्याला उत्पादनवाढीला उत्तेजन दिले नाही तर चलनवाढीने संपूर्ण शहरी जीवनच विस्कळित होईल.

('नागपूर पत्रिका' वरून)


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा वेगळा शोध**

**प्रभावी, परखड आणि प्रामाणिक**

**जनांचा प्रवाहो चालिला**

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

मूळ किमान पगारावर आठ टक्के वाढ देण्यात आली. यानंतर प्रत्यक्ष संप चालू असताना तो संप फोडण्यास मदत व्हावी यासाठी संपाच्या सत्ताविसाव्या दिवशी महागाईभत्त्याचा एक नवा करार संघ व मालकांनी जाहीर केला. या करारानुसार चारशे रुपये मूळ पगार होणाऱ्या कामदारांना त्यांच्या श्रेणीतील पगाराच्या प्रमाणात महागाईभत्ता देण्याचे मान्य करण्यात आले. अशा रीतीने वाढत्या पगाराबरोबर वाढत्या महागाईचे नवे तत्त्व कापडधंद्यात अस्तित्वात आले. यापूर्वी कापड-कामगारांना ग्राहक निर्देशांकाच्या प्रमाणात किमान पगारावर एकच महागाईभत्ता मिळत होता. नव्या करारानुसार डॉफरबॉय आणि ४ व ६ बाजूवाले आणि बिगारी व ४ साचेवाले यांना निरनिराळे महागाईभत्ते लागू झाले. आज डॉफरबॉय व बाजूवाला यांच्या महागाईभत्त्यात चाळीस रुपयांचा फरक आहे. संप झाला नसता तर हे पदरी पडले नसते. अखेरच्या तडजोडीने चारशे रुपयांवरील मूळ पगारवाल्यांना, जॉबर मंडळींनाही महागाईचे हे नवे तत्त्व लागू करण्यात आले. शिवाय दरवर्षाला चार रुपयांप्रमाणे तीन वर्षांची पगारवाढ प्रातिनिधिक संघटनेला बाजूला ठेवून, संपवाल्या संघटनेतील गिरणी कामगार युनियनशी बोलणी करून मान्य करावी लागली.

### न सुटलेले प्रश्न

या झाल्या संपाच्या जमेच्या बाजू. गिरणी-कामगारांचे इतर प्रश्न मात्र या संपात सुटू शकले नाहीत. प्रत्येक कामगाराचे काम कोणते, ठरलेल्या कामाचे व ताटातुटीचे प्रमाण काय, सूतयंत्रसामुग्री, प्रकाश इत्यादींच्या व्यवस्थेतील सुधारणा, कामगारावर कामाचा बोजा किती टाकावा. म्हणजेच कामाचे नवे स्टँडर्ड ठरविणे वगैरे प्रश्न त्या संपातही अनिर्णितच राहिले. या विविध प्रश्नांविषयी मध्यंतरीच्या काळातही फारसे काही होऊ शकले नाही.

आता हा करार संपला आहे. १९७७ सालीच या कराराची मुदत संपली आणि कामगार नव्या पगारवाढीची, कामाच्या स्टँडर्डची मागणी करण्यास कायद्याप्रमाणेही मोकळे झाले. गिरणी-कामगारांतील प्रत्येक संघटनेला याची जाणीव आहे व नव्याने स्थापन झालेल्या गिरणीकामगारसभेसहित सर्व संघटनांनी नव्या स्टँडर्डची, नव्या सवलतींची मागणी आता केली आहे. गेल्या पंधरा–त्रीस वर्षांत नुकसानभरपाईच्या रकमांचे आमिष दाखवून गिरणी-कामगारांवर जवळजवळ प्रत्येक खात्यात जी अशास्त्रीय कामवाढ लादली आहे, नवी स्वयंचलित यंत्रसामुग्री बसवून कामगारांची जी ससेहोलपट सुरू केली आहे ती लक्षात घेता, पगाराच्या स्टँडर्डबरोबरच कामाच्या बोजाचे व कामाच्या परिस्थितीचे स्टँडर्ड होण्याला व करवून घेण्याला फार महत्त्व आहे. यासाठी या प्रश्नांवर गिरणी-कामगारांची गिरणवार व धंदाव्यापी खातेवार एकजूट उभारून व अशा एकजुटीचे पाठबळ घेऊन मुंबईतील गिरणी-कामगार बेमुदत संपाला तयार झाला आहे. संप झाला तर साठ गिरण्यांमधील कामकाज थंडावेल व परळ–लालबाग भागातून कामगारांचे जथे रस्त्यांवर दिसू लागतील. मुंबई गिरणी-कामगार युनियन, लाल बावटा मजदूर युनियन, कापड कामगार संघटना व गिरणीकामगार सभा या चार कामगार संघटना एकत्रित होऊन हा संप लढविणार आहेत. रा. मि. म. संघानेही या संपात सहभागी व्हावे असे आवाहन या संघटनांच्याकडून करण्यात आले आहे. या आवाहनाला प्रतिसाद मिळाला तर संप सुरू होईल तेव्हा रा. मि. म. संघही त्यात सामील झाला असेल. पगारवाढ, घरभाडेभत्ता इत्यादी आर्थिक मागण्यांबरोबरच कामाचे स्टँडर्ड ठरवा, सेवाज्येष्ठतेप्रमाणे बदली कामगारांना जातू करा, स्त्री-कामगारांसाठी पंधरा टक्के जागा राखून ठेवा, मुंबई औद्योगिक संबंध कायदा व अनुचित आचारबंदी कायदा हे दोन्ही कामगारविरोधी कायदे रद्द करा, सर्व कामगारांना गुप्त मतदानाचा हक्क देऊन कामगारांचे प्रतिनिधित्व ठरवा या इतर महत्त्वाच्या मागण्याही हा संप घडण्यामागे आहेत.

निरनिराळ्या गिरण्यांमधील अव्यवस्था, कामगारांवरील दडपशाही, राष्ट्रीकृत व आजारी गिरण्यांचे दुखणे, फिनिक्स मिलमधल्या बेकार झालेल्या कामगारांचा प्रश्न इत्यादी गोष्टींची पार्श्वभूमीही या संपामागे आहेच.

फिनिक्स मिलचा प्रश्न गेले दीड वर्ष धुमसतो आहे. ऑगस्ट ७७ मध्ये ही गिरणी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली व सुमारे सात हजार कामगार बेकार झाले. गिरणी बंद पडल्यावर जनता पक्षाच्या अनेक नेत्यांनी गिरणीला भेटी दिल्या. तेव्हा नव्या राज्यात या प्रश्नाची ताबडतोब सोडवणूक होणार अशी जबरदस्त अपेक्षा कामगारांत तयार झाली; पण प्रत्यक्षात काहीच घडले नाही. नंतर काही दिवसांनी 'टेक्स्टाइल'चे खाते व्यापारमंत्री धारिया यांचेकडून उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांचेकडे आले. गिरणीकामगार सभेचे पुढारी व जॉर्ज फर्नांडिस यांची नाती अगदी जवळची. त्यामुळे हा प्रश्न सुटणारच अशी खात्री वाटू लागली; पण तीही फोल ठरली! का तर म्हणे महाराष्ट्रात वसंतदादा पाटील यांचे सरकार होते आणि त्यांच्या आश्रयाने चालणाऱ्या राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या कारवायांमुळे अडचणी येतात असा प्रचार चालत असे. तोही अडथळा पुलोदचे शरद पवार यांचे सरकार आल्यावर नाहीसा झाला; पण तरीही गिरणी बंदच राहिली! आजारी गिरण्यांच्या राष्ट्रीयीकरण करण्याच्या कायद्याखाली मध्यवर्ती सरकारने गिरणी ताब्यात घेतली असती तर सात हजार कामगारांची आज होणारी उपासमार झाली नसती. आता ४ जानेवारीपासून सोळा महिने बंद पडलेल्या फिनिक्स मिलमधली काही खाती सुरू झाली आहेत व सात हजार कामगारांपैकी फक्त दोन हजार कामगारांना पुन्हा कामावर घेतले गेले आहे. या कामगारांनाही फक्त पंधरा दिवस काम दिले जात आहे. 'मला गिरणी चालवायची आहे,' या मालकांच्या आश्वासनापलीकडे निदान आज तरी ही गिरणी पूर्णतया आणि लवकर चालेल याची शाश्वती नाही. सरकारही गिरणी ताब्यात घ्यायला तयार नाही. तेव्हा गिरणी बंद पडल्याने बेकार झालेल्या पाच हजार कामगारांचे भवितव्य अंधारातच आहे.

डिलाइल रोडवरच्या सीताराम मिलचीही अशीच कहाणी. सप्टेंबर १९७६ ला या गिरणीतील ३६/४० चे २३६ साचे बंद झाले. या साच्यांवर निघणारे अरुंद पन्ह्याचे कापड बाजारात खपत नाही असे कारण मालकांकडून दिले गेले. मोठे साचे बसवायचे आहेत अशी आश्वासनेही त्या वेळी दिली गेली; पण शेवटी व्हायचे तेच झाले. जुने साचे तर बंद झालेच; पण नव्या साच्यांचाही पत्ता नाही अशी आजची स्थिती आहे. त्या साच्यांवरच्या जातू कामगारांना आता इतर खात्यात बदली करावी लागते आणि बदलीवाले रखडून शेवटी

सोडून गेले; इतर गिरण्यांत गेले किंवा बेकारांच्या वाढणाऱ्या तांड्यात सामील झाले. मालकाने कामगारांना शेवटपर्यंत नसते आश्वासनांवर झुलवले आणि शेवटी 'आम्हाला ते साचे बंद करून जागा मोकळी करायची आहे,' असे सांगितले.ते व्हापासून दर चार-सहा महिन्यांनी 'कापूस नाही,' 'मागणी नाही'च्या नावाखाली गिरणी बंद पडायच्या बेताला येण्याचे प्रकार सुरू झाले. मध्यंतरी रशियाची मागणी होती. त्यामुळे गिरणी बरी चालली होती; पण करारात ठरल्याप्रमाणे कापड न पाठविल्यामुळे करार तुटला आणि गिरणीची घरघर सुरू झाली. पुन्हा कापूस नाही, बीम नाही म्हणून सहाशे साचे बंद पडले.असे दोन महिने चालले. मालकांच्या या कारवायांमुळे कामगार जेरीला आले आहेत. राबराबून शोषण होतेच,त्यात पुन्हा हे प्रकार. अंगावरचा पगार व भरपगार नेहमीच तुंबून रहातो. सोसायटीचे १३॥ लाख रुपये मालकाने भरलेच नाहीत. ग्रॅच्युइटी २–२॥ वर्षेपर्यंत मिळत नाही. मालक विमा योजना, वीज, पाणी यांचे पैसे वेळेवर भरत नाही. प्रॉव्हिडंड फंडाची थकबाकी आहेच. गिरणी सुरळीतपणे चालेल याची शाश्वती असण्याचे एकही कारण दिसत नाही. गिरणीच्या आवारातल्या मोकळ्या जागा मालकाने आधीच विकल्या आहेत. त्यावर इंडस्ट्रियल इस्टेट्स उभ्या राहिल्या आहेत. आणखी असेच काही करण्याचा विचार असण्याचीही बरीच शक्यता आहे. गिरगावात तसा इतिहास घडला आहे.

## मधुसूदन, चायना, सुपारीबाग

श्री. मधुसूदन मिल्सचे नाव गेली तीन वर्षे आजारी गिरण्यांच्या यादीत गाजते आहे. आजारीपणाच्या नावाखाली गेली दोन वर्षे मालकांनी पहिल्या पाळीतील कपडाखाते कायदेशीर वेळेच्या आधी जवळजवळ पंचेचाळीस मिनिटे चालू करण्याचे धोरण स्वीकारले आहे आणि जॉबरमंडळींना हाताशी धरून, बक्षिसाचे आमिष दाखवून साचेवाल्यांवर दडपशाही करणे व उत्पादन काढून घेणे हे आज दोन वर्षे चालू आहे. यामुळे पहिल्या पाळीच्या कामगारांना आठ तासांहून अधिक काम करावे लागते व महागाईभत्ता मात्र फक्त आठ तासांसाठीच मिळतो. कामगार कमिटीने याबाबतीत फॅक्टरी इन्स्पेक्टरकडे अनेक वेळा तक्रार करूनही त्याबाबत काही हालचाल झालेली नाही. एकदा इन्स्पेक्टरने प्रत्यक्ष येऊन पहाणी केली व अनेक कामगारांची मुलाखत घेऊन बेकायदेशीरपणाचा पुरावा गोळा केला. मात्र मालकांविरुद्ध अद्याप कोणतीही कारवाई केली गेली नाही.

चायना मिलमध्ये पॉवरलुमचे जुने १८० साचे काढून त्याऐवजी १८० ॲटोमॅटिक साचे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे १६२ जातू कामगारांना नोकरीला मुकावे लागणार आहे. अंदाजे १२० बदली कामगारांच्या नोकरीचा प्रश्न उभा राहिला आहे. संघाने या नव्या बदलाबाबत करार केलेला नाही. म्हणूनच या प्रश्नाबाबत कामगारांनी जागरूकपणे चळवळ उभी केली आहे. यंत्रांच्या आधुनिकीकरणाला कामगारांचा विरोध नाही. त्यांचे म्हणणे एवढेच आहे की, जाणाऱ्या कामगारांना नुकसानभरपाईसह इतर सर्व हक्क मिळाले पाहिजेत. तसेच जे कामावर राहू इच्छितात त्यांना नव्या यंत्रावर शिकण्याची संधी मिळाली पाहिजे व त्या शिक्षणाच्या काळातसुद्धा जातू व बदली कामगारांना पूर्ण पगार मिळाला पाहिजे. नव्या यंत्रावर आठ साच्यांहून अधिक साचे चालविण्याची सक्ती करण्यात येऊ नये. या मागण्यांसाठी १६ डिसेंबर ७८ रोजी रामचंद्र दुरविळी यांनी साच्यावर आडवे पडून दोन तास साचे काढण्यास विरोध केला; परंतु सर्व कामगारांचे बळ अपुरे पडले व काही साचे काढले गेलेच. नंतर बदली कामगारांच्या प्रश्नावरही तोडगा निघू शकला नाही. अजूनही निर्णय झालेला नाही.

सुपारीबागमधल्या कपडाखात्यातील कामगारांचा संघर्ष दोन वर्षांपूर्वी सुरू झाला. ही सरकारी गिरणी असली तरी गिरणीची परिस्थिती अतिशय वाईट आहे. साचे जुने, प्रकाश अपुरा, साच्याभोवती फिरायला अडचण अशा अवस्थेत कामगारांना काम करावे लागते. अनेक वेळा तक्रारी करूनही गिरणीच्या व्यवस्थेत सुधारणा केली गेली नाही. जाडेभरडे कापड काढण्याची जबाबदारी सरकारने आता फक्त सरकारी गिरण्यांवर टाकलेली आहे. जुनाट अवस्थेतील साच्यांवर असे कापड काढण्यास त्रास होतो, दमछाक होते, कापड कमी येते. पगारही कमी येतो. कामगारांना होणाऱ्या या त्रासाचा विचार करण्याची काही गरज नाही, अशा तऱ्हेने मॅनेजमेंटचा व्यवहार चालला होता व चालू आहे. या सर्वांविरुद्ध सुपारीबागमधल्या कामगारांनी झगडायला सुरुवात केली आहे.

निरनिराळ्या गिरण्यांमधील अशा विविध प्रश्नांवर कामगारांमध्ये असंतोष होताच. त्यात आणखी राष्ट्रीय मिल मजदूर संघ व मिल मालक असोसिएशन यांच्यामध्ये घाटणाऱ्या कामगारांच्या पगारवाढीसंबंधातील कराराचा प्रश्नही कामगारातील चर्चेचा तीव्र प्रश्न झाला आहे. मुंबईतील कापड-कामगारांतील रा. मि. म. संघ या प्रातिनिधिक संघटनेव्यतिरिक्त या क्षेत्रात काम करणाऱ्या इतर सर्व संघटनांनी या प्रश्नावर ठराव, जाहीर पत्रके काढून व जाहीर सभा घेऊन आपआपल्या भूमिका यापूर्वीच जाहीर केल्या होत्या. या सर्व संघटनांनी नंतर एकमताने रा. मि. म. संघाला मुंबईच्या गिरणी कामगारांच्या वतीने करार करण्याचा अधिकार नाही, असा करार झाल्यास कापड-कामगार तो मानणार नाहीत, अशी भूमिका घेतली व पगाराचे, कामाचे व कामाच्या परिस्थितीचे नवे स्टॅंडर्ड झाले पाहिजे अशी मागणी केली. एवढेच नव्हे तर या मागण्या मिळविण्यासाठी गिरणी-कामगारांच्या एक दिवसाच्या निषेध-संपापासून ते बेमुदत संपापर्यंतचे उग्र आंदोलन करण्याच्या तयारीस त्या लागल्या.

भांडवलदारवर्गाचा अर्क असलेल्या मुंबईतील गिरणीमालकांशी सातत्याने लढण्याच्या परंपरेत गिरणी-कामगार वाढला आहे. गिरणवार तसेच धंदाव्यापी प्रदीर्घ संपलढ्यातून गिरणी-कामगारांचा पिंड घडला आहे. सगळ्या गिरणी-कामगारांना व्यापणारी भक्कम संघटना नसेल तर कोणत्याही मान्यताप्राप्त युनियनला रा. मि. म. संघाच्या मालकधार्जिणेपणाच्या राजमार्गाने जावे लागणार आहे, हे उघड आहे. हा धोका ओळखूनच इतर चार संघटना आता एकत्र आल्या आहेत. फेब्रुवारीच्या १३ तारखेला त्यांनी दोन लाख कामगारांचा यशस्वी संप घडवून आणला. हा एक दिवसाचा निषेध-संप होता व या संपाच्या वेळीच या संघटनांनी ठरविले होते की, पुढील एक महिन्याच्या आत वाटाघाटीतून काही निष्पत्ती झाली नाही तर बेमुदत सार्वत्रिक संपाच्या तयारीला लागायचे.

केमिकल, इंजिनिअरिंग, औषध-खत-कारखाने या इतर उद्योग-धंद्यातील कामगारांनी वेतनातील वाढ, घरभाडेभत्ता, प्रवासभत्ता व इतर सवलती यापूर्वीच पदरात पाडून घेतल्या आहेत. कापड-गिरण्या हा देशातला सर्वांत जुना उद्योगधंदा. डाव्या चळवळी या उद्योगधंद्यामधील कामगारांमधूनच बांधल्या गेल्या. असे असूनही कापडगिरण्यांमधला कामगार सवलतींच्या बाबतीत इतर उद्योग-धंद्यांमधील कामगारांपेक्षा मागेच आहे. आता तो त्यांच्याबरोबर येण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यांच्या पदरात काय पडते ते पाहायचे. □

रंगभूमी – चित्रपट । विनया खडपेकर

# टक्कल पडलेली सुंदरी

## न रुजणारी कलाकृती

'आदित्य' निर्मित 'टक्कल पडलेली सुंदरी' या नाटकाचा पहिला प्रयोग नुकताच छबिलदासच्या रंगमंचावर सादर झाला. यूजिन आयनेस्कोच्या 'बाल्ड सोप्रॅनो' या मूळ फ्रेंच नाटकाच्या इंग्लिश अनुवादाचे मीना देशपांडे यांनी केलेले हे मराठी रूपांतर आहे. स्वतः मीना देशपांडे यांनीच या नाटकाचे दिग्दर्शनही केले आहे.

श्री. आणि सौ. काळे, श्री. आणि सौ. गोरे, मोलकरीण तारा, फायरब्रिगेडप्रमुख ही या नाटकातली पात्रे.

श्री. आणि सौ. काळे असंबद्ध संवाद करीत असतात. त्यांच्याकडे श्री. आणि सौ. गोरे येतात. त्यांच्या घरात आल्यावर आपण एकमेकांचे पती-पत्नी आहोत हा शोध त्यांना लागतो; पण तो चुकीचा असतो. फायरब्रिगेड-प्रमुख कोठे आग आहे का ते शोधीत येतो. त्याला कोठे आगच दिसत नाही. तो आणि तारा एकदम सलगीने वागतात. अनेक तऱ्हेच्या बिनबुडाच्या गोष्टी फायरब्रिगेड-प्रमुख त्या सगळ्यांना सांगतो. निघून जातो. मग गोरे काळ्यांच्या जागी येतात. काळे सुरुवातीला जे संवाद बोलतात ते आता गोरे बोलू लागतात. काळे गोऱ्यांच्या जागी येऊन गोऱ्यांचे संवाद म्हणू लागतात. येथे नाटक संपते.

पती–पत्नीचे एकमेकांशी संवाद तुटलेले, नीरस, कंटाळवाणे जीवन चित्रित करणे, त्यातील भयानक रितेपण गंमतीदारपणे सांगणे हे या नाटकाचे उद्दिष्ट आहे.

प्रलयंकारी युद्धाचे भोगावे लागलेले परिणाम, भौतिक सुख आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांची परमावधि यातून निर्माण होणारा हा युरोपमधील प्रश्न आहे या प्रश्नापासून आम्ही खरे म्हणजे बरेच दूर आहोत. तेव्हा कोण्या स्मिथ आणि मार्टिन यांच्या जीवनातील पोकळी आमच्या काळे–गोऱ्यांना बहाल करणे सर्वथा अयोग्य वाटते. हा भयाण कंटाळा imported आहे, आपल्या समाजात तो फारसा जाणवत नाही असे वाटत रहाते. आपल्या समाजात अगदी...अपवादात्मक म्हणून जुहूच्या बंगल्यात हे कौटुंबिक चित्र येण्यास एक वेळ हरकत नाही; परंतु प्रस्तुत नाटकात रंगभूमीवर दिसणारे त्याचे स्वरूप अपवादात्मक नाही, तर प्रातिनिधिक आहे. परकी नावे, वातावरण कायम ठेवले असते तर त्या समाजाचा प्रश्न म्हणून या विषयाकडे पाहता आले असते. परंतु नावे, वातावरण सर्वांचे महाराष्ट्रीयीकरण केले आहे. त्यामुळे विषयाचा कलाबाह्य मुद्दा सतावीत राहतो. प्रेम, क्रोध, लोभ या मानवी समाजातील शाश्वत भावना आहेत. त्यामुळे त्या एका समाजातून दुसऱ्या समाजात सहजपणे संक्रमित होऊ शकतात. प्रस्तुत नाटकातील निरर्थक जीवनाला स्थल कालाचा संदर्भ आहे. यूजिन आयनेस्कोच्या समाजातून आमच्या समाजात ही 'निरर्थकता' सहजपणे संक्रमित होऊच शकत नाही. असो. जो विषय मांडला आहे तो कशा प्रकारे मांडला गेला आहे ते पाहू.

तुटलेला संवाद, कंटाळवाणेपणा हा असंबद्ध संवादांमधून सूचित केला आहे. तसंच रंगमंचावरील नेपथ्यातूनही तो मांडला आहे. कॅलेंडरवर तारखा नाहीत. घड्याळात आकडे नाहीत. फोटोमधल्या चेहऱ्यांना नाकडोळे नाहीत. त्यातून निरर्थक जीवन सूचित होते. प्रायोगिक नाटके बघण्याच्या सरावाने हे कळते. नाटक सहज फुलत जाऊन या आशयाची आपोआप प्रतीती येत नाही. विषय समजण्यासाठी प्रेक्षकांना clew दिले आहेत. नेपथ्य हाही एक clew च. विषयाची हाताळणी फार्सच्या पद्धतीने केली आहे. त्यामुळे अतिशयोक्तीला, विडंबनाला अर्थातच अवसर आहे. त्यातून जीवनाचे भेदक दर्शन घडविणे शक्य आहे; परंतु फार्सचा उपयोग फक्त विनोद घुसडविण्यासाठी केला आहे. हे विनोद नाटकाच्या आशयाला अर्थपूर्ण करीत नाहीत. पात्रांच्या अनेक कृतींचा अर्थच लागत नाही. फायरब्रिगेड अधिकारी आणि मोलकरीण तारा गळ्यात गळे घालून नाचत का सुटतात? फायरब्रिगेड अधिकारी श्री. काळे आणि सौ. काळे यांच्याशी अतिसलगी का करतो? तीनदा बेल वाजल्यावर कोणी येत नाही आणि चवथ्यांदा फायरब्रिगेड अधिकारी येतो. तो तिसऱ्याच वेळी आला असता तर काय बिघडले असते? काळे आणि गोरे ही जोडपी 'आठवड्याचे दिवस किती?... ढ ढा ढि ढी लोण्यानं चप्याला पॉलिश करता येत नाही, लहान माझी बाहुली, एक मंत्री झेलु बाई दोन मंत्री झेलु, किस बाई किस, नाच नाच नंगा नाच, अग का ग का ग वाण्याचं बिल भरलंस का ग?' असा आरडाओरडा करीत झिम्मा किंवा तत्सम धिंगाणा का घालतात? ते कळू शकले नाही. म्हणून मीना देशपांडे यांनाच मी या गोष्टीचा अर्थ विचारला. तेव्हा त्यांनी सांगितले, असा प्रत्येक गोष्टीचा अर्थ लागणार नाही. कीस काढायचा नाही. या सगळ्या गोष्टी विनोद, गंमत म्हणून घातल्या आहेत करमणूक म्हणून पहायचे!

हिंदी चित्रपट पहाताना, हिरो–हिरॉईन बागेत गडबडा लोळतात तेव्हा तेथे इतर माणसे कशी नसतात किंवा एकटा हिरो सात-आठ गुंडांना कसा लोळवतो असे प्रश्न उपस्थित करायचे नसतात. तसेच छबिलदासच्या रंगमंचावर होणाऱ्या बहुतेक नाटकांच्या बाबतीत 'असे का?' हा प्रश्न विचारायचा नाही. जे समोर येईल ते प्रायोगिक म्हणून गोड करून घ्यायचे.

या नाटकातील काही विनोद बरे आहेत. उदा. 'ते डॉक्टर चांगले आहेत. मिस्टर आपट्यांचं ऑपरेशन केलं, तर आधी स्वतःचं करून बघितलं.'

डॉ. राजमाचीकर, सुधा गद्रे, विवेक कुलकर्णी, सीमा शेंडे, विद्या आपटे या कलाकारांनी आपापल्या भूमिका ठीक सांभाळल्या आहेत. जयराम हर्डीकर यांचा अभिनय विशेष उल्लेखनीय वाटला.

*

# आपुला ठावो न सांडिता

'आविष्कार'निर्मित 'आपुला ठावो न सांडिता' या नाटकाचे प्रयोग छबिलदासच्या रंगमंचावर सुरू आहेत. लुई पिरँदेल्लो यांच्या नाटकाचे श्रीराम खांडेकर यांनी केलेले हे रूपांतर आहे. दिग्दर्शक आहेत श्री. विहंग नायक.

आपला ठाव न सांडता सगळ्या पुरुषांना आपल्या भोवताली नाचविणाऱ्या डेलियाची कथा, हा या नाटकाचा मुख्य विषय आहे. डेलिया ही एक नटी. जॉर्जिओ तिच्यासाठी आत्महत्या करतो. प्रेमाचे ढोंग करणारा मायकेल नंतर मनाविरुद्ध खरोखरीच झपाटला जातो. डोरो नकळत तिच्यावर प्रेम करायला लागतो. फ्रँकोही मोठ्या वयात तिच्या तडाख्यात सापडतो. एकमेकांचा द्वेष करीत डेलिया-मायकेल एकमेकांकडे आकर्षित होतात, जवळ येतात. असे मुख्य कथानक आहे.

या मुख्य कथानकात डॉ. केशव आणि मीनाक्षी यांचे लहानसे उपाख्यान आहे. डोरोच्या आईची घालमेल, डोरो-डिएगो मैत्री, फ्रँको-डोरो संघर्ष, लोक आणि डोरो संघर्ष हे सारे दाखविले आहे. प्रभावीपणे दाखविले आहे. प्रेक्षक नाटकाबरोबर वाहून जातात. नाटकाच्या मध्यंतराचा प्रवेश, टी स्टॉल, समीक्षक, चहा पिणारे प्रेक्षक तर चांगलीच पकड घेतात. या निरनिराळ्या दृश्यांची निर्मिती, भावनांचे प्रकटीकरण कलादृष्ट्या श्रेष्ठ दर्जाचे आहे; परंतु प्रत्येक दृश्य सुटे सुटे वाटते. डोरोच्या आईची उलघाल किंवा डोरो-डिएगो मैत्री, मुख्य कथानकाशी एकजीव झाली नाही. निरनिराळ्या दृश्यांमध्ये, भावनांमध्ये, आंतरिक एकता नाही. नाटकाच्या मध्यंतराचे टी-स्टॉलवरचे दृश्य, डॉक्टर केशव-मीनाक्षी-प्रकरण तर नाटकाचा विषय पाहता पूर्णपणे उपरे वाटते

नाटक रूपांतरित असले तरी पात्रांची नावे, वातावरण यांचे मराठीकरण केले नाही. पात्रांचे पोशाख, नेपथ्य यातून सरंजामी युरोपचे वातावरण साधले आहे. एक परके नाटक म्हणूनच आपण ते पाहतो. स्त्री-पुरुष खेळ हा शाश्वत विषय केंद्रीभूत असल्यामुळे हे नाटक कोणत्याही समाजाचे होऊ शकते.

'आपुला ठाव न सांडिता' याच नावाची नरेश यांची कथा 'सत्यकथा' (मार्च ७३) मासिकात प्रसिद्ध झाली होती. या कथेतील उर्मिला आणि नाटकातील डेलिया यांच्यात किंचित साम्य आहे.

सुधीर मोडक (डिएगो), प्रभाकर कर्डे (डोरो), सुमंत मस्तकार (फ्रान्सिस्को), विजय पटवर्धन (प्रेस्टिनो), प्रकाश माने (मायकेल), स्वाती टिपणीस (डेलिया), जगदीश कदम, श्रीकांत वावळे, प्रफुल्ल सामंत, नलिनी वाडकर, संध्या चक्रदेव इत्यादी कलाकारांनीही आपल्या भूमिका चोख केल्या आहेत. राम शितूत यांचे नेपथ्य आणि प्रकाशयोजना, शाक नील यांचे पार्श्वसंगीत, हरिष पितळे यांची रंगभूषा नाट्यविषयाचा परिपोष करण्यात प्रभावी ठरली आहे. नाटकाचा प्रभावी प्रयोग पाहता दिग्दर्शक विहंग नायक मराठी रंगभूमीवर आणखी काही करून दाखवतील, अशी अपेक्षा निर्माण होते. □

# गमन

## फक्त मजकुराच्या पातळीवर

खेडेगावातून मुंबईत पोटासाठी येणारा मनुष्य पुन्हा गावी जाऊ शकत नाही— मुंबईतून गावी 'गमन' करणे त्याला कठीण होते. 'गमन' या चित्रपटाचा हा विषय आहे प्रेमत्रिकोणाप्रमाणेच हाही विषय लोकप्रिय आहे. अनेक कथा, कादंबऱ्या, कविता, चित्रपटांतून वाजूनगाजून गेला आहे. या विषयात प्रेक्षकांना धुंद करणारी प्रणयाची बहार नाही; परंतु मातृवात्सल्याचा जिव्हाळा आहे. म्हणूनच शेकडो प्रेक्षकांच्या काळजाला हात घालण्याचे सामर्थ्य यात मुळातच आहे. हा विषय कसाही मांडला असला तरी प्रेक्षक तो गोड करून घेण्याच्या मनःस्थितीत असतात. असा हा विषय आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवातील पारितोषिकविजेत्या 'गमन'मध्ये कसा वाटला ?

लखनौजवळच्या एका खेडेगावात हसन गुलाम नावाचा तरुण आपली पत्नी आणि आईसह राहात असतो. जमीनदाराकडून उत्पन्नाचा ठराविक हिस्सा मिळत नाही. मारहाण होते. मग हा गाववाल्याकडे मुंबईला येतो. त्याच्या मदतीने टॅक्सी-ड्रायव्हर होतो. स्वतः मिळवू लागतो. घरी आई पाय घसरून पडते. पत्नी त्याला पैसे घेऊन बोलावते. लल्लूकडे पैसे मागतो. लल्लू त्याची प्रेयसी यशोधराकडून पैसे घेऊन त्याला देतो. यशोधरेचा मवाली भाऊ आणि काका तिला दुबईला पाठवीत असतात. ती तयार होत नाही म्हणून तिच्या प्रियकराचा—लल्लूचा खून करतात. या घटनेने व्यथित हसन ट्रंक भरून परत जायला निघतो. व्ही. टी. स्थानकावर येतो; पण जात नाही लखनौला जाणाऱ्या गाडीकडे असहायपणे पाहत राहतो. तिकडे वाट पाहणारी पत्नी दार उघडते. तो दिसत नाही म्हणून दार लावून घेते. गजाला हात धरून हा व्ही. टी. स्थानकावर तसाच उभा.

या कथानकातून साधारण असे दिसते की, नायक हसन गुलामचा दोन पातळ्यांवर संघर्ष सुरू आहे. एक प्रातिनिधिक संघर्ष— खेड्यातून पोट भरण्यासाठी शहरात आलेल्या व्यक्तीच्या जीवनातील संघर्ष. दुसरा त्याच्या भावुक मनोवृत्तीतून निर्माण होणारा संघर्ष. या दुसऱ्या संघर्षाला दोन पदर आहेत— मुंबईच्या यांत्रिक जीवनातून होणारे आघात आणि पत्नी, आई, घर, गाव यांच्या ओढीतून येणारा ताण. निर्माते लेखक-दिग्दर्शक श्री. मुझफ्फर अली यांना असे एक गुंतागुंतीचे चित्र आपल्या चित्रपटात दाखवायचे आहे. एका भावुक टॅक्सी-ड्रायव्हरची कहाणी सांगत एक सामाजिक प्रश्न मांडायचा आहे; परंतु हे दाखविण्यात चित्रपटाला पूर्णपणे अपयश आले आहे.

याचे कारण विषयाचा आविष्कार अगदीच निर्जीव आहे. पूर्ण चित्रपटाचे रूप एखाद्या मजकुरासारखे आहे.

अगदी सुरुवातीसुरुवातीचे पति-पत्नीचे दृश्य घेतले तर ते कसे आहे ? 'ती उठली. तिने चहा केला. मग ती नवऱ्याला उठवायला आली. तो लवकर उठेना. तिने दोन-तीनदा

ढोसल्यावर तो उठला. त्याने आळस दिला. मग तो चहा प्यायला. ' कोणतीही भावाभिव्यक्ती या दृश्यातून होत नाही. रागअनुरागाच्या कोणत्याच छटा येथे दिसत नाहीत. म्हणून ही दृश्ये म्हणजे केवळ मजकूर वाटतो. याच चालीवर चित्रपट पुढे जातो.

प्रत्येक घटनेला, दृश्याला स्वतःची पातळी असते. स्वतःची खोली असते. गांभीर्य असते. स्वतःचे हसरे, दुखरे व्यक्तिमत्त्व असते. ते नेमके ओळखून प्रसंग उभा केला तरच तो जिवंत होतो आणि प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो. त्यातील भावना, विचार लोकांना कळू शकतात. या चित्रपटात घटनांचे, प्रसंगांचे चित्रद्वारा केलेले केवळ कथन आहे. प्रसंग जिवंत होणे नाहीच. प्रसंग कोणताही असो– गीता-लल्लू प्रेमाचा असो किंवा लल्लूच्या खुनाचा असो; एकाच सरधोपट पातळीवरून त्याचा आविष्कार होतो. शेजारचा माणूस ऑफिसात गेला आहे हे ज्या स्वरात आपण सांगतो त्याच स्वरात शेजारच्या ब्लॉकमधे खून झाला आहे, हेही सांगितले तर कसे वाटेल, तसे येथे होते. खून, अपघात मुंबईच्या जीवनातील नित्य घटना आहेत असे सांगायचे असेल तर तो भाव व्यक्त झाला पाहिजे. तसा तो होत नाही. थोडाफार एकाच ठिकाणी व्यक्त झाला आहे– कोणी तरी पडते म्हणून गाडी थांबते तेव्हा.

चित्रद्वारा केलेले मजकूरकथन तरी सुसंबद्ध आहे का ? नाही. हसनच्या गावचे अंत्ययात्रेचे दृश्य– स्वतःच्या अंगावर फटके मारून घेणारी माणसे– या दृश्याचे उद्दिष्ट काय ? मुंबईतील लेझिम पाहून त्याला या दृश्याची का आठवण होते ? ' समूह ' एवढेच आठवणीला पुरेसे कारण आहे हे मान्य; परंतु यातून हसनच्या कोणत्या भावना व्यक्त होतात ? समजू शकत नाही. पेट्रोल समुद्रात टाकून त्याला काडी लावणारा म्हातारा काही तरी भडक, सनसनाटी दृश्य दाखविण्यापलीकडे कोणती कामगिरी करतो ? ट्रक घेऊन व्ही. टी. स्थानकावर आलेला हसन खिशात पैसे असताना लखनौच्या गाडीत का चढत नाही ? कारणे कळू शकत नाहीत. चित्रपटातल्या मजकुरात्मक कथानकातही दुवे असे ठिकठिकाणी निसटले आहेत आणि त्यात असंबद्धपणा आला आहे. हे कथन म्हणजे केवळ खेडेगावचा, मुंबईच्या जीवनाचा, मुंबई शहराचा व थोडा-फार टॅक्सीवाल्यांच्या जीवनाचा तपशील आहे. हसन टॅक्सी शिकण्यापासून सुरुवात करतो. तो ड्रायव्हिंग शिकतो. स्वतःची टॅक्सी सुरू करतो. येथे टॅक्सीवाल्यांचे एक जग दाखवायला संधी होती; पण तिचा उपयोग केला गेला नाही. सहज आठवतो ' छोटोसी बात '-मधला नायक स्कूटर–खरेदीला जातो तो प्रसंग. तिथे अवघ्या काही क्षणात वर्कशॉपचे जग किती जिवंत केले आहे !

यशोधरेचे कुटुंब मराठी कशासाठी दाखविले ? त्यांच्या मराठीपणाने चित्रपटाच्या आशयाला कोणते वेगळे परिणाम दिले आहेत? समजा, हे कुटुंब केरळी किंवा गुजराथी असते तर लल्लू, हसन किंवा मुंबईचे जीवन यात काहीही फरक पडला नसता; पण शिवसेनेच्या चळवळीनंतर हिंदी चित्रपटात मराठी कुटुंब दाखविण्याची लाट आली. ( आनंद, फागुन, आज की ताजा खबर ) त्याच लाटेतून ' गमन 'मधेही एक मराठी कुटुंब शिरले.

प्रणय, खून ही दृश्ये गल्लाभरू चित्रपटात अगदी रंगवून रंगवून दाखविलेली असतात. तेव्हा नवे काही तरी करून दाखविण्याच्या मिषाने हे ठरीव ठशांचे प्रसंग किंचित् दाखवून त्यांना खटकन् कात्री लावली आहे. ' जुने जाऊ द्या मरणालागुनी ' आमचे काही म्हणणे नाही. खुनाच्या दृश्याला कात्री लावली तरी त्याचे गांभीर्य प्रतीत होईल असे काही सूचक पाहिजेच ना ! तसेच हसनचे पत्नी, आई, गाव यांच्यावरील उत्कट प्रेम आधी कोठे प्रकटच होत नाही. मुंबईच्या जीवनात तो आल्या क्षणापासून सहज मिसळून जातो. त्यामुळे नंतरची व्याकुळता भावनाशून्य, कोरडी, बिनबुडाची वाटते !

' गमन 'च्या मुंबईतल्या टॅक्सीवाल्यांचे चेहरे आणि रहाणी ' सीधे-साधे, भोळे-भाळे ' म्हणावे अशी आहे. आमच्या मुंबईतले टॅक्सीवाले नेहमी हिरोच्या ऐटीत असतात. थांब म्हणता थांबत नाहीत. जवळच्या अंतराला नाही म्हणतात. ' कहाँ ' असे मग्रुरीने विचारून आपले ' स्थळ ' त्यांना पसंत नसले की, उत्तराचे श्रम न घेता सिगरेटचा धूर फेकत फर्ऽऽकन निघून जातात. ' गमन 'मधला भोलाभाला टॅक्सीवाला प्रवाशाजवळ सुटे पैसे नाहीत म्हणून मुकाटपणे थांबतो. आमच्या मुंबईतला टॅक्सीवाला ' चेंज नही ' सांगून वीस-पंचवीस पैसे सहज लाटतो. ' गमन 'च्या मुंबईतले टॅक्सीवाले आमच्या मुंबईत येतील तर किती बरे होईल !

हसन, त्याची आई, पत्नी भैय्याच्या ढंगात हिंदी बोलतात. त्या बोलीत मुसलमानी उर्दू ढंग मिसळणे आवश्यक आहे. कारण ते एक मुसलमान कुटुंब आहे. बाकी यशोधरेच्या कुटुंबाच्या महाराष्ट्रीयत्वाला जसे महत्त्व नाही तसेच हसनच्या मुसलमानपणाचे काही प्रयोजन दिसत नाही.

हसन गुलामाच्या भूमिकेतील फरुक शेख यांनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक बापुडवाणा भाव चेहऱ्यावर ठेवला होता. जमीनदाराशी मारामारी करताना क्षणभर त्यात फरक झाला तेवढाच. पत्नीच्या भूमिकेतील स्मिता पाटील वाट्याला आलेली वाक्ये स्पष्ट उच्चारतात. यापलीकडे काहीही करीत नाहीत. शेवटी दार उघडण्याचा आणि लावण्याचा प्रसंग किती अर्थपूर्ण ! डोळ्यांत प्राण आणून ते उघडावे आणि अति व्यथित अंतःकरणाने लावावे असे अपेक्षित आहे; पण नेहमीच्या झाडूवाल्यासाठी दार उघडावे तशा कोरडेपणाने स्मिताबाई दार उघडतात आणि लावतात. त्यांना वाव फार थोडा आहे असे समर्थन होऊ शकते; पण जो काही वाव आहे त्यातही चमक दिसत नाही. अरुण जोगळेकर (यशोधराचा मवाली काका), नाना पाटेकर (यशोधरेचा भाऊ) यांनाही तसा वाव कमीच आहे. स्मिता पाटलांपेक्षा कमी आहे; पण जो काही वाव आहे त्यात त्यांनी स्वतःचे अभिनयसामर्थ्य दाखवले आहे. मवाली हा शब्द घट्ट उराशी बाळगून चेहरा कायम मख्ख किंवा एकदम क्रूर ठेवण्याचा वेडेपणा त्यांनी केलेला नाही. (बऱ्याच चित्रपटांत, नाटकांत हा वेडेपणा आढळतो). एकमेकात बोलताना, खुनाचा बेत आखताना, अंगाला मालिश करून घेताना चेहऱ्यावरील विविध भावदर्शनातून त्यांनी झोपडपट्टीतल्या गुंडाची व्यक्तिमत्त्वे साकार केली आहेत. गीता सिद्धार्थ (यशोधरा), जलाल आगा (लल्लू) यांनी आपल्या भूमिका चोखपणे केल्या आहेत.

गावचे वातावरण, मुंबईतील गिचमिड, गल्लीतले वातावरण, मुंबईच्या चकचकीत भागातले वातावरण नदीर खान यांच्या कॅमेऱ्याने योग्य प्रकारे टिपले आहे.

केवळ मनोरंजनाचे उद्दिष्ट न ठेवता आणखी काही निर्माण करण्याच्या इच्छेने प्रेरित झालेल्या चित्रपटांच्या प्रवाहातील हा अयशस्वी चित्रपट आहे. □

## मुक्काम संगमनेर

मुखपृष्ठ २ वरून

दिमाखदार दुकान 'व्हाइट हाउस टेलर्स!' पांढरफेक, चकचकीत, शुभ्र सनमायका, शुभ्र प्रकाशणाऱ्या ट्यूब्ज, नजर वळवून बघायला लावणारा शोक!

प्रत्येकाशी हसतमुखानं 'सलाम' करत अदबीनं बोलणारा त्याचा मालक, 'ब्लॅक हाउस' झालेल्या 'व्हाइट हाउस'ची राख बघितल्यावर उद्ध्वस्त झालेला त्याचा चेहरा नजरेसमोरून अजूनही हालत नाहीये.

श्याम पारख,

एक विशीतला तरुण.

एका रद्दी खरेदी-विक्रीच्या छोट्या दुकानाचा मालक.

प्रामाणिक अन् कष्टाळू श्यामने आपला धंदा वाढवायचा ठरवले. रद्दीबरोबर बारदानाची खरेदी-विक्रीही त्यानं सुरू केली. बॅंकेबरोबरच गावातल्या संबंधित परिचितांनी मदतीचा हात दिला. दहा रुपये भांडवल नसलेला श्याम हजाराच्या उलाढाली करू लागला.

आगीनं त्याच्या वीस हजारांच्या मालाची राख केली. धडपडणारा श्याम आज आपली उमेद घालवून बसलाय्.

स्टॅन्डकडं जाणाऱ्या वाहात्या रस्त्यावरचं एक दुकान 'डायमंड वॉच रिपेअर्स.'

छोटीशीच तीन-चार फुटी जागा. घड्याळं लटकणारी शोकेस.

आणि काचेच्या पलीकडं घड्याळाशी झटापट करीत, डोकं खुपसून बसलेला रशीद. एकदम तरुण.

दुकान सुरू करून एक-दोन वर्षं झालेली. नुकताच कुठं जम बसू बघतोय, तोच हे अघटित घडलं! 'डायमंड'च्या दारावर चितारलेला 'डॅनी' तेव्हा अवतरायला हवा होता.

असे बरेचसे. सगळेच छोटे- धडपडणारे, दोन वेळा भागवून नवं घडवू पाहणारे. 'लाखाचे धनी'ही या संतापाचे बळी ठरले; पण असा एखादा—दुसराच; पण आकस्मित फटक्याने तेही हादरलेत ते सावरतीलही, कारण त्यांचा आवाका मोठा—त्यांची ताकदही मोठी. लाख कमावणारा लाख गमविण्याच्या तयारीत असतो.

पण हे हताश, उद्ध्वस्त झालेली उमेद कुठून मिळविणार?

□

पण या 'जातीय तणावा'त माणसातली माणुसकी मात्र करपली नव्हती.

आपल्या शेजारचं हिंदूचं घर पेटवायला आलेल्या जमावाच्या हाता-पाया पडून, जमावाला परतवून लावणारी मुसलमान स्त्री; पेट्रोल पंपावरून मालकाला सुरक्षित घरी पोचवणारा अनोळखी मुस्लीम गृहस्थ

हिंदूच्या जळलेल्या कारजवळ उभ्या असलेल्या मुस्लिमांच्या ट्रकला जमावापासून वाचवणारे हिंदू.

ऐन मध्यरात्री, दंगलीच्या पेटत्या काळात मुस्लिम मोहल्ल्यातून प्रेतावर अग्निसंस्कार करून स्मशानातून सुरक्षित परतणारे हिंदू—

हिंदूंच्या गल्लीत राहाणारा 'अब्दुल' मुस्लिम मोहल्ल्यातला 'पद्माकर' दोघेही आपापल्या स्थानी सुरक्षित होते.

तरीही याला 'जातीय दंगल' म्हणायची?

आणि ही 'दंगल' आवरणं अवघड होतं?

भडकलेला दोन-पाचशेचा जमाव वेळीच पोलिस-हस्तक्षेप झाला असता तर पांगला असता. एक खून आणि होणारी प्रचंड हानी टाळता आली असती; पण कुमक येईपर्यंत वाट बघणारे स्थानिक पोलिसअधिकारी, वरिष्ठ येईपर्यंत थंड होते आणि 'ब्लॅक लिस्ट'मध्ये अग्रभागी असलेल्या संशयित आरोपींविरुद्धच्या तक्रारींची गंभीरपणे दखलही घेतली जात नव्हती.

आणि 'शांतता कमिटी'च्या मीटिंगमध्ये 'थंड पेय पान' करत 'शेरेबाजी' करणाऱ्या 'शांतिदूतां'च्या 'धैर्या'बद्दल काय बोलावं? एखादा-दुसरा अपवाद वगळता एकही सदस्य ऐनवेळी घटनास्थळी नव्हता आणि जमावात घुसून, वार झेलत, जमावाला आवरणाऱ्यांना मीटिंगला साधं बोलावणंही नव्हतं.

— विनय गुणे

# श्री भगवान उवाच

### श्री अर्जुन उवाच

अर्जुन म्हणे अनंता
झाला मनी मोठा गुंता
काढ काही प्रज्ञावंता
मार्ग तूचि।

काय करू मी, काय स्वीकारू
कोणता सोडू, मार्ग कुठला धरू
उधळे चौखुर विचारांचं वारू
आवरी तूचि।

नाही चित्त स्थिर, नाही होत विचार
राहावे की जावे, काय योग्य आचार
दिव्य ज्ञानाचा तव पुन्हा साक्षात्कार
कर देवा।

माहित आजवर लोक फक्त तीन
स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ हीन
कळला परी एक काल नवीन
लोक मजला।

भू-लोकावरी मुंबईनगरी
नाना हिचे ढंग, रंग इथे भारी
स्तिमितच होई पाहिल्यावरी
रूप हिचे।

लोंढे माणसांचे इथे वाहाती
कापीत वाहने वाट काढती
कित्येक मरती, तरी सदा वाढती
संख्या इथली।

नगरीमध्ये या एक इस्पितळ
उंच, अलिशान त्याला पैशाचं बळ
वाट्टेल ते मिळे दाबताच कळ
क्षणार्धात।

गरीबाने मात्र लांब राहावे
श्रीमंत रोग दुरून पहावे

केवळ पाहूनच पळून जावे
थाट इथला।

इस्पितळात या एक लोकनेता
सध्या झुंजतोय देशाचा तो पिता
यमदूतांसवेही त्यांना न भिता
योद्धा थोर।

भेटावया त्या कोण कोण जाती
भेट न झाली तरी काचेतुनी पाहाती
पाहूनी जाती, कोणी तिथेच राहाती
पूज्य भावे।

राज्याराज्यातले ते मुख्यमंत्री
खासदार-आमदार यांचीही जंत्री
कुणी आणी फुलं, कुणी केळी-संत्री
लोकनेत्या।

कोणी म्हणती हे पूजेचे पाय
ते जेथे जेथे, मीही तेथे जाय
त्यांच्यापुढे माझे कार्यही काय
कवडीइतुके।

कित्येकांनी तर तळ ठोकला
सकाळ-संध्याकाळ प्रार्थनेला चला
याहून दुजे ना व्यवधान मनाला
कित्येकांच्या।

म्हणूनी माझ्याही येतसे मना
जसलोकी जाउनी भेटावे त्यांना
जे भीष्मचार्यांच्या भोगती यातना
अपरिमित।

**श्री भगवान उवाच**

वेडा म्हणू की म्हणू मूर्ख तुला
गीतेतला अर्थ गीतेत राहिला
तू मात्र तसाच गोटा गंगेतला
अंतर्बाह्य।

आदर मलाही त्या ज्येष्ठ नेत्याचा
भूलोकावरील क्रांति-पित्याचा
परी पराभव तुम्हीच त्याचा
करत असा।

कोणाही व्यक्तीची करू नका पूजा
मनामध्ये कधी भाव नसावा दुजा
शिकवावे इतराना, कृतीमध्ये वाजा
तुमचाही।

कार्यरत रहा, त्याची शिकवण
विसरला इतक्यात तुम्ही शिष्यगण
फक्त प्रार्थनेत गर्क सर्वजण
संध्या-सकाळी।

हातातले कार्य ठेवूनिया खाली
सरकारी खर्चाने इथे खेपा घाली
सदा सज्ज मंडळी स्वागतवाली
गरीब देशाची।

त्यातही म्हणे राजकारणी भोंदू
'चला साधू संधी, आल्या-गेल्या वंदू'
उद्या कोण शत्रू, कोण होईल बंधू
कोण जाणी।

मोहरे नि प्यादी घेऊन संगती
राजकारणाचे डाव रंगती
कशी का नेत्याची असेना स्थिती
शय्येवरी।

कुणा फक्त बातम्या देण्याचा सोस
खऱ्या वा खोट्या वा, सांगण्याची हौस
रंग कोणता, किती झाले शौचास
वर्णिती रसभरे।

पाहिले की नाही आज उघडून डोळे
उजवे की डावे बोट कोणते चोळे
कानात, नाकात कुठे किती बोळे
वर्णिती रसभरे।

अन्न घेतले की प्यायला आज रस
आत घेतला की सोडिला त्यांनी श्वास
नळीतून नाकामधल्या कसा गेला घास
वर्णिती रसभरे।

कोणाकडे पाहून थोडे उठले
कोणाकडे पाहून डोळे मिटले
शब्द कोणासाठी किती उमटले
वर्णिती रसभरे।

वाटेल कोणाला हे बोलणे उद्धट
कोणी म्हणेल केवळ बाष्कळ वटवट
तू मात्र पार्था घे जाणून नीट
भाव माझा।

चिंता, वेदना मी का न जाणतो
प्रीतीचेही सारे मी रंग मानतो
त्यातूनचि दुर्बल असा वागतो
जाणतो मीही।

पण याला का नसावी सीमा
वेळीच येई अशा अध्यात्म कामा
नाही उपयोग केवळ जपूनी नामा
अखंडित।

जो जो जन्मतो त्या मृत्यू अटळ
देव, संत वा सज्जन वा खल
संपते साऱ्यांचेच त्याच्यापुढे बळ
जाण तूही।

राजा असो वा असू देत रंक
पापी, दुराचारी वा असो निष्कलंक
वेळ आल्यावरी संपे प्रत्येकाचा अंक
भूलोकीचा।

दोन जीवनांमधली ही स्थिती
बदलाया वेष नट पडद्यात जाती
पुढल्या जीवना मिळतसे गती
मृत्यूपायी।

ओळखोनी हे सारं स्थिर ज्याचं चित्त
सुख राहो अथवा जावो, नाश पावो वित्त
करावया कर्म आपण केवळ निमित्त
ओळखी जो।

करी कर्म जो न धरी फलाचीही आशा
स्तुती करो, कोणी निंदा कोणी करो निराशा
कमलतंतूस गज जैसा, तो तोडी भवपाशा
प्रिय मजला।

नाहीत हे केवळ बोलण्याचे बोल
कृतीविना त्यांना ना कस्पटाचे मोल
अन्यथा सारेच कष्ट माझे फोल
येथवरचे।

लोकनेता तो जर सावध झाला
आणि स्पष्टपणे बोलू लागला
सांगेल हेचि तो भक्तगणाला
भोवतालच्या।

'व्यर्थ माझा जन्म, व्यर्थ माझे कार्य
शिष्यांकडून पराभव आता अनिवार्य'
शय्येवरुनच बोलेल तो आर्य
बोल हेचि।

—सतीश कामत